रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १२ मार्च २०२३




# शिवसेना -भाजपा सरकारची 'छप्परफाड' मदत!

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या शिवसेना व भाजपा (शिंदे - फडणवीस) सरकारने पहिलाच धडाकेबाज अर्थसंकल्प सादर केला. यात गरीब, महिला, बळीराजा आणि तुटपुंज्या वेतनावर उदरनिर्वाह करणाऱ्या कर्मचारी वर्गाच्या मानधनात आणि, वेतनात घसघसीत वाढ केली.यामुळे शासनाच्या तिजोरीवर भार पडणार आहे.हे निश्चितच! समाजातील विविध घटकांच्या अपेक्षा पूर्ण करणे चुकीचे आहे काय ?मग विरोध कशासाठी ? या सरकारचा अर्थसंकल्प' विरोधी पक्षाला हादराच बसला आहे.त्यामुळे त्यांनी भोपळा आंदोलन केले.आता राज्यातील अगामी निवडणुकीत आपले कांही खरे नाही! याची चिंता लागली आहे.त्यातून त्यांची पोटदुखी वाढली आहे.**

राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२३-२०२४ चा अर्थसंकल्प सादर केला.त्यांच्या अर्थसंकल्यामुळे विरोधी पक्ष आता बॅकफुटवर आला आहे. फडणवीस यांनी राजकारणाची सुरुवात पक्षाचा कार्यकर्ता, नंतर ते नागपूरचे नगरसेवक, महापौर झाले.मग आमदार झाले आणि त्यानंतर मुख्यमंत्री झाले. ते एका रात्रीतून मुख्यमंत्रीपदाच्या खूर्चीवर जाऊन बसलेले नाहीत.एका रात्रीतून देशाचे पंतप्रधान आणि राज्याच्या मुख्यमंत्री होणारे नशीबवान नेते आहेत.राजकारणात प्रत्येक व्यक्तीला महत्वाकांक्षा असते, पण फडणवीसांना पदाचा मोह कधीही आलेला नाही. त्यांनी राज्यात पक्ष वाढीला प्राधान्य दिले. राज्यात १९८० मध्ये भाजपाचे १४ आमदार निवडून आले होते. हा आकडा वाढत गेला. पण १९९९, २००४, २००९ च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या जागा जरी घटल्या तरी पक्ष एका अंकावर आला नाही. पण २०१४ मध्ये तर भाजपाने १२२ जागेवर झेप घेतली.तर २०१९ भाजपाने १०५ जागा म्हणजे सर्वाधिक जागा मिळविल्या. राज्यात राष्ट्रवादी कॉंग्रेसनेते शरद पवार व सेनेचे उध्दव ठाकरे सेना नेतृत्वाला हे जमलेले नाही. ज्या नेत्यांचे पक्षावर मालकी हक्क आहे.त्या पक्षांचे संख्याबळ ७५ आतच राहिले आहे. राज्यात १९९५ नंतर सर्वच निवडणुका मध्ये दोन्ही कॉंग्रेसने मराठा समाजाचा जनाधार गमावलेला आहे.राज्यात भाजपा पक्ष आज ग्रामीण भागापर्यत पोंहचला आहे. स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या निकालात भाजपाचे वर्चस्व दिसून आलेले आहे. महाराष्ट्रात आज भाजपा आज नंबर एकच पक्ष आहे.राज्याचे २०१४ मध्ये फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर ते ब्राह्मण समाजातून येत असल्याने पुरोगामी महाराष्ट्रात त्यांचेवर आणि कुटुंबावर घाणेरडी टीका करण्यात आली. ती विषारी टीका त्यांनी पचविली. त्यांनी कोणत्याही तरूणाला हातकड्या घालून जेलमध्ये टाकले नाही. ते कोणाबद्दल व्देष, आकस न ठेवता समाजकारण करतच राहिले. राजकारणातील एक संवेदनशील नेता म्हणून आज त्यांची ओळख आहे. ते जाती -पातीचा विचार न करता समाजाच्या भल्यासाठी झगडत आहेत !हे राज्यातील जनतेच्या लक्षात आले.म्हणून २०१९ च्या निवडणुकीत जनतेने फडणवीस व भाजपाला आशीर्वाद दिला. महाराष्ट्रात भाजपाला सर्वाधिक जागेवर विजय मिळवून देण्याचे श्रेय त्यांचेच आहे. त्यांनी 'तेंव्हा मी पुन्हा येईल' म्हणाले होते!पण त्याची टिंगल टवाळी केली गेली. पण तसा जनाधारही होता. राज्यातील धूर्त नेत्याने "फडणवीस सोडून कोणाला मुख्यमंत्री करा' असा राजकीय डाव खेळला. राज्यातील जनतेच्या जनाधाराचा अवमान करून त्यांना मुख्यमंत्रीपदापासून ठेवले गेले. पण ते निराश न होता त्यांनी विरोधी पक्ष नेता म्हणून त्यांनी महाविकास आघाडतील घोटाळे, भ्रष्टाचार काढून त्यांचे नाके नऊ आणलेले होते. राजकारणात कपट छळ, जातीयवाद, व्देष करून मोठी झालेले नेते आहेत. आमच्याच पक्षाच्या नेत्यात चाणक्यपणा, दूरदृष्टीचे गुण आहेत, इतर कोणता नेता नाही, अशी शेखी मिरविणाऱ्यांना मात्र फडणवीस भारी पडले! त्यांनी शिंदे यांच्या मदतीने राज्यात सत्तांतर घडवून आणले, हे लपून राहिलेले नाही. पण धुरंधर नेत्यांना सरकार कधी गेले, हेच कळाले नाही. राज्यातील सत्ता बदला- नंतरही फडणवीस यांना मुख्यमंत्रीपदाची संधी होती, पण त्यांनी ते न स्विकारता एकनाथ शिंदे यांना संधी देण्याचा मोठेपणा दाखविला. दुसरे ज्यांचे स्वतःचे घर उध्वस्त होताना डोळ्याने दिसत असतानाही, त्यांचा अंहकार आणि मोह सुटला नाही.आज घर वाचविले असते त्यांचा 'किंगमेकर' मान कायम राहिला असता.पुरोगामी राज्यात फडणवीस पुन्हा जर मुख्यमंत्री झाले असते तर' पेशवाव्यांचे राज्य आले' अशी टवाळकी तथाकथित पुरोगामी नेत्यांनी केली असती!फडणवीस वादळी नेतृत्व आहेच.पण ते केवळ सत्ताभोगी नाहीत तर महाराष्ट्राच्या भविष्याची चिंता करणारे आहेत.केवळ सवंग घोषणा ते करत नाहीत, त्याचे दुरगामी परिमाण काय होतात ? याचा वेध घेत असतात.तेंव्हा याची नोंद घ्या!भविष्यात राष्ट्रीय राजकारणात त्यांना मोठी संधी दिली जाईल.भाजपा -सेनेची'ई डी' जोडी महाराष्ट्राच्या विकासासाठी झपाट्याने कामाला लागली आहे.शिंदे सरकार अनेक निर्णय घेत आहेत. फडणवीस यांचा अर्थमंत्री म्हणून पहिला अर्थसंकल्प.ते जमीनीवर काम करणारे कार्यकर्ते व नेते आहेत. राज्याचा अर्थसंकल्प तयार करताना त्यांनी जनतेच्या सूचना मागविल्या होत्या.शासनाकडे सात दिवसात ४० हजार सूचना आलेल्या होत्या.या सूचनेचे प्रतिबिंब अर्थसंकल्पात दिसत आहे. फडणवीसांनी अर्थसंकल्पाला अध्यात्मिक जोड दिली. त्यांनी जगद् गुरू तुकाराम महाराज यांच्या पिकवावे धन। ज्याची आस करीजन।। या अंभगापासून अर्थसंकल्पाला सुरूवात केली. त्यांचे भाषणात तुकाराम महाजांच्या अनेक अभगांचा उल्लेख केला, हे विशेष! भाजपा शेतकरी विरोधी आहे, असे वातावरण निर्माण करण्याचा कॉंग्रेस जोडीने केला. पण २०१४ केंद्रात व राज्यात भाजपा सत्तेत आल्यानंतर देशातील शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले आहेत.शेतकऱ्यांना भाजपा सरकारच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ देण्यात आला, असे स्वतःशेतकरी सांगतात.पंतप्रधान मोदी यांनी २०१८ मध्ये पंतप्रधान किसान सन्मान योजना सुरु केली.यात दोन हेक्टरपर्यंतच्या ( ५ एकर ) शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये देण्यात येतात.महाराष्ट्रातील ८० टक्के शेतकऱ्यांना याचा लाभ मिळत आहे. केंद्राप्रमाणे महाराष्ट्रातही शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदतीची योजना सुरु करण्याचे वचन भाजपाने दिले होते. त्याप्रमाणे शिवसेना व भाजपा सरकारने दिली होती. त्यानुसार 'नमो शेतकरी सन्मान योजना' जाहीर केली.त्यानुसार शेतकऱ्यांना केंद्राचे हजार व राज्याचे ६ हजार असे वर्षाला एकूण १२ हजार रूपये दिले जाणार आहेत. त्यासाठी २०२३-२४ मध्ये ६ हजार ९०० कोटींची निधीची तरतूद करण्यात येत आहे. शेतकऱ्यांसाठी दुसरी मोठी घोषणा म्हणजे राज्यातील शेतकऱ्यांना पीक विम्यासाठी आतापर्यंत विमा हप्त्याची दोन टक्के रक्कम भरावी लागत असे. शेतकऱ्यांवरचे हे ओझे कमी करण्यात येत असून ती रक्कम महाराष्ट्र सरकार भरणार आहे. शेतकऱ्यांनी केवळ १ रूपया भरून पीक विमा नोंदणी करावयाची आहे. यासाठी ३ हजार ३१२ कोटी रूपायाची तरतूद केली जाणार आहे. राज्यात गोपीनाथ मुंढे शेतकरी अपघात विमा योजना ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबाला संकटात आधार देणारी योजना आहे. यात शेतकरी सर्पदंश, विंचूदंश, पाण्यात बुडून, हिंस्त्र प्राण्याच्या हल्यात, पूरात वाहून जाणे, जंतूनाशक किटक फवारणी करताना मृत्यू , खून, नक्षलवाद्यांकडून हत्या झालेल्या कुटुंबास दोन लाख रूपये देण्याचे विमा योजना आहे. पण आता योजनेला सानुग्रह अनुदान योजना मंजूरी दिली आहे. यावर शासनाकडून संकटग्रस्त शेतकरी कुटुंबाला अनुदान दिले जाणार आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना अन्नाधान्यऐवजी वर्षाला १८०० रूपये दिले जाणार आहे.भाजपा नेत्यांना शेतील काय कळतय ?असे टोमणे म्हणणाऱ्या नेत्यांनी बळीराजांची केवळ सहानुभूती दाखवत मते लाटली आणि महाराष्ट्र लुटून स्वतःची घरे भरून भरून घेतली.पुढील अनेक पिढ्या त्यांचे कुटुंब त्यावर जगेल अशी सोय करुन ठेवलेली आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या विविध योजनेवर सुमारे २५ हजार २२२ कोटी रुपयाचा निधी खर्च केला जाणार आहे.राज्यात तुटपुंज्या वेतनावर संसाराचा गाडा चालविण्याचा सरकारने केला विचार केला. अंगणवाडी सेविका, मदनीस, अशा स्वंयसेविका, कोतवाल, आणि शिक्षण सेवकांच्या वेतनात वाढ केली आहे. तसेच १ हजारासाठी पोस्टात खेटे घालणाऱ्या निराधार व वयोवृध्दांच्या मानधन आता १५०० रुपये करण्यात आले आहे. पण निराधार योजनेसाठी उत्पन्न मर्यादा ४० हजार श्रावण बाळ योजनेनिवृत्तीसाठी २१ हजार रूपये मर्यादा आहे, त्यात वाढ होण्याची आवश्यकता आहे. धाराशीवच्या खासदाराने लोकसभेत याबाबतचा प्रश्न विचारला होता. इतेकच नव्हे, राज्यातील विविध समाज घटकांसाठी महामंडळे स्थापन करण्यात येत आहेत.त्यासाठी प्रत्येकी ५० कोटीची तरतूद केली गेली.यात लिंगायत समाजासाठी जगतज्योती महात्मा बसेश्वर आर्थिक विकास महामंडळ, गुरव समाजासाठी संत काशिबा गुरव युवक युवा आर्थिक मंडळ, वडार समाजातील युवकासाठी कै. मारूती चव्हाण आर्थिक विकास मंडळ, तसेच रामोशी समाजातील युवकांसाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ स्थापन केली गेली.इतकेच नव्हे, ॲटोरिक्षाचालक, टॅक्सी चालक मालकासासाठी सुध्दा आर्थिक महामंडळ स्थापन केले जाणार आहे. पण संत नामदेव महाराज यांचे नावाने शिंपी समाज बांधवासाठी आर्थिक विकास मंडळ, ब्राह्मण समाजातील तरूणांसाठी भगवान परशुराम महामंडळ स्थापन करण्याचा विसर पडला आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांची विंरगुळा केंद्र व वयोश्री योजना दहा ओळीत उल्लेख करुन बोळवण केली गेली आहे. तसेच राज्यात खासगी सावकारीने थैमान घालून अनेकांचा बळी घेतला आहे. शेतकरी या त्रासामुळे आत्महत्या करत आहेत. या अवैध सावकारी व्यवसायावर प्रतिबंध घालण्याचे कोणतेही पाऊले उचलेले गेले नाही. राज्यातील महिलाना प्रवासात पन्नास टक्के सुट तर 'लेक लाडकी' योजने अंतर्गत गरीब कुटुंबातील मुलींना जन्मापासून ते अकारावीपर्यत अनुदान व १८ पूर्ण झाल्यानंतर ७५ हजार रूपये देण्यात येणार आहेत. ज्या कुटुंबातील मुलीचे वडील मृत पावले आहेत, त्या मातेची चिंता दूर करण्यात आली आहे.त्याशिवाय ग्रामीण भागात मोदी आवास घरकूल योजने अंतर्गत सुमारे १० लाख बांधून देण्याचा संकल्प या सरकारने केला आहे.त्यावर ३ वर्षात सुमारे १२ हजार कोटी रूपये खर्च करण्याची योजना आहे. कीर्तन व प्रवचनाव्दारे समाजाचे प्रबोधन करणाऱ्यांसाठी आता श्रीसंत नामदेव महाराज कीर्तनकार सन्मान योजना नव्याने सुरु करण्यात येत आहे. जे स्व. बाळासाहेबांच्या पूत्राला सत्तेत असताना जमले नाही, ते शिष्यांनी करुन दाखविले आहे. महाराष्ट्रात हिंदुऱ्हदय सम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे नावाने सुमारे सातशे 'आपला दवाखाना' सुरू करण्यात येत आहेत. फडणवीसांनी पाच ध्येयावर म्हणचे राज्याचा अर्थसंकल्प आधारित असल्याचे सांगितले.त्यासाठी 'पंचमृत' या शब्दाचा प्रयोग केला की, लगेच पोटदुखी सुरु झाली. म्हणे! अमृत कोणी पाहिले नाही ? असा प्रश्न केला गेला.तेंव्हा गाढवाला गुळाची चव कशी कळणार ? असा टोला नेटकऱ्यांनी मारला.या अर्थसंकल्प म्हणजे 'गाजराचा हलवा' असा टोमणा मारला गेला.तसेच हातात भोपळे घेवून आंदोलन केले. विरोधी पक्षाचे आंदोलन म्हणजे या अर्थसंकल्पाने त्यांचा भ्रमाचा भोपळा फुटला आहे, असा टोला मुख्यमत्री शिंदे यांनी लगावला. कॉंग्रेस राजवटीत वीस कलमी, बारा कलमी, असे विविध विकासाचे गाजर दाखविले जात होते. मराठवाडा व विर्दभासाठी स्वतंत्रपणे कलमे जाहीर जात होती.त्या विकास कलमांचे काय झाले ? तेंव्हा रसाळीची मेजवाणी दिली जात होती की काय ? भाजपा विरोधी विव्दान मंडळी आता राज्याचे कसे होणार ? पैसा कोठून येणार ? याची चिंता करू लागले आहेत.राज्यात नेत्यांना भ्रष्टाचार व खंडणीसाठी मात्र पैसा कोठून येत होता ?राजकीय नेत्यांची संपत्तीत सतत वाढ कशी काय होते.लोकप्रतिनिधींच्या वेतन व सोयीवर करोडाचा खर्च हा जनतेच्या करातून होता ना! तेंव्हा चिंता, लाज वाटत नाही.मुख्यमंत्री शिंदे यांनी तर परवा ७० हजार कोटीचा सिंचन घोटाळ्याचा तत्कालिन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी शोध घेण्याचा प्रयत्न केलेला होता ? असा चिमटा घेतला. तेंव्हा भ्रष्टाचारावरून सवाल करणाऱ्यांच्या थोबडीत मारल्यासारखे चेहरे झाले होते. जेंव्हापासून सिंचन घोटाळ्यापासून शासनाने सिंचनक्षेत्राची आकडेवारी प्रसिध्द करणे बंद केले आहे.तसेच पक्ष घरचा, तेंव्हा बाप मुख्यमंत्री, मुलगा मंत्री, पिता पक्षाचे नेताचे, मुलगी, भाचा, काका, पुतणे यांना पक्ष उमेदवारी देते अख्खे घराणे खासदार, आमदार होते! यालाच लोकशाही म्हणावयाचे काय ?भाजपा विरोधी मंडळी म्हणजे 'धरले तरी चावतात सोडले तरी चावतात' अश्या प्रवृत्तीचे आहेत. आता शिवसेना व भाजपा सरकारने सामान्य माणसांच्या भल्यासाठी शासनाच्या तिजोरीवर भार टाकला तर बिघडले कोठे ? अंदाजपत्रकात २०२३-२४ या वर्षासाठी ५ लाख ४७ हजार ४५० कोटी रूपायाची तरतूद केली आहे.राज्याचे महसूली उत्पन्न ४ लाख ४९ हजार ५२२ रूपये असून खर्च ४ लाख ६५ हजार ६४५ कोटीचे रुपये अंदाजित केला आहे.परिणामी १६ हजार १२२ कोटी रूपये महसुली तूट येत आहे.राज्यकोषीय तूट वाढत चालली असून ती ९५ हजार ५०० कोटी ८० लाख रूपये आहे. महसूल तूट ही राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या एक टक्का व राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्के पेक्षा कमी ठेवण्यात शासन यशस्वी झाल्याचा दावा, फडणवीस यांनी केली आहे.पायाभूत सुविधा व उद्योग उभारणुवर भर देण्यात येत असल्याने राज्याच्या उत्पन्नात वाढ होईल, असे म्हणाले. अतिवृष्टीमुळे प्रजेचे, बळीराजाचे मोठे नुकसान होते.पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्रात अपेक्षित समाजाच्या भल्यासाठी समाधानकारक मदतवृष्टी होत आहे.त्यामुळे आज सर्वजण सुखावले आहेत, हे मात्र नक्की!






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

आणि मग ' किती सुंदर आहे. She is so talented.' मम्मी सुद्धा, रॉक स्टार सुद्धा असे इंग्रजाळलेले उद्‌गार कानी येतात. मोबाईलवर मराठी टाइप करताना मराठीचे जे काही खून पडतात ते तर भयानकच ! ऱ्हस्व, दीर्घ तर अजून पुढचा भाग...! त्याबद्दल मी इथे जास्त बोलत नाही.

म्हणून आमच्या मुलांना आवर्जून मराठी शाळेत टाकले पाहिजे. त्यांना सुदर मराठी पुस्तके वाचायला दिली पाहिजेत. त्यांची गोडी लावली पाहिजे. आधी आपण पालकांनी लावली पाहिजे. मराठी पुस्तके विकत घेऊन वाचली पाहिजेत. मराठी बोला, मराठी चाला, मराठी खा, मराठी प्या, मराठी झोपा, मराठी जागा, मी मराठी, बाणा मराठी, जात मराठी, पंथ मराठी, धर्म मराठी असे अंतर्बाह्य मराठीमय व्हा. आता होळी येते आहे. तेव्हा असा ' असा अवघा रंग एक झाला..' पाहिजे. ती खरी होळी. असे जेव्हा होईल तेव्हा मराठी जगेल, वाचेल, वाढेल. फक्त मराठी दिन साजरा करून नाही भागणार.

**सुरेश भटांच्या ओळींनी शेवट करू**
**या लाभले आम्हास भाग्य बोलतो**
**मराठी जाहलो खरेच धन्य ऐकतो**
**मराठी धर्म पंथ जात एक जाणतो**
**मराठी एवढ्या जगात माय मानतो**
**मराठी.**



## आनंदी पहाट

## कलेच्या माध्यमातून चैतन्याचे मनोमय दर्शन घडते

आधुनिक केसरी


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

जगण्यापलीकडच्या जीवनाचा अनुभव दृश्य कलांमधून अभिव्यक्त होण्यासाठी विश्वातील दृश्य वस्तूंना आपल्या मनात प्रथम अनुभवत्व येऊन त्यांचं मनःप्रतिमांमध्ये रूपांतर व्हावं लागतं. प्रत्येक कलावंत आणि संस्कृती यांच्या मनोभूमिकेनुसार हे अनुभवरूप वेगवेगळे असल्याचं समजून घेतलं पाहिजे. भारतीयांच्या विचारधारेनुसार विश्वातील ब्रह्मस्वरूप चैतन्य जडाचे अशाश्वत रूप घेऊन इंद्रियगोचर होतं. केवळ चैतन्य हेच अंतिम सत्य असल्याचं मानलं जातं. इंद्रियगोचर विश्व हे त्याचे बाह्यरूप अथवा प्रकृती किंवा माया असल्याचं देखील म्हंटलं जातं. म्हणूनच भारतीय कलेतील वास्तवता, ही पाश्चात्य प्रबोधनाप्रमाणे बाह्यविश्वातील वस्तूच्या निव्वळ गणिती मोजमापनातून निष्पन्न होणारी वास्तवता नसते; तर भारतीय तत्वज्ञानातील द्रष्टा - दृश्य - दर्शन ह्या त्रयीनुसार संवेदनक्षम द्रष्ट्याला दृश्याचं झालेलं दर्शन असतं. ते निव्वळ वस्तूंचं वस्तुनिष्ठ दर्शन नसतं; तर वस्तुमात्रात सळसळणाऱ्या केवळ चैतन्याचं मनोमय दर्शन असतं. ह्याची जाणीव आपल्या प्रत्येकानं करून घेतली पाहिजे. प्रत्येक कलेला आपापलं शास्त्र असल्याचं आपण समजून घ्यायला पाहिजे. गायन ही कला आहे; परंतू त्याची सुरुवातच शास्त्रीय संगीतानं होते. ख्याल, धृपद, धमार, टप्पा, ठुमरी, भजन, गजल असे काही महत्वाचे गायन प्रकार प्रचलित असल्याचं आपल्याला माहित आहेच. नृत्य ही देखील कला आहे; तरीही भरतनाट्यम, कथक, कथकली, कुचिपुडी, मणिपुरी, ओडिसी, मोहिनीअट्टम हे सर्वच शास्त्रीय नृत्य प्रकार आहेत. अलीकडच्या काळांत एकूणच अंधानुकरण आणि पाश्चात्यांच्या सांगीतिक संस्कृतीचा आपल्या नवीन पिढीवर असलेला पगडा ह्यामुळे गायन, नृत्य अशा कलेच्या शास्त्रीय बैठकीचं महत्व लोप पावत चाललं आहे, ही खेदाची बाब आहे. चित्रकलेच्या बाबतीत देखील साकारलेलं चित्र मॉडर्न आर्टच्या नावाखाली विचित्र असल्याची जाणीवच ह्या नवीन पिढीला होत नसल्याचं अधोरेखित करावं असं वाटतं.

## जखम भळभळतेय...

आधुनिक केसरी

संस्कारधन


सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग-65

हाता पायाला झालेल्या जखमातून जेव्हा रक्त भळभळ वाहत असतं तेव्हा नाना उपाय करून ते रक्त थांबवलं जातं. रक्त थांबतं. पण तिथे छोटीशी गाठ तयार होते रक्ताची. दोन-तीन दिवसांनी ती गाठ सुकते तिला खपली म्हणतात. दुखावरची खपली,जखमेवरची खपली..


जखम आतून ओली असते. पण ती खपली त्या जखमीचे संरक्षण करते. तिथे थोडा जरी धक्का लागला तरी वेदना होतात. जर खपली निघाली तर पुन्हा रक्त वाहतं, भळभळतं.तेव्हा जखमेला धक्का लागू नये म्हणून आपण खूप जपत असतो. कारण त्या वेदना आपल्याला सहन होत नसतात. ती जखम डोळ्याला दिसते. मग ह्रदयाचे काय ? ? ह्रदय तर कितीतरी वेळा रडते. दुःखी होते .जखमी होते .ह्रदयाला सुद्धा खूप खोलवर जखमा होतात. तिथे सुद्धा रक्त भळभळ वाहत असतं. मग शरीरावर दिसणाऱ्या जखमाना आपण इतकं जपतो ,तर ह्रदयाला, मनाला, होणाऱ्या जखमांना का नाही!!!

त्यांनाही जपलं पाहिजे. मनाची, ह्रदयाची काळजी आपली आपणच घ्यावी. त्याबरोबर दुसऱ्यांच्या मनाची ही काळजी घ्यावी. इतरांना रुचेल, पचेल एवढेच बोलावं. आपल्याला सहन होईल तेवढेच आपण घ्यावं. जास्त मनाला लावून घेऊ नये. ज्याने मनाला ओझं होईल, ह्रदयाला जखमा होतील, त्यातून रक्त भळभळेल. तेव्हा जरा जपूनच. आपल्या मुलांचे ह्रदय ,मन जपा .ते जखमी होणार नाही याची काळजी घ्या .खूप काही बोलून दुखावण्यापेक्षा काही वेळ मौनात रहा.हा सर्वोत्तम उपाय आहे. "मौनं सर्वार्थ साधनम". कोणतीही शिक्षा देताना त्यात राग नसावा .प्रेम असावं .शिक्षा नकोच. प्रेमाने सगळे प्रश्न सुटतात . प्रेमाने जग जिंकता येते असं म्हणतात .ते काही खोटं नाही. तेव्हा ह्रदयाला ,मनाला होणाऱ्या जखमांना जपूया. भळभळणाऱ्या रक्ताला थांबूया ....

## राजा आणि मूर्ख माकड

आधुनिक केसरी

एकदा एक राजा होता. त्याच्याकडे एक माकड होता जो त्याचा सर्वात चांगला मित्र होता. राजाचा मित्र असूनही वानर खूप मूर्ख होता. राजाच्या प्रेमामुळे, त्याला कोणत्याही निर्बंधाशिवाय राजवाड्यात सर्वत्र जाऊ दिल्या जात असे. राजवाड्यात तो राजेशाही म्हणून आदरणीय होता आणि अगदी राजाच्या खोलीत अगदी आरामात राजाच्या खोलीत येऊ शकत असे जेथे राजाच्या गुप्त सेवकांना सुद्धा जाण्यास परवानगी नसे. एक दिवस दुपारची वेळ होती. राजा त्याच्या खोलीत विश्रांती घेत होता आणि माकडही त्याच वेळी जवळच्या गादीवर विश्रांती घेत होता. त्याचवेळी माकडाने पाहिले की एक माशी राजाच्या नाकावर बसली आहे. माकडाने टॉवेल घेऊन माशी दूर नेली. थोड्या वेळाने पुन्हा माशी परत आली आणि राजाच्या नाकावर बसली. माकडाने त्याला आपल्या हाताने पुन्हा दूर नेले.
थोड्या वेळाने त्या माकडाने पुन्हा तीच माशी राजाच्या नाकावर बसलेली पाहली. आता



माकडाला राग आला आणि त्याने विचार केला की या माशाला मारणे हाच या समस्येवर तोडगा आहे. त्याचवेळी त्याने राजाच्या डोक्याजवळ ठेवलेली तलवार पकडून थेट माशीवर जोरदार हल्ला केला . माशी मेली नाही परंतु राजाचे नाक कापल्या गेले आणि राजा खूप जखमी झाला.
**शिकवण : मूर्ख मित्रांपासून सावध रहा. आपल्या शत्रूपेक्षा ते आपले अधिक नुकसान करु शकतात.**


## निरुपण

आधुनिक केसरी


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**तस्मात्त्वं हि कृपां कृत्वा**
**स्मारय नाम ते मया।**
**तस्माद् सिद्धाश्चतुवर्गा**
**भवन्ति नात्र संशयः ॥5 ॥**
**म्हणून तूच कृपा करून तुझे नाम माझेकडून स्मरवून घे. त्यामुळे चारही पुरुषार्थ सफल होतील, यात शंका नाही.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

**विषय विकार विलास में, चढ़त विकृत पसार । अबल हीन नीचे चले, बाढ़ कुबुद्धि कुचाल ।।१८।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय) ०४/०६/१८**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** इंद्रिय-विषय उपभोग सुखात विकृती अधिकाधिक वाढत जाते आणि त्यामुळे विषय-सुख-प्रलोभीचं अधःपतन व्हायला लागतं. मोहासक्त झाल्यामुळे त्याच्या बुद्धीमधे अंधःकार व्हायला लागतो. कुविचार आणि कुप्रवृत्तीमुळे जीवनाचे अधिकाधिक पतन होऊन त्याला महान अधोगती प्राप्त होते.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

निर्गुण निराकार,निर्विकार ब्रम्हस्वरूपाच्या वर्णनामध्ये श्रृंगाररस चालणार नाही. राजहंसासमोर नुसतेंच पाणी आणुन ठेवले तर चालणार नाही. अम्रुतासमोर ताकाची स्तुती योग्य नाही. त्याच प्रमाणे ज्यांना खरी परमार्थाची आवड आहे अशा साधकांना आत्मज्ञान पसंत पडते. ते ज्यात नाही तो ग्रंथ वाचून समाधान होत नाही.
साधकांना ग्रंथ उपयोगी पडतात. आत्मज्ञानाचें सुस्पष्ट वर्णन करून साधनमार्गाचे यथोचित वर्णन करणारे ग्रंथचं परमार्थ साधण्यासाठी उपयोगी पडतात. ज्याला आत्मकल्याण साधायचे आहे त्याने निरंतर अद्वेत ग्रंथाचे परिशीलन करत रहावे. एकान्तात जाऊन एकाग्र मनाने अद्वैत ग्रंथ अभ्यासावे. स्वतः चा व समाजाचा ऊध्दार करावा. संत मंडळी यासाठी तर आपल्या ग्रंथातुन समाजाला वारंवार बोध करतात.

## तुकाराम गाथा


आधुनिक केसरी

**स्मशान ते भूमि प्रेतरूप जन । सेवाभक्तिहीन ग्रामवासी ॥१ ॥**
**भरतील पोट श्वानाचिया परी । वस्ति दिली घरीं यमदूतां ॥ध्रु.॥**
**अपूज्य लिंग तेथें अतित न घे थारा । ऐसी वस्ती चोरां कंटकांची ॥२ ॥**
**तुका म्हणे नाहीं ठावी स्थिति मती । यमाची निश्चिती कुळवाडी ॥३ ॥**
**आहाकटा त्याचे करिती पितर । वंशीं दुराचार पुत्र जाला ॥१ ॥**
**गळे चि ना गर्भ नव्हे चि कां वांज । माता त्याची लाजलावा पापी ॥ध्रु. ॥ परपीडें परद्वारीं सावधान । सादर चि मन अभाग्याचें ॥२ ॥**
**न मळितां निंदा चाहडी उपवास । संग्रहाचे दोष सकळ ही ॥३ ॥**
**परउपकार पुण्य त्या वावडें । विषाचें तें कीडें दुग्धीं मरे ॥४ ॥**
**तुका म्हणे विटाळाचीच तो मूर्ति । दया क्षमा शांति नातळे त्या ॥५ ॥**
**श्वान शीघ्रकोपी । आपणा घातकर पापी ॥१ ॥**
**नाहीं भीड आणि धीर । उपदेश न जिरे क्षीर ॥ध्रु. ॥**
**माणसांसि भुंके । विजातीनें द्यावे थुंके ॥२ ॥**
**तुका म्हणे चित्त । मळिण करा तें फजित ॥३ ॥**

## भगवंताजवळ नामाचे प्रेमच मागा

आधुनिक केसरी

भगवंतापाशी मागणे मागताना काय मागाल ? तुम्ही त्याच्याजवळ नामाचे प्रेमच मागा; दुसरे काही मागू नका. देवाजवळ मागणे मागताना चूक होऊ नये. एखाद्या शिक्षकाने विद्यार्थ्यांना वर्षभर उत्तम रीतीने शिकविले, परीक्षेच्या वेळी परीक्षक कोणते प्रश्न विचारण्याचा संभव आहे हे सांगून, त्यांची उत्तरेही सांगून ठेवली; पण परीक्षक परीक्षा घ्यायला आला असता प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनीच द्यायची असतात. तिथे शिक्षक हजर असला, आणि विद्यार्थी उत्तर चुकीचे देतो आहे हे जरी त्याला दिसले, तरी तिथे त्याला काही बोलता येत नाही. तशी माझी स्थिती आहे. म्हणून मागणे मागण्याचे काम तुम्हालाच करायचे आहे. तेव्हा त्या वेळी चुकीने काही भलतेच मागू नका, एवढयाचकरिता हा इशारा आहे. कोणतीही परिस्थिती असली तरी त्यात भगवंताचे स्मरण ठेवावे, म्हणजे बऱ्यावाईट गोष्टींचा परिणाम मनावर कमी होतो. मनुष्यावर संकटे आली की तो घाबरतो. परंतु परमेश्वराचे अस्तित्व मानणाऱ्यांनी तरी असे करणे योग्य नाही. एखाद्या लहान मुलाच्या



बापाने डोक्यावर पांघरूण घेऊन बागुलबुवा केला तर ते मूल भिते; पण पांघरूणाच्या आत आपला बापच आहे असे त्याला समजले की ते घाबरत नाही. त्याप्रमाणे, प्रत्येक व्यक्तीने आपल्या बाबतीत घडणाऱ्या बऱ्यावाईट गोष्टी परमेश्वराच्या किंवा आपल्या गुरूंच्या इच्छेने होतात ही जाणीव ठेवावी. म्हणजे त्याला भिती वा दुःख वाटणार नाही, तसेच चांगल्या गोष्टी घडल्या तरी त्याबाबत आनंदातिरेकही होणार नाही. याकरिता सदासर्वकाळ भगवंताचे चिंतन करावे. आपल्या विचाराने ठरल्याप्रमाणे झाल्याने सुखच मिळते असे नाही. काही वेळेस आपल्या विचाराच्या उलट होऊनही मागाहून तसे झाल्यानेच बरे वाटते. म्हणजे कोणत्याही गोष्टीचे सुखदुःख तात्काळ कळत नाही हेच खरे. म्हणून जरा वेळ थांबून सुख किंवा दुःख मानू या. कर्ज फिटताना जसा आपल्याला आनंद होतो तसा देहभोग भोगताना आपल्याला आनंद झाला पाहिजे. प्रारब्ध टाळणे म्हणजे लोकांचे कर्ज बुडविणेच होय. आपला म्हणजे 'मी' पणाचा नाश, आणि प्रारब्धाचा नाश, बरोबर होतो. 'भगवंता, प्रारब्धाने आलेल्या दुःखाचा दोष तुझ्याकडे नाही. जर त्या दुःखामुळेच तुझे अनुसंधान टिकत असेल तर मला जन्मभर दुःखामध्येच ठेव,' असे कुंतीने भगवंताजवळ मागितले. यातले मर्म ओळखून वागावे, आणि काहीही करून अनुसंधानात राहण्याचा प्रयत्न करावा. **भगवंताला अशी प्रार्थना करावी की, 'देवा, प्रारब्धाने आलेले भोग येऊ देत; पण तुझे अनुसंधान मात्र चुकू देऊ नकोस.'**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, १२ मार्च २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१९४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

रविवार, १२ मार्च २०२३

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SUNDAY 12 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-194 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-5


# वाळवंटात विसावल्या वारकऱ्यांच्या राहुट्या

## अकराशे पोलिस, अडीचशे होमगार्डचा फौजफाटा सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथे नाथषष्ठीनिमित्त महाराष्ट्रातील कान्याकोपर्यातून आपआपल्या संस्थानच्या पाई दिंड्या व मानाच्या दिंड्या रविवारी पंचमीला सायंकाळपर्यंत पैठण शहरात दाखल होतात. या अनुषंगाने पोलीस प्रशासन सज्ज झाले असुन ५०० अमंलदार, १०० पोलीस अधिकारी, २५० होमगार्ड, तसेच स्वयंसेवी संघटनेचे स्वयंसेवक २५० व पोलीस पाटील यांच्यासह कर्मचारी दि.११ शनिवारपासून शहरातील विविध ठिकाणी चोक बंदोबस्त संभाजीनगर जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार यांच्यामार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल, पैठण पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे हे चोख बंदोबस्त ठेवणार आहे. शनिवारपासूनच गोदपात्र वाळवंट तसेच पैठण शहरात विविध भागात वारकऱ्यांच्या राहुट्या उभ्या करण्याची लगबग दिवसभर सुरु होती. जवळपास ५०० दिंड्यातील वारकरी पैठणकडे प्रस्थान करत आहेत. वारकऱ्यांच्या फडांमध्ये भजन कीर्तनादींचे आयोजन करण्यात येते. वाळवंटात कीर्तन ऐकण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी जमते. त्यासाठी दोन दिवस आधीच प्रत्येक फडकरी आपल्या दिंडीच्या सोईसाठी पैठणमधे येवून कीर्तन मंडप व राहण्याची सोय करत आहे.

**आपेगावात शेकडो दिंड्या दाखल :** दरवर्षी प्रमाणे नाथषष्टीला पाई दिंड्या पैठणला जाण्यासाठी आनेक मार्गाने येतात त्यापैकी एक म्हणजे संत ज्ञानेश्वर महाराज यांचे जन्मगाव आपेगावी चतुर्थीला शेकडो दिंडी मुक्कामी आसतात त्यांमुळे माऊलीच्या जन्मगावी षष्ठीअधिच वारकर्याचा मेळा भरतो . या सर्व मुक्कामी येत असलेल्या दिंड्यातील वारकऱ्यांना आपेगावकर पंगतीच्या माध्यमातून भोजनाची व्यवस्था गेल्या शेकडो वर्षांपासून करत आसल्याने आपेगावात शनिवारी जणू वारकऱ्यांचा मेळाच भरतो असेच वाटते .



# ईडीची दोन महिन्यात हसन मुश्रीफांवर तिसऱ्यांदा छापेमारी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** माजी कामगार मंत्री आ. हसन मुश्रीफ यांच्यावर ईडीकडून



शनिवारी तिसऱ्यांदा छापेमारी केली. आज झालेल्या छापेमारीमध्ये मुश्रीफ यांच्या कुटुंबीयांची कागलमधील निवासस्थानी तब्बल साडे नऊ तास चौकशी करण्यात आली. अधिकाऱ्यांनी सर्वांचा जबाब नोंदवून घेतला आहे. आतापर्यंत झालेल्या छापेमारीत तिन्ही वेळची एकच टीम होती.

सरसेनापती संताजी घोरपडे कारखान्याशी निगडीत कर्ज प्रकरणांची ईडीकडून हसन मुश्रीफ यांच्याशी संबंधित ईडीकडून चौकशी सुरु आहे. आतापर्यंत ईडीकडून हसन मुश्रीफ यांचे निवासस्थान, पुण्यातील ब्रिक्स कंपनीशी निगडीत तसेच सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखाना, मुलीचे घर, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुख्यालय तसेच कागल तालुक्यातील सेनापती कापशी आणि गडहिंग्लज तालुक्यातील हरळी येथील जिल्हा बँकेच्या शाखेवर छापेमारी करण्यात आली आहे. आतापर्यंत केलेल्या छापेमारीचा कोणताही तपशील समोर आलेला नाही. हसन मुश्रीफ यांच्याविरोधात आतापर्यंत ईडीकडून 35 कोटींच्या मनी लॉँड्रिंग प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मुरगूड पोलिस ठाण्यातही त्यांच्यावर 40 कोटींचा फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कागलमध्ये मुश्रीफ यांच्या निवासस्थानी ईडीची छापेमारी साडे नऊ तास सुरु होती. सकाळी सात वाजता ईडीचे पथक कागलमध्ये पोहोचले. छापेमारी सुरु असताना मुश्रीफ यांची दोन मुले घरी होती. दरम्यान, हसन मुश्रीफ अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी मुंबईत आहेत. मुश्रीफ यांच्या पत्नी सायरा यांनी घरात लहान मुलं तसेच मोठा मुलगा आजारी असतानाही ईडीकडून चौकशी होत असल्याची प्रतिक्रिया माध्यमांना दिली होती.

**आम्हाला गोळ्या घालून संपवून टाका :** दरम्यान, तिसऱ्यांदा ईडी कारवाईनंतर मुश्रीफ यांच्या पत्नीला भावना अनावर झाल्या . त्या म्हणाल्या की, कितीवेळा येणार या ठिकाणी ? किती त्रास द्यायचा ? रोज उठून तेच सुरू आहे, रात्रंदिवस जनतेसाठी राबणारा माणूस आहे आणि असं का करता ? आम्ही करायच तरी काय ? यांना सांगा आम्हाला एकदाच गोळ्या घालून संपवून टाकायला सांगा .

# अवकाळी पावसाचा २५० हेक्टरला फटका; आंबा पिकावर संकट

## वाढलेल्या उष्णतेचा फळांवर विपरीत परिणाम

आधुनिक केसरी न्यूज

**रायगड :** अवकाळी पडलेला पाऊस, त्यानंतर वाढलेले तापमान याचा विपरीत परिणाम आंब्यावर झाला आहे. अवकाळी पावसामुळे रायगड जिल्ह्यात २५० हेक्टर क्षेत्रावरील आंबा पिकाचे नुकसान झाले आहे. तापमान वाढल्यामुळे आंब्याची फळ मोठ्या प्रमाणात गळून पडण्यास सुरवात झाली आहे. आंब्यावरील संकटामुळे आंबा बागायतदार धास्तावले आहेत.

रायगड जिल्ह्यात आंबा लागवडीखालील एकुण ४२ हजार हेक्टर क्षेत्र आहे. यापैकी १४ हजार ५०० हेक्टर उत्पादनक्षम क्षेत्र आहे. यातुन दरवर्षी जवळपास २१ हजार ४२४ मेट्रीक टन एवढे उत्पादन अपेक्षित असते. यंदा मुबलक पाऊस आणि थंडी पडल्याने आंबा पिक चांगले येईल अशी अपेक्षा बागायतदारांना होती. परंतु अवकाळी पडलेला पाऊस, वाढलेले तापमान यामुळे फळ गळती झाली. रोहा व कर्जत तालुक्यात जास्त नुकसान झाले आहे. त्यामुळे उत्पादनात घट होणार आहे.

दरवर्षी आंब्याला ऑक्टोबर महिन्यात पालवी येण्यास सुरवात होते. जानेवारी महिन्यात या पालवीला मोहर येण्याची प्रक्रीया सुरु होते. मात्र या वर्षी हि प्रक्रीया उशीरा सुरु झाली. एकुण उत्पादनक्षम क्षेत्रापैकी ८० ते ८५ टक्के क्षेत्रावर मोहर आला होता. त्यामुळे एप्रिल महिन्यापासून कोकणातील आंबा बाजारात मुबलक प्रमाणात दाखल होण्यास सुरवात होईल अशी अपेक्षा होती. मात्र आंबा तयार होण्याच्या स्थितीत असतांनाच अवकाळी पाऊस पडला त्यानंतर तपमानात वाढ झाली. वाढलेल्या उष्णतेचा फळांवर विपरीत परिणाम दिसून येण्यास सुरवात झाली आहे. त्यामुळे हाता तोंडाशी आलेले पिक नष्ट होईल की काय अशी भिती बागायतदारांना वाटते आहे. अवकाळी पावसामुळे रायगड जिल्ह्यात २५० हेक्टर क्षेत्रावरील आंबा पिकाचे नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे सुरु करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांनी तलाठी किंवा कृषी विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

डी. एस. काळभोर, कृषि उपसंचालक, रायगड

अवकाळी पावसापेक्षा उष्णतेचा मोठा फटका पिकावर झाला आहे. मोहर येण्याच्या स्थितीत उष्णता वाढल्याने अपेक्षित फळधारणाच झाली नाही. त्यामुळे यावर्षी चांगल्या पिकाची आशा धुळीला मिळाली आहे.

# कांदा प्रश्नावर सरकारची केवळ चर्चा : पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मध्य प्रदेश आणि गुजरात सरकारने कांदा उत्पादकांना काहीतरी मदत केली असताना महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केवळ चर्चा करीत आहेत, अशी टीका राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली. येथे पत्रकारांशी संवाद साधताना पवार यांनी कमी दरामुळे कांदा उत्पादकांच्या होणाऱ्या नुकसानीकडे लक्ष वेधले. नाशिकसह राज्यातील अनेक भागात कांद्याचे उत्पादन घेतले जाते. घसरत्या कांदा दरामुळे सर्वत्र एकसारखी स्थिती आहे. कांदा उत्पादनाचा खर्च आणि विक्रीतून येणारी रक्कम पाहता शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. यावर राज्य सरकारने नुकसान होणाऱ्या उत्पादकांना प्रतिकिलो मदत द्यावी आणि राज्य-केंद्र सरकार तसेच नाफेडने कांदा निर्यातीचा मोठा कार्यक्रम राबवायला हवा, हे दोन पर्याय त्यांनी सुचविले. कुठल्याही परिस्थितीत निर्यातीवर बंदी असता कामा नये. नाफेडकडून शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत खरेदी करण्यात येत असल्याचे सांगितले जात असले तरी बाजार समितीत ते कांदा खरेदी करताना दिसत नाही. बागायती शेतकऱ्यांची कापूस व तत्सम नगदी पिके असतात. पण, जिरायती शेतकऱ्यांचे कांदा हे मुख्य पीक आहे. त्यांना अधिकाधिक मदतीची आवश्यकता असल्याचे पवार यांनी नमूद केले.

# व्यसनमुक्ती केंद्रात रुग्णाला दीड तास मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**पाटण :** गुजरातमधील पाटण शहरातून एक हृदद्रावक घटना समोर आली आहे. येथील एका व्यसनमुक्ती केंद्रात उपचार घेणाऱ्या रुग्णाला जबर मारहाण करण्यात आली. मारहाण करणारे नराधम एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी रुग्णाच्या प्रायव्हेट पार्टला आग लवली. यात रुग्णाचा मृत्यू झाला. रुग्णाच्या मृत्यूनंतर व्यसनमुक्ती केंद्राच्या व्यवस्थापकांनी सांगितले की, आजारपणामुळे त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर त्यांनी रुग्णाच्या नातेवाईकांच्या उपस्थितीत मृतदेहावर अंत्यसंस्कार केले. परंतु पोलिसांनी व्यसनमुक्ती केंद्रातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचं फुटेज तपासल्यानंतर या प्रकरणाचा खुलासा झाला.

पोलिसांनी व्यसनमुक्ती केंद्राच्या व्यवस्थापकांसह सात जणांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी या प्रकरणातील सहा आरोपीना अटकदेखील केली आहे. पोलीस आरोपींकडे सध्या चौकशी करत आहेत. सीसीटीव्ही फुटेज पाहिल्यानंतर लक्षात आलं की, आरोपींनी रुग्णाला तब्बल दीड तास मारहाण केली होती. मारहाण केल्यानंतर रुग्ण जेव्हा अर्धमेल्या अवस्थेत होता, तेव्हा आरोपींनी त्याच्या प्रायव्हेट पार्टवर पेट्रोल टाकून आग लावली. त्यात रुग्ण हार्दिक सुधार याचा मृत्यू झाला. त्यानंतर व्यसनमुक्ती केंद्राच्या व्यवस्थापकांनी रुग्णाच्या कुटुंबियांना बोलावले आणि सांगितले की, उपचारांदरम्यान आजारपणामुळेच हार्दिकचा मृत्यू झाला. रुग्णाच्या कुटुंबियांनी व्यवस्थापकांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून अंत्यविधी पूर्ण केले. परंतु पोलिसांना या प्रकरणाची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी व्यसनमुक्ती केंद्रातील सीसीटीव्ही फुटेज पाहिलं. ज्यामुळे या हत्येची माहिती मिळाली.

# सामाजिक चळवळ आणि प्रशिक्षण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**सरकारी ध्येय धोरणाची अंमलबजावणी होताना शेवटच्या घटकापर्यंत त्याचा लाभ पोहचणे आवश्यक असते. हे पाहण्यासाठी शासनाची स्वतःची यंत्रणा असते. ही यंत्रणा सक्षमपणे कार्य करण्यात कमी पडू लागल्यास आणि समाज घटकांच्या स्वाभिमानास ठेच पोहचल्यास सामाजिक चळवळीचा उदय होतो. सुरवातीला हा रोष विखुरलेल्या स्वरूपातच व्यक्त होत असतो. अधिकाधिक समविचारी किंवा समदुःखी लोकांच्या प्रतिक्रियेची गोळाबेरीज म्हणजे सामाजिक चळवळीचे उदयस्थान असेच काहीसे ओबडधोबड स्वरूप त्याचे असते. आपले म्हणणे नीटपणे समाजासमोर आणि शासनाकडे मांडण्यासाठी या चळवळींना प्रशिक्षणाची नितांत आवश्यकता असते.**


भारतात वेगवेगळ्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे स्वरूप लक्षात घेतल्यास सर्वच चळवळी आणि त्यांचे कार्यकर्ते हे प्रशिक्षित आहेत असे म्हणणे धाडसाचेच ठरेल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि डाव्या विचारांच्या चळवळी सोडल्यास बाकी जेवढ्या चळवळी आहेत त्यापैकी फार कमी लोकांना नियमितपणे प्रशिक्षण मिळते. किंबहुना त्यांना प्रशिक्षणाची काही आवश्यकता असते हेच मान्य नाही. आपल्या संविधानातील प्रास्ताविकेतील समाजवाद या घटकापासून सरकारची ध्येय धोरणे विसंगत वाटू लागल्यास समाजमनात कालवाकालव सुरू होते. ग. प्र. प्रधान यांनी नव्वदीच्या दशकात म्हटले होते की, गेल्या चार वर्षात सत्ताधारी काँग्रेस पक्षाने या ध्येयाला बाजूला सारून नव्या आर्थिक धोरणात सर्व गोष्टी खासगी क्षेत्राला खुल्या करून समाज परिवर्तनाची जबाबदारी शासनावर नाही असे जाहीर केले आहे. या परिस्थितीत उद्यासाठी या देशातील शेतकरी, शेतमजूर, असंघटित कामगार आणि मध्यमवर्ग यांनी एकजूट करून लढा दिला पाहिजे. असा लढा आपण जर करू शकलो नाही तर फक्त मूठभर श्रीमंतांचा विचार करणारा समाज अस्तित्वात येईल अशी भीती मला वाटते. प्रधान सरांची ही भीती आज तंतोतंत खरी ठरू पाहत आहे. त्यांच्या म्हणण्यातील हा आशय खरा ठरताना त्यांनी जो आशावाद व्यक्त केला होता तो मात्र पूर्ण होताना दिसून येत नाही. कारण नाही म्हटले तरी डाव्या आणि उजव्या अशा दोन भागात बहुतांश समाज विभागला गेला. जे डावेही नाहीत आणि उजवेही नाहीत अशा लोकांचे आणि त्यांच्या चळवळीचे स्वरूप विस्कळीत आहे. समाजातील प्रज्ञावंत लोकांनी अशा चळवळीचे नेतृत्व करून त्यास योग्य दिशा प्रदान केल्यास नक्कीच फरक पडू शकतो. श्रीमंत घरातील लोकांना चळवळी करण्याचे काहीच कारण नाही, त्यांचे बरे चाललेले असते. अपवादात्मक परिस्थितीत ज्यांच्या जाणिवा व्यापक आहेत तीच मंडळी सामाजिक चळवळीत सहभागी होतात. दुसरीकडे वंचीत घटकातील ज्याला व्यवस्थात्मक संधी मिळाली त्याचेही अलबेल असल्यामुळे फक्त स्वतःचे हित साधत कूपमंडूक जीवन जगताना दिसतो. चूक अथवा बरोबर हे तुम्ही ठरवा पण शरद जोशींच्या नंतर शेतकऱ्यांना आपला कोणी वाली ठरेल असा नेता दिसत नाही. आज शेतकऱ्यांचे प्रश्न मिटले आहेत का ? बाबा आढाव आणि बाबा आमटे यांचे स्वप्न पूर्ण झाले म्हणून त्यांनी चालू केलेल्या लोक आंदोलनाची आज आवश्यकता नाही असे आपणास वाटत असेल तर आपण दुधखुळे आहोत. प्रश्न तर मिटले नाहीतच उलट आणखी गंभीर झाले आहेत. जर प्रश्न मिटले नसतील तर मग मरगळ कशी आली ? हा साधा प्रश्न आपल्यासमोर आहे. त्याचे उत्तर असे की, चंगळवादी समाज व्यवस्थेमुळे आणि एकल अर्थशास्त्रीय विचारामुळे आपण फक्त समूह म्हणून एकत्र आहोत, पण समाज म्हणून जो एक अनौपचारिक एकजिनसीपणा हवा असतो तो मात्र हरवून बसलो आहोत. अनेक क्षेत्र आणि त्या क्षेत्रातील विविध प्रतवारीत आजचा माणूस अडकून पडल्यामुळे एखाद्या शेतकऱ्याचा प्रश्न वैद्यकाला आपला वाटत नाही आणि असंघटित कामगारांच्या प्रश्नांशी शिक्षकांचे काही कर्तव्य नसते. व्यवस्थात्मक अशा प्रकारची फोड करणे कोणत्याही काळात धोरणकर्त्यांना हवीच असते. प्रश्न आहे तो आपण एक समाज म्हणून इतरांचे प्रश्न समजून घेण्याचा. सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्यांचे



## क्षितिजापल्याड

प्रशिक्षण करायचे किंवा द्यायचे म्हणजे नेमके काय करायचे. तर आपण एक व्यक्ती म्हणून व्यवस्थात्मक पातळीवर शून्य आहोत, हे अगोदर बिंबवावे लागेल. कारण लोकशाही शासनव्यवस्थेत मतदान प्रक्रियेपुरता मतदार म्हणून मान मिळणे वेगळे आणि समाजघटक या नात्याने त्याचा विचार होणे निराळे. सबंध समाजाचा विचार केल्याशिवाय आध्यात्मिक क्षेत्र वगळल्यास तुमची मुक्ती नाही, हे प्रथम पटवून द्यावे लागेल. कोणास चांगली कविता लिहिता येत असेल, एखाद्यास चांगले लिहिता येत असेल किंवा कोणास चांगले बोलता येत असेल तर त्याने आपली वाणी आणि लेखणी समाजाच्या हितासाठी वापरली पाहिजे. कृष्ण संख्यांच्या मिलनाची, खूप झाली ती रडगाणी असे काणेकर का म्हणाले होते, याचा सुद्धा विचार झाला पाहिजे. जी चळवळ सर्वांना सोबत घेऊन, सर्वांच्या प्रश्नाचा एक लसावी काढण्यात यशस्वी होते तीच चळवळ लोकोपयोगी होऊ शकते, अन्यतः चळवळीची शाल पांघरून स्वार्थ साधणाऱ्यांचा मोठा इतिहास सर्वज्ञात आहेच. चळवळीतील नेतृत्वाला निस्पृह असणे महत्त्वाचे असले तरी त्यास निरंकुश मात्र होता येणार नाही. बहुतांश सामाजिक चळवळी या दोन कारणांच्या व्यत्यासामुळेच इतिहास जमा झाल्याचे आपण पाहतो. चळवळीतील प्रत्येक कार्यकर्ता तेवढ्याच तोलामापाचा असेल असे गृहीत धरणे हे सुध्दा चूक ठरेल. पण त्याचाही उपयोग चळवळीला होतच असतो. सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे या उक्तीप्रमाणे अधिकाधिक विकसित होण्यासाठी आणि संघभावना निर्माण होण्यासाठी चळवळ अत्यंत महत्त्वाचे कार्य करते. जिला आपण सामाजिक चळवळ म्हणतो अशी कोणतीही चळवळ लोकशाही मूल्यांचा परिपोष करून समाजात आपलेपणाची भावना निर्माण करणारी असावी. विविध समाजगटात वैमनस्य निर्माण करणे आणि अशांतता वाढीस लागणे हे चळवळीच्या विकासाच्या दृष्टीने अहितकारक असते, या विचाराचे बीजारोपण प्रशिक्षण कार्यक्रमातून झाले पाहिजे. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# नात्यांमधील सुसंवाद



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**पूर्वी कोणी एकटा नव्हता. प्रत्येकाला आई वडील बहीण भाऊ मामा मामी मावशी काका व हे कमी झाले म्हणून की काय मानलेले सुद्धा नाते असायचे. त्यामुळे माणूस हा एकटा नव्हता. मामाकडे, मावशीकडे, बहिणीच्या सासरी राहून शिक्षण पूर्ण केलेली अनेक उदाहरणे आपल्याजवळ आहेत. खेड्यातील नातेवाईक मुलीच्या लग्नाच्या वेळी तिला दाखवण्यासाठी शहरातील नातेवाईकांकडे आणून ठेवायचे व इथेच दाखवण्याचे कार्यक्रम होत राहायचे. त्यात कुणाला काही अवघड वाटत नव्हते.**

प्रत्येक जण आपल्या नात्याच्या हक्कामुळे येऊन राहायचा. लग्न समारंभ असले की पाहुणे राहूणे खूप यायचे. अगदी आठ दहा दिवस सुद्धा त्यांचा मुक्काम असायचा. घर गजबजलेलं असायचं. प्रत्येकामध्ये संवाद होता. त्यामुळे भावभावना एकमेकांना कळत होत्या. सर्वजण भावनेने, प्रेमाने बांधल्या गेलेले होते. काळ बदलत गेला. संवाद कमी होत गेला. भावना तर राहिल्याच नाहीत. पूर्वी लग्नासाठी आठ आठ दिवस येऊन राहणारे पाहुणे आता लग्नाच्या दिवशीच किंवा फार फार तर आदल्या दिवशी येतात. व लग्न झालं की संध्याकाळची गाडी पकडून आपापल्या घरी रवाना होतात. पूर्वी मामा मावशीकडे राहून शिक्षण घेणारे विद्यार्थी आता होस्टेलमध्येच राहणे पसंत करतात. पूर्वी मामा भाचीच्या लग्नाची काळजी करायचा. आता भाची किंवा तिचे आई-वडील तिचे पाहायला सक्षम आहेत. पूर्वी लोक दूर राहायचे. दळणवळणाचे साधन कमी होते. तरीपण कोणत्या ना कोणत्या निमित्ताने जरूर भेटायचे. भेटायची ओढ होती. आता साधने वाढलेली आहेत. संपूर्ण जग जवळ आलेले आहे. पण मन मात्र दूर गेलेले आहे. त्यामुळे पूर्वी एकमेकांना हमखास भेटणारे नातेवाईक सुद्धा आता एकमेकांना भेटेनासे झालेले आहेत. कसेबसे लग्नाच्या निमित्ताने भेटतात. तेवढेच. एकंदरीत संवाद कमी होत चाललेला आहे.

नवरा बायकोशी बोलतो तेही कामापुरतं. बायको बोलते तेही कामापुरतं. आई वडील मुलांशी बोलतात तेही कामापुरते. उठला का ?तयारी झाली का ? किती वेळ लावतोस ?असे संवाद आहेत. बायको सुद्धा नवऱ्याला हे आणले का ? ते आणले का ? ते का नाही आणले ? आपल्याला कुठे जायचे आहे ? केव्हा जाणार ? असे प्रश्न विचारते. तर नवरा अजून झाले नाही का ? तुला सांगितले होते ना !अशा पद्धतीचे संवाद बोलत असतो. घरातील म्हातारे आई-वडील आपसात बोलत असतात पण त्यांच्याशी बोलायला कोणाला वेळ नाही .आजकाल माझे निर्णय हे माझे किंवा फार फार तर माझे व माझ्या बायकोचे आहेत. आई-वडिलांचा निर्णयामध्ये सहभाग काही नाही. जरी करणारा मी आहे. पैसे खर्च करणारा मी आहे. तरीही सुद्धा आई-वडिलांना विचारलं तर बिघडते कुठे. परंतु संवादच नसल्यामुळे त्यांना विचारणे दुरापास्त झालेले आहे. संपूर्ण परिवाराने एकत्र बसणे. दिवसभरात घडलेल्या गोष्टींची चर्चा करणे. त्याबद्दलची माहिती मुलांना देणे. त्या घटनेचे अर्थ त्यांना समजावून सांगणे हे बंद झालेले आहे. बँकेत पैसे असतील तर तुम्ही काढू शकाल. नात्यांचे ही तसेच आहे. मायेचा ओलावा असेल तर तुमच्या अपेक्षा पूर्ण होतील अन्यथा त्या निष्फळ होतील. एखाद्या मध्ये सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता असेल तर त्याच्याशी तेवढे संबंध पाहिजे. जेणेकरून तो तुमचा ऐकेल. शेजारच्यांची गोष्ट असू द्या परंतु घरातल्या मुला मुलींकडे सुद्धा लक्ष देण्यास आम्हाला तेवढा वेळ नाही. आम्ही त्यांना फक्त साधन पुरविणारे झालेलो आहोत. त्यांच्या भावनिक गरजांची पूर्तता मात्र होताना दिसत नाही. किंवा आम्ही ते समजून घेत नाही असेही होऊ शकते. यासाठी त्यांना वेळ देण्याची आवश्यकताच आहे. त्यांच्याशी संवाद साधण्याची आवश्यकता आहे. धर्मामुळे नैतिक मूल्य मिळतात. धर्म ही नैतिक मूल्यांची संपत्ती आहे. आमचे सर्व रितीरिवाज, आमची संस्कृती या सर्व गोष्टी नैतिकतेची शिकवण देणारे आहेत. परंतु सणांच्या मागे असलेला अर्थ, त्यामागची कथा, आम्ही मुलांना सांगत नाही किंवा आम्ही सांगणे बंद केलेले आहे आणि त्यांचे ऐकणे पण बंद झालेले आहे. त्यांचे ऐकणे बंद झाले असले तरी सुद्धा सांगण्याची आवश्यकता ही आमचीच आहे. आम्हाला ती पूर्ण करायची आहे. कारण आज जर त्याला सणवार, रीती रिवाज, संस्कृती, धर्म माहीत झाला नाही तर उद्या तो एक कोरडा मनुष्य होईल. आमच्या देशांवर शेकडो वर्षे मुघलांची आक्रमणे सुरू होती. बादशाहया सुरू होत्या. त्यानंतर दीडशे वर्ष इंग्रज होते. राज्यकर्ते कुणीही असले तरीसुद्धा आमचा धर्म जिवंत राहिला. याला कारण आम्ही पिढी दर पिढी त्या विचारांना संक्रमित करीत राहिलो. आमच्या आजोबांनी वडिलांना, वडिलांनी आम्हाला धर्म दिला. आम्ही तो आमच्या भावी पिढीला दिला पाहिजे. ही जबाबदारी आमची आहे. टीव्ही मोबाईलच्या जगामध्ये सर्व लोक त्यात गुंतून बसलेले आहेत. कोणाला कोणासाठी वेळ नाही. छोट्याशा राजूला म्हटले राजू इकडे



ये तर राजू म्हणतो लवकर सांगा मला वेळ नाही. शाळेत जाणाऱ्या दादाला म्हटले अरे इकडे येतोस का ? तर तो म्हणतो लवकर सांगा माझा ऑटो येणार आहे. कॉलेजमध्ये जाणाऱ्या ताईला म्हटले ताई ऐकतेस का जरा तर ताई म्हणते आता नाही. मला आता वेळ नाही नंतर ऐकते. दादाला म्हटले तर दादा कानामध्ये हेडफोन घालून आहे त्याला तर ऐकायला वेळच नाही. ऑफिसात जाणाऱ्या बाबांना म्हटले ते म्हणतात हा लवकर सांगून टाक मला आता जायचे आहे. आईला म्हटलं तरआई म्हणते मी कामात आहे. प्रत्येक जण कामात आहे. कोणालाच वेळ नाही अशी परिस्थिती आहे. अशानी नात्यांना पाठबळ कसे मिळेल ? नाते फुलतील कसे ? बहरतील कसे ? त्यांना खतपाणी घालण्याची आवश्यकता आहे. त्यांना फुलविण्याची आवश्यकता आहे. जर ते फुलले बहरले तर कोणालाही मी एकटा आहे असे वाटणार नाही. माझे यश हे माझे यश आहे .परंतु माझे यश हे आमच्या सर्वांचे आहे हे म्हणण्याची सवय लागेल. माझे अपयश हे माझे असेल तरीही त्या अपयशांमध्ये माझ्यासोबत माझा परिवार उभा राहील. माझे नातेवाईक उभे राहतील. आई-वडील मुलांच्या जन्माला पुरणार नाहीत. आमच्या नंतर म्हणजे आई-वडिलांचे आयुष्य संपल्यानंतर सुद्धा मुलांकडे बघायला त्यांची काळजी घ्यायला कोणीतरी असायला पाहिजे. हे कोणीतरी म्हणजे आमचे मित्र असू शकतात, आमचे नातेवाईक असू शकतात. हे सर्व लोक भविष्यकाळात आमच्या मुलांसोबत राहणार आहेत. त्यामुळे ह्या सर्वांशी संवाद निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यांच्याशी भावनिक संबंध निर्माण करण्याची आवश्यकता आहे. संवाद हा सुसंवाद असला पाहिजे. आमच्यात कटूतेचे प्रसंग आले असतील. कदाचित येतील ही. परंतु ती कटूता ज्या विषयाबद्दल असेल त्या विषयाबद्दलच मर्यादित ठेवायला हवी. एक उदाहरण मला माहिती आहे. अण्णासाहेब नावाचे गृहस्थ होते ते एका शाळेचे संचालक होते व अध्यक्षही होते. काही काळानंतर त्यांनी काही नवीन लोकांना संचालक मंडळामध्ये घेतले. त्यात एका तरुण व्यक्तीला अध्यक्ष होण्याचा मोह झाला. त्यांनी अध्यक्ष पदावर दावा केला. कोर्टात केस उभी राहिली. एके दिवशी अण्णासाहेब त्या गावी गेले. तडक त्या तरुण अध्यक्षाच्या घरी गेले. त्याच्याच घरी आंघोळ पांघोळ करून जेवण करून त्याच्यासोबत कोर्टात गेले व केस लढले. यावरून आपल्या असे लक्षात येईल की अण्णा साहेबांच्या मनात कोर्टातला विचार हा कोर्टापुरता मर्यादित होता. त्यांच्या मनात कुठलीही कटूता नव्हती. आम्ही सुद्धा नात्यांमधील कटूता ही मर्यादित स्वरूपात ठेवायला पाहिजे. आनंदाचे प्रसंग आम्ही एकत्र येऊन आनंद साजरा करायला पाहिजे. कटूता हे जीवन नाही. नेहमीच ती कटूता घेऊन एकमेकांबद्दलचे मत खराब करीत एकमेकाला दूषणे देत जीवन जगणे यात मजा नाही. आमचा जीवन प्रवास हा आनंदाचा झाला पाहिजे. यासाठी सखेसोयरे, नातेवाईक, मित्र हे सगळे आमच्या सोबत आहेत आम्ही सगळे सोबत राहू, आनंदी राहू, यासाठी सुसंवाद साधू असा निश्चय करायला पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# सासुरवाडीला आलेल्या जावयाची कार पेटवली; सात लाखांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** अज्ञात कोणीतरी व्यक्तीने सासुरवाडीला आलेल्या जावयाची कार पेटवून दिली या आगीत कारचे जळून सुमारे ७ लाख रुपयाचे नुकसान झाले. ही घटना ८ मार्च रोजी मध्यरात्री १२ च्या सुमारास मार्डी, ता. उत्तर सोलापूर येथील गावातील नागनाथ मंदिराजवळ घडली. याबाबत, ज्ञानेश्वर भीमराव लिगाडे, रा. सांगोला जि. सोलापूर यांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध फिर्याद दिली आहे. सांगोला येथील अरुण उर्फ ज्ञानेश्वर लिगाडे हे कुंटूंबास मंगळवार ७ मार्च रोजी दुपारी अडीच सुमारास एम एच -४५-एक्यू-४०२५ या कारमधून मार्डी, ता.उत्तर सोलापूर



येथील सासरे सुनील मुडके यांच्या घरी आले होते. दरम्यान दुसऱ्या दिवशी ८ मार्च रोजी त्यांनी कुटुंबासह तुळजापूर येथे देवदर्शन केले.देवदर्शन करून परत आल्यानंतर सायंकाळी ६ च्या सुमारास सदर कार सुनिल मुडके यांच्या घराचे बाजुस असलेल्या मोकळ्या जागेत लावली होती. रात्री जेवण झाल्यावर सर्वजण घरात झोपले होते हीच संधी साधून अज्ञात कोणीतरी व्यक्तीने रात्री ११:४५ च्या सुमारास त्याची कार पेटवली. गावातील आबा सुरवसे यांनी सदरची घटनेची माहिती सुनील मुंडके यांना दिली त्यांनी झोपेतून उठून घरातून बाहेर येवून पाहिले असता गाडी पेटलेल्या अवस्थेत निदर्शनास आली. नातेवाईकांसह इतरांच्या मदतीने त्यांनी पेटलेल्या गाडीवर पाणी फवारून गाडी विजवली.या आगीत कारचे जळुन सुमारे ७ लाख रुपयाचे नुकसान झाले आहे. तपास एएसआय श्रीमती शारदा घोळवे करीत आहेत.

# जिंतूरात आज महारोजगार मेळाव्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बी. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** येथे महा रोजगार मेळाव्याचे आयोजन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र परभणी व दीपस्तंभ प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने 12 मार्च 2023 रोजी आयोजित करण्यात आले आहे.




याबाबत मिळालेली माहिती अशी की जिंतूर येथील बोर्डीकर पोदार इंटरनॅशनल स्कूल परभणी रोड,जिंतूर येथे कौशल्य रोजगार उद्योजक्ता व नाविन्यता विभाग जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र परभणी व दीपस्तंभ प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळावा चे आयोजन जिंतूर सेलू मतदारसंघातील लोकप्रिय आमदार मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक 12 मार्च 2023 रोजी आयोजित करण्यात आले असून या मेळाव्यात जास्तीत जास्त सुशिक्षित बेरोजगारांनी उपस्थित राहण्याच्या आव्हान आयोजकांनी केले असून याच महा रोजगार मिळाव्यात त्याच ठिकाणी नियुक्तीपत्र देण्यात येणार असल्याचेही म्हटले आहे. तर या मेळाव्यात 3300 पेक्षा जास्त रिक्त पदी उपलब्ध असल्याची माहिती आयोजकाकडून मिळाली असून या मेळाव्यात भारतातील नामांकित कंपन्यांचाही सहभाग राहणार आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाचे विविध महामंडळ अण्णा भाऊ साठे, अण्णासाहेब पाटील विकास महामंडळ, महात्मा फुले विकास महामंडळ, संत रोहिदास महामंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्यांक महामंडळ, खादी ग्रामोद्योग महिला आर्थिक विकास महामंडळ, अशा ईतर महामंडळ सहभागी होणार असल्याचे समजते. याशिवाय जिल्ह्यातील राष्ट्रीय बँक बरोबर पुणे, औरंगाबाद येथील प्रायव्हेट लिमिटेड कंपनी ही सहभागी होणार आहेत. तरी युवक युवतींनी यामध्ये सहभाग नोंदवावा असे आव्हान आयोजकातर्फे करण्यात आले आहे.

# अझीम प्रेमजी यांना यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** यशवंतराव चव्हाण यांची ओळख संयुक्त आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, भारताचे उपपंतप्रधान तसेच महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री अशी आहे. देशातील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात त्यांनी अमूल्य योगदान दिले आहे. त्यामुळेच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे व्यक्ती किंवा संस्थांना त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. सन २०२२ चा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार प्रख्यात उद्योगपती, व्यापारी आणि शिक्षण क्षेत्रात अग्रणी असणारे दानशूर, परोपकारी श्री. अझीम प्रेमजी यांना प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार प्रदान सोहळा १२ मार्च २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय एकात्मता, संवैधानिक मूल्यांचे जतन, भारताच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात योगदान देणाऱ्या क्षेत्रात भरीव आणि अग्रेसर कार्य करणाऱ्या व्यक्तीला किंवा संस्थेला दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी प्रतिष्ठानतर्फे नामांकन मागविण्यात येतात. पाच लाख रुपये आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्काराने यापूर्वी डॉ. जयंत नारळीकर, श्री. आर. के. लक्ष्मण, सुश्री महाश्वेता देवी, भारतीय वायुसेनेचे मार्शल अर्जन सिंग, श्री रतन टाटा आदींना सन्मानित करण्यात आले आहे.

# मनीष सिसोदियांना सात दिवसांची ईडी कोठडी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** साटेलोटे असलेल्या 'दक्षिण गटा'तील खासगी कंपन्यांना मद्य विक्रीचा घाऊक परवाना देण्याच्या कारस्थानामध्ये मनीष सिसोदिया सहभागी झाले होते. मद्य विक्रेत्यांचा नफा पाच टक्क्यांवरून १२ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय जनतेच्या सल्लाने घेतलेला नव्हता, असा युक्तिवाद सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) वतीने विशेष न्यायालयात करण्यात आला. त्यानंतर, राऊस एव्हेन्यू जिल्हा व सत्र न्यायालयाने शुक्रवारी सिसोदियांना १७ मार्चपर्यंत सात दिवसांची 'ईडी' कोठडी सुनावली. मद्य धोरण घोटाळाप्रकरणी दिल्लीचे माजी अर्थ व महसूलमंत्री मनीष सिसोदिया यांना 'सीबीआय'ने यापूर्वीच अटक केली होती. 'आप' सरकारने उत्पादन शुल्क धोरणात बदल करताना घाऊक मद्यविक्रेत्यांना आर्थिक लाभ मिळवून देण्याच्या बदल्यात १०० कोटींची लाच घेतल्याचा संशय असून या प्रकरणी 'ईडी'चीही समांतर चौकशी सुरू आहे. 'ईडी'ने सिसोदियांना गुरुवारी रात्री अटक केली. सध्या सिसोदिया तिहार तुरुंगात असून 'सीबीआय'च्या विशेष न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी दिली आहे. मद्य विक्री घोटाळयामध्ये सिसोदियांच्या वतीने त्यांचे सहकारी विजय नायर हे मुख्यमंत्री अरिवद केजरीवाल तसेच सिसोदियांच्या वतीने मध्यस्थी करत होते. या प्रकरणामध्ये 'भारत राष्ट्र समिती'च्या नेत्या आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या कन्या के. कविता यांचाही समावेश होता, असा उल्लेख 'ईडी'चे वकील झोहेब हुसैन यांनी केला. कविता यांची शनिवारी ईडी चौकशी करणार असून त्यांच्याही अटकेची शक्यता व्यक्त केली जात आहे. कविता यांची 'सीबीआय'ने यापूर्वी चौकशी केलेली आहे. मंत्रिगटाच्या बैठकीच्या इतिवृत्तात, नफ्याचे प्रमाण वाढवण्याच्या निर्णयाचा उल्लेख नाही. हा निर्णय दक्षिणेतील मद्यविक्रेत्या कंपन्यांना आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी परस्पर घेतला गेला. कथित दक्षिण गटातील कंपन्यांना दिल्लीमधील नऊ विभागांतील घाऊक मद्यविक्रीचे परवाने दिले गेले. सिसोदियांच्या १४ फोनपैकी फक्त दोन ताब्यात घेता आले. सिसोदियांनी दुसऱ्याच्या नावे फोन व सिम खरेदी केले. स्वतःचे फोन नष्ट केले. हा घोटाळा सुमारे २९२ कोटींचा असून सिसोदिया व दक्षिण गटातील खासगी कंपन्यांच्या हितसंबंधांची सखोल चौकशी करण्याची गरज आहे.
















# स्त्री ही संस्कारांची जननी असून संस्कृतीची निर्माती आहे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**स्त्री ही संस्कारांची जननी असुन स्वतंत्र अशा संस्कृतीची निर्माती आहे. जगातील सर्व पुरूष महापुरुष सिद्ध पुरुष घडले हे सहज नाही या मागे प्राकृतिक शक्ति सोबत स्त्रीशक्तिची ताकद कार्यरत होती म्हणूनच. शक्ति ममता माया क्षमा तपस्या आराधना करूणा, हे सृष्टीच्या रचनेतील सगळ्यात सुंदर शब्द स्त्री वाचक आहेत अर्थात स्त्री हि किती महत्वपूर्ण आहे. याचा प्रत्यय या शब्दाचा अर्थ समजून घेतल्यावर येईलच .शिव-पार्वती, ब्रह्मा-सरस्वती, विष्णु-लक्ष्मी, श्रीराम-सीता, श्रीकृष्ण-रुक्मिणी हिंदु धर्मातील सर्व देव यांच्या नावासमावेत त्यांच्या पत्नीचे नाव आजही आदरपुर्वक घेतले जाते.**

हिंदु संस्कृतीमध्ये स्त्रीला देवी मानले गेले आहे, स्त्रीचे महत्व पौराणिक आहे. हिंदु संस्कृतीमध्ये जेवढे महत्व देवांना आहे तेवढेच देवींना आहे मग ते हिरण्यकशपु या दानवाला मारणार्‍या भगवान विष्णुचा अवतार असलेल्या नरसिंहाला म्हणजे भगवान विष्णुला जितके महत्व तितकेच देवाला युद्धात त्रस्थ करुन सोडणार्‍या महिषासुर राक्षसाला फाडून काढणार्‍या माता दुर्गेला म्हणा देवांना जितके महत्व तितकेच देवींना महत्व हिंदु धर्मात दिले गेले आहे. मानवी कुळाची सुरुवात झाल्यापासून अयोध्येचे राजे दशरथ हे युद्धासाठी देव-असूर संग्रामात देवांच्या बाजुने सहभागी झाले युद्ध चालू असतांना राजा दशरथ यांच्या रथाचा आख तुटला त्यावेळी सोबत असणारी पत्नी कैकयीने आपल्या हाताने त्या रथाचा आख पेलला व महाराज दशरथ यांना युद्ध चालू ठेवण्यासाठी खुप मोठे सहकार्य केले दरम्यान युद्धात विजय मिळाला ते एका स्त्रीमुळेच.

लंकेवर विजय मिळवणार्‍या प्रभु श्रीरामचंद्र यांना सुद्धा युद्धाच्या अगोदर शक्तीची ( देवीची ) आराधना करावी लागली होती आणि शक्ती ( देवी ) प्रसन्न झाल्यानंतरच प्रभु रामचंद्राचा विजय सुकर झाला होता.

महाभारतामध्ये सुद्धा पांडव विजयी झाले, परंतु पांडवाच्या विजयामध्ये सिंहाचा वाटा द्रौपदीचा आहे. ज्यामुळे पांडवांचा विजय शक्य झाला. पांडव-कौरव युद्ध चालू झाले. कौरवांचे अनेक शुर-वीर दैनंदिन मारले जात होते यावर कौरवांचे युवराज दुर्योधन यांनी एकेदिवशी आपल्या सैन्यातील प्रमुख भीष्म पितामह यांना उद्देशून म्हटले की 'तात तुम्ही मनापासून युद्ध लढत नाहीत का ?, यावर खुप सारी चर्चा झाल्यानंतर गंगापुत्र भीष्म यांनी प्रतिज्ञा केली की उद्या संध्याकाळी सुर्यास्तहोईपर्यंत एकही पांडव जिवित राहणार नाही, ही भीष्माची प्रतिज्ञा आहे, माझा प्राण गेला तरी प्रतिज्ञा खोटी होणार नाही.' यावर सदरची वार्ता वार्‍यासारखी पसरली पांडवाच्या सैन्यामध्ये दहशत पसरली. सर्व पांडव चिंताग्रस्त झाले. त्यादिवशी मध्यरात्री भीष्म पितामह साधनेत बसले होते आणि अचानक त्यांच्यासमोर एक स्त्री आपल्या तोंडावर पदर घेवून चरणस्पर्श करते आणि त्याक्षणी



गंगापुत्र भिष्म यांच्यातोंडून एक वाक्य निघते 'भरतुम प्रियभवतु' ( अखंड सौभाग्यवती भवतु ) आणि भीष्म पितामहा डोळे उघडतात पाहतात तर समोर द्रौपदी. भीष्म पितामह द्रौपदीला समोर पाहून आश्चर्य मुद्रित विचार करता आणि आपण दिलेला आशिर्वाद आणि आपण उद्या केलेली भीष्म प्रतिज्ञा यामध्ये न्यायनिती धर्म संकट उभा राहिले आहे हे लक्षात येताच भीष्म पितामह द्रौपदीला विचारतात तुला या ठिकाणी कोणी पाठविले आहे त्यावर द्रौपदी नम्रपणे सांगते की भगवान श्रीकृष्ण पाठविले आहे. मग ते कुठे आहेत. त्यावर द्रौपदी ते बाहेरच उभे आहेत त्यावर भीष्म पितामह श्रीकृष्ण यांना मध्ये बोलावण्यास सांगतात आणि श्रीकृष्ण मध्ये आल्यानंतर भीष्म पितामह श्रीकृष्ण यांना विनंती करतात की मला माझ्या प्रतिज्ञेपेक्षा मी दिलेला आशिर्वाद, शब्द हा सत्य झाला पाहिजे हे महत्वाचे आहे आणि यातून मार्ग काढण्यासाठी मी मरण पत्करण्यास तयार आहे परंतू आपण मार्ग सांगावा आणि ठरलेल्या नियोजनाप्रमाणे दुसर्‍या दिवशी अर्जुनाच्या बाजूला शिखंडी जो जन्मतः स्त्री होता आणि नंतर पुरुष झाला ( याचे ज्ञात भीष्म पितामह यांना होते ) आणि भीष्म हे स्त्रीवर शस्त्र चालवणार नाहीत त्यामुळे अर्जुनाच्या रथावर शिखंडी थांबवून अर्जुनाला सुचविले की भीष्म पितामह यांचा उद्या वध कर आणि याप्रमाणे एका स्त्रीच्या प्रचंड ध्येयशक्तीसमोर इच्छा मरण धारण करणारे भीष्मपितामह यांना शब्द पाळावा लागला व स्वतःच्या मृत्युचा युक्तीवाद त्यांनीच अर्जुनाला सांगितला आणि तेथूनच पांडवांच्या विजयाला कुठे सुरुवात झाली म्हणजे एका स्त्रीमुळेच महाभारतामध्ये सुद्धा पांडव विजयी झाले.

अगदी अलीकडच्या काळात संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या भगिणी संत मुक्ताबाई यांनी लिहिलेले संत साहित्य वाचन करतांना आजही भल्या भल्या तत्वज्ञानी माणसांची बोबडी वळते इतके महान तत्वज्ञान कुठल्याही शाळेत शिक्षण न घेणाऱ्या संत मुक्ताबाई यांनी लिहिले आहे. तसेच पुढच्या काळात हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहून ते सत्यात उतरवणाऱ्या राजमाता जिजाऊंचा दैदिप्यमान इतिहास संपुर्ण जगासमोर आहे नंतरच्या काळात महाराणी अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी यासारख्या अनेक महान स्त्रीयांनी आपल्या दैदिप्यमान इतिहासाने जगाला स्त्री शक्तीची ओळख निर्माण करुन दिली आई. स्त्री ही कधी कमकुवत दुबळी नसते. स्त्री सुसंस्कृत असेल, उच्चशिक्षित असेल तर कुटुंब, समाज, राष्ट्र हे समृद्ध असतात, सशक्त असतात त्यामुळे स्त्रीही जगतजननी आहे तिच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन समाजमनाचा बदलला पाहिजे.

# हिंदू धर्मावरच का बोलले जाते ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारतामध्ये वेगवेगळ्या धर्माचे संख्येने कमी अधिक लोकसंख्या असलेले लोक सुखाने नांदतात याचे श्रेय भारताच्या संविधानाला जाते. लोकशाही पद्धतीचा स्विकार करून धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्था भारत देशात असावी असा संविधानीक नियम असताना ही येथे देशापेक्षा, माणसापेक्षा धर्माला जास्त महत्त्व दिले जाते. धर्माच्या नावाखाली मेंदूचा वापर होने बंद होतो, तर्क सत्य याची शहानीशा करण्याची क्षमता राहत नाही. अंधश्रद्धा पाखंड चमत्कार भोंदुगीरी ला प्रोत्साहन दिले जाते. आज लोकांना देशहीत जनहीता पेक्षा धर्म महत्त्वाचा वाटतो आणि म्हणुनच देशात समस्या चे थैमान निर्माण झालेले आहे. अनेक वेळा सत्ताधारी लोक हिंदु धर्म धोक्यात आहे म्हणून सांगत असतात.**

आता मुळ मुद्दा बघितला तर हिंदू धर्मावरच का बोलले जाते असा प्रश्न धार्मिक लोकांनी सरकारला विचारला असता तर तो त्यांचा अधिकार समजला असता. परंतु सत्तेतील लोक आणि सत्ताधारी लोकांचा इलेक्ट्रॉनिक्स मिडिया प्रतिनिधी असा प्रश्न उपस्थित करतात तेव्हा मात्र त्यांच्या बुद्धीची किव येते. इमान एवढेही गहाण टाकु नये कि आपल्याला मेंदु असून मेंदुचा वापरच करता येऊ नये. मिडीयाचे काम असते जनतेचा आवाज सरकार पर्यंत पोहचवण्याचे परंतु आज मिडिया सरकारचा आवाज म्हणून काम करते आणि यावर सर्वोच्च न्यायालयाला सांगावे लागते मिडिया समाजात तेढ निर्माण करण्याचे काम करत आहे. एवढा स्वाभीमान कुणाकडे गहाण टाकावा ? मेंदुचा वापर न केल्याने काही मिडिया प्रतिनिधींना प्रश्न पडत असेल कि हिंदु धर्मावरच का बोलले जाते ? हिंदु धर्मातील रुढी किंवा अंधश्रद्धेवर च का बोलले जाते ? आता याचे अनेक उत्तरे आहेत परंतु आपण ढोबळमानाने बघू. खरं तर हे काम मिडीयाचे आहे परंतु आज मिडीयाची जबाबदारी खर्‍या अर्थाने सर्वसामान्य माणसे पार पाडत आहेत. भारत हा धर्मनिरपेक्ष देश असतात सत्तेत बसलेले लोक जेव्हा हिंदुराष्ट्रा बद्दल बोलतात तेव्हा कोणत्याही मिडिया प्रतिनिधीच्या डोक्यात प्रश्न येत नाही की हिंदु राष्ट्रच का ? भारतात अनेक धर्म आहेत हिंदु राष्ट्राची मागणी केली तर इतर धर्मांवर अन्याय होणार नाही का ? सध्या अस्तित्वात असलेले धर्मनिरपेक्ष राष्ट्र आणि हिंदुराष्ट्र यामध्ये काय फरक असणार आहे ? संविधानाने सर्वांना समान संधी समान अधिकार देऊन सर्वांना समान केले आहे, तर हिंदुराष्ट्र यापेक्षा वेगळे काय देणार आहे ? ही प्रश्न मीडीयाने जे हिंदू राष्ट्र हिंदु राष्ट्र म्हणतात त्यांना विचारायला पाहिजे तर मिडीया हिंदु धर्मावरच का बोलले जाते म्हणून लोकांना प्रश्न विचारतात. दुसरी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे हिंदु धर्माची लोकसंख्या सर्वाधिक आहे. हिंदु धर्माचे आमदार ,खासदार ,कर्मचारी, अधिकारी सर्वात जास्त आहेत, अपवाद वगळता सर्वच इलेक्ट्रॉनिक मिडिया हिंदुच्या ताब्यात आहे. हिंदुकडे चमत्कार करणारे मंत्रोच्चार करणारे शास्त्रज्ञ भरपूर आहेत एवढे सगळं असताना सत्ताधारी नेते म्हणतात हिंदु धर्म धोक्यात आहे. आता देशातील सत्ता संपत्ती आणि अधिकार सर्वात जास्त हिंदुकडे असताना धर्म धोक्यात कसा ? धर्म धोक्यात आहे असे सत्तेतील नेते बोलतात तेव्हा मात्र त्यांना उत्तर देण्यासाठी धर्मावर तर बोलावेच लागते. म्हणून मग हिंदु.धर्माचे वर्चस्व कुठे कुठे आहे आणि त्यांना धोका कसा निर्माण होऊ शकतो असा तार्किक प्रश्न विचारला की अगोदर मिडीयाच्या पोटात दुखते. प्रत्येक क्षेत्रात बहुसंख्य असलेला धर्म मुळात धोक्यात येतोच कसा ? जर बहुसंख्य असलेला धर्म धोक्यात आहे तर मग अल्पसंख्याक समाज धोक्यात नसेल का ? धार्मिक लोकांनी कोणताही मुद्दा घेतला तर त्याला धर्मनिरपेक्ष देशात धार्मिक महत्त्व देता येत नाही परंतु सरकारच जर धार्मिक मुद्दा घेते तर चर्चा तर धर्मावरच होणार ना ? जर हिंदुराष्ट्र बनायला पाहिजे यासाठी सरकार प्रयत्न करत असेल तर हिंदुराष्ट्रा म्हणजे नेमके काय आणि लोकांचा विकास त्यात कसा होईल यावर तर चर्चा होणारच आहे. संविधान लागु झाल्यानंतर ज्यांना घर नव्हते त्यांचे बंगले झाले, ज्यांना गावात प्रवेश नव्हता ते संसदेत बसले. ज्यांच्या स्पर्शाने माणुस बाटायचा ते लोक अधिकारी झाले कल्पना शक्तीच्या पलिकडे सामाजिक परिवर्तन संविधानामुळे झाले. स्त्रियांना पुरुषांसोबत बसण्याचा, जेवण्याचा, स्वताचा निर्णय घेण्याचा घराची चौकट ओलांडण्याचा अधिकार नसताना संविधानाने सर्व चौकटी तोडून महिलांना सामाजिक व मानसिक स्वातंत्र्य दिले आणि त्याच महिला टीव्हीवर जोरजोरात बोलतात हिंदु धर्मावर का बोलले जाते. मुळात हिंदु धर्मावर कोणीच बोलत नाही परंत धर्माच्या नावाखाली जी अगोदर ग्रंथसंपदा तयार करून ठेवली त्या अनेक ग्रंथामध्ये विषमता, भेदभावाचे समर्थन करून माणासालाच निच समजले गेले आहे. महिलांना कोणत्याही प्रकारचे हक्क अधिकार न देता गुलाम म्हणून जिवन जगावे लागत होते ते म्हणजे मनुस्मृती. मनुस्मृती ने महिलांचे सर्व हक्क अधिकार नाकारून महिला व शुद्र यांना निच समजून ब्राह्मण हे जमीवरचे देव आहेत व ब्राम्हणच सर्व श्रेष्ठ आहेत असे मनुस्मृती सांगते. जन्मापासून तर मरेपर्यंत मनुस्मृती केवळ आणि केवळ विषमता व सामाजिक द्वेष करते आणि अशा विषारी पुस्तकाचे समर्थन हिंदुराष्ट्राची मागणी करणारे करतात. महिलांची पहीली शाळा सुरु करून सामाजिक व शैक्षणिक क्रांती करणारे महात्मा फुले म्हणतात ही मनुस्मृती जाळायला पाहिजे आणि अस्पृश्यता, विषमता, जातीवादामुळे गावकुसाबाहेर मरणयातना सहन करणाऱ्या समाजाला अधिकारी बनवून स्वतः चा निर्णय न घेता येणाऱ्या महिलेला राष्ट्रपती बनवणाऱ्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, पुस्तकावर जिवापाड प्रेम करून पुस्तकासाठी घर बांधणारे, एक पुस्तक जाळून टाकतात तर ते पुस्तक किती विषारी असेल हे लक्षात घेणे गरचेचे आहे. आणि त्याच्या च आधार घेऊन जर हिंदु राष्ट्राची मागणी होत असेल तर पुन्हा येथे विषमता, उचनिचता येणारच म्हणून हिंदु धर्मावर बोलले जाते. बर हिंदु धर्म किंवा हिंदु राष्ट्र सांगताना अगोदरच्या लोकांनी विषमता भेदभाव उच्च निच्चता यावर सध्याचे लोक एकही शब्द न बोलता उलट त्याचा सकारात्मक अर्थ समजून सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न करतात. अगोदरच्या जुन्या लोकांनी विषमता वादी लिखाण केले आहे. ब्राह्मण सर्वश्रेष्ठ नसुन सर्वसामान्य माणसासारखेच आहेत हे सुद्धा ते बोलत नाही कारण मनुस्मृती नुसार तसे बोलणे पाप आहे. मनुस्मृती चा आधार घेऊन हिंदुराष्ट्र बनत असेल तर त्यामध्ये ब्राम्हणांना सर्वश्रेष्ठ ठिकाणी ठेवले जाते आणि त्यांच्या विरोधात बोलण्याचा, त्यांना दंड करण्याचा, त्यांच्या सोबत बसण्याचाही अधिकार लोकांना नसेल. अशी विषमतावादी व्यवस्था पुन्हा येऊ नाही म्हणून चर्चा होते. भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे प्रत्येकाला आपापल्या धर्माचे पालन व आचरण करण्याचा अधिकार आहे. परंतु धर्म हा घराच्या आत असावा बाहेर आपण फक्त भारतीय म्हणून असावे एवढा साधा नियमही लोकशाही मध्ये राज्यकर्ते लोक पाळत नसतील आणि धर्माला धार्मिक विधीला जर ते लोकसभा आणि इतर शासकीय कार्यालयात आणत असतील तर हिंदूधर्मावर चर्चा होणारच. शासकीय कार्यालया सत्यनारायण सारखे पुजा अर्चा केली जाते. त्यावेळी मिडिया ला कळत नाही का ? हे चुकिचे आहे हे व्हायला नको पाहिजे. धर्म म्हणजे फक्त इतरांचा द्वेष करून विषमता पसरवणे एवढेच आहे का ? मुस्लिमांच्या मशीदीवरील भोंग्याचा त्रास येथील लोकांना होतो मग सत्यनारायण चा त्रास इतर लोकांना होणार नाही का ? म्हणून हिंदु धर्मावर बोलले जाते. किरणराव नावाची महिला जेव्हा अस म्हणते देशात असुरक्षितता वाटत आहे तेव्हा तिला प्रत्येक क्षेत्रातुन ट्रोल केले जाते. परंतु धर्म धोक्यात आहे म्हणल्यावर सर्वांनी गप्प बसायचे का ? हिंदुराष्ट्राची संकल्पना ही माणसाच्या हिताची नाहीच हे प्रथम दर्शी लक्षात येते. शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव नाही आत्महत्या वाढत आहेत. तरुणांच्या हाताला काम नाही बेरोजगार आहेत, निवृत्त कर्मचारी यांना पेन्शन नाही वय झाल्यानंतरही रस्त्यावरची लढाई लढावी लागते. महागाई मुळे सर्व सामान्य लोकांचे जिवन विस्कळीत झाले आहे. शिक्षणाचा व्यापर सुरू आहे सर्वसामान्य लोकांना शिक्षण परवडणारे नाही आहे. ह्या समस्या हिंदुधर्मातील लोकांच्या नाहीत का ? मग हिंदुधर्मातील लोकांना समस्या ग्रस्त करून सोडायचे, सर्व सामान्य हिंदूचा पैसा अडाणी ला द्यायचा आणि वसुली साठी गॅसच्या किंमती वाढवायच्या. हातात सत्ता आणि अधिकार असताना हिंदु माणसाच्या समस्या कमी झाल्या नाही आणि हे जर हिंदु राष्ट्राची चर्चा करत असतील तर धर्मावर चर्चा होणारच. आणि चर्चेमधुन विषमता उच्च निच्चता हीन भावना यावर चर्चा होईलच. हे सर्व थांबवायचे असेल तर यावर एकच पर्याय आहे भारतीय संविधानानुसार देशाचा कारभार चालवणे तरच शांतता व सुव्यवस्था नांदेल.

आधुनिक केसरी

खोबरे आणि तीळ हे आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त पदार्थ असून अधिक ऊर्जा मिळण्यासाठी सुके खोबरे आणी तीळ खाणे उपयुक्त ठरते. खोबरे व तीळ हे बलवर्धक पदार्थ ,त्यात मोठ्या प्रमाणात प्रोटीन , फट भरपूर असतात . रोगप्रतिकार शक्ती ही आपल्या शरीरासाठी अत्यंत गरजेची असते, कारण हीच रोगप्रतिकार शक्ती आपल्याला विविध आजारांपासून दूर ठेवते आणि शरीराला त्यांच्याशी लढण्यासाठी ताकद देते. ज्या व्यक्तीची रोगप्रतिकार शक्ती मजबूत असेल तो व्यक्ती फार कमी आजारांना बळी पडतो आणि नेहमी निरोगी राहतो. जर तुम्हालाही तुमची रोगप्रतिकार शक्ती मजबूत राखायची असेल तर आवर्जून नारळाचे आणी तीळाचे सेवन करा. कारण नारळामध्ये रोगप्रतिकार शक्ती वाढवणारे गुण, आरोग्यासाठी तीळ वापरणे अत्यंत फायदेशीर आहे. हिवाळ्यात हे वापरणे फायदेशीर मानलं जात. खोबरे तिळामध्ये पोषक तत्त्वांचा खजिना असतो. खोबरे आणी तीळ उष्ण असल्याने थंडीमध्ये शरीरातील उष्णता टिकवून ठेवण्यासाठी त्यांचा वापर केला जातो. खोबरे म्हणजे राजा आणी तीळ म्हणजे



लय भारी

# सुगरण

सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

राणी , दोघांचा संसार ऐकमेकांच्या साथीशिवाय पुर्णत्वास जाणार नाही . शरीररुपी राज्य चालवण्यासाठी दोघांची गरज असतेच म्हणून बहूधा ह्या चटणीला " राजाराणी " म्हणत असावेत . मग घ्या लिहून साहीत्य आणी कृती .

**राजाराणी चटणी**

**साहीत्य –** एक वाटी सुके किसलेले खोबरे , अर्धी ते पाऊण वाटी तीळ , पाव वाटी पंढरपूरी डाळे , तीन ते चार हिरव्या मिरच्या , मोठा चमचा लिंबाचा रस , एक चमचा दाण्याचा कूट , मोठा चमचा बारीक चिरलेली कोथिंबीर, चवीनूसार मीठ साखर, हळद, हिंग, जिरे, दोन ते तीन चमचे तेल ईत्यादी.

**कृती–** कढईत तेल गरम करुन घ्या. त्यात जिरे घाला मग बारीक चिरलेल्या मिरच्या, बारीक चिरलेली कोंथिंबीर घातल्यावर लगेचच हळद घाला म्हणजे छान हिरवट पिवळा कलर येतो. आता त्यात पंढरपूरी डाळे घाला. तीळ, खोबरे घाला गस बारीक करा.आता चवीनूसार साखर मीठ घाला. एकसारखे हलवा आता लिंबाचा रस घालून मिश्रण एकसारखे परता. खोबरे कुरकुरीत होईपर्यत मधूनमधून मिश्रण हलवा. खमंग, कुरकुरीत अशी तीळखोबऱ्याची राजाराणी चटणी तयार. बघा मग करुन नक्कीच सगळ्यांना आवडेल.

## राजाराणीचटणी



# विधवा भगिनींशी संवाद साधताना. .!



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**आठ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त सर्व माता, भगिणींना जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा जागतिक महिला दिन संपूर्ण भारत देशभर तसेच सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. काही ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन सुद्धा केले जाते व समाजातील काही कर्तृत्वान नारीशक्तींचा सन्मान, जाहीर सत्कार सुद्धा केला जातो. सर्वजणी मनमोकळ्या पणाने गप्पा मारत असतात ह्या सर्व गोष्टी फारच छान आहेत पण, याच समाजात राहणाऱ्या विधवा भगिणीचे काय. .?**

पाहिजे त्या प्रमाणात त्यांना स्थान मिळत नाही हे कोणापासूनही लपलेले नाही हे, सर्व बघून मला अत्यंत दुःख व्हायचे गेल्या काही दिवसांच्या आधी माझ्या विधवा भगिणीसोबत संवाद साधण्याचे मला भाग्य लाभले ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे म्हणून आज आठ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त आज माझ्या विधवा भगिणींवरती थोडक्यात का होईना दोन शब्द लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे. समाजात राहणारे अनेक लोक दुःखी आहेत या जगात कोणीही सुखी नाही पण सर्वात जास्त दुःखात बुडालेल्या माझ्या विधवा भगिणी आहेत त्यांच्या विषयी अभ्यास करून बघितली कारण, त्यांचे जीवन हे इतरांपेक्षा जरा वेगळ्या प्रकारचे आहेत ह्या विषयी माहीत असताना सुद्धा न समजल्या सारखे वागत असतात खरच अशा लोकांना काय म्हणावे. ..? म्हणुन त्यांचे अनेकदा दुःख पाहून त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधण्यासाठी मी मनात ठरवली होती. आणि योगायोग म्हणावे लागेल तो दिवस सुद्धा आला. तो दिवस सुहासिनी महिलांचा आनंदाचा दिवस म्हणजेच हिंदू धर्मातील महिलांसाठी हरितालिका तृतीया चा शुभ दिवस होता या दिवशी सुहासिनी महिला दोन दिवस हा सण साजरा करतात आणि मी पण करते कारण मी, सुहासिन आहे पण, विधवा भगिणींसोबत संवाद साधावे हे का म्हणून माझ्या मनात बरं आले असावे... ? कदाचित यालाही कारण असावे अर्थातच ! तसेच झाले बऱ्याच वर्षापासून मी बघत आलेली आहे की, हरितालिका तृतीया सणाच्या दिवशी समाजातील सुहासिनी महिला विधवा भगिणींना आपल्या घरी बोलावत नाही त्यांना पूजेत स्थान देत नाही अस्पगुण होते, असे बरेचदा ऐकायला मिळाले आहे. आणि असल्या प्रकारचे विचार मला अजिबात पटत नव्हते आणि आजही पटत नाही. असल्या प्रकारची वागणूक बघून मला अत्यंत वाईट वाटले त्यामुळे मी त्याच दिवशी म्हणजेच हरितालिका तृतीया च्या दिवशी व मकरसंक्रांतीच्या दिवशी माझ्या विधवा



भगिणींना घरी बोलावून त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधण्यासाठी व इतर महिलांसारखे त्यांचाही सन्मान जगात व्हावा या दृष्टीने त्यांना घरी बोलावून हळदीकुंकू, गोडधोड खावू देऊन तसेच हरितालिकेचा पूजेचा मान देऊन त्यांचा सत्कार करण्याचा ठरवली, स्नेहबंधनाचे धागे त्यांच्याशी विणावे असे मला वाटले तेव्हा, त्या क्षणी माझ्यासोबत कोणतेही अस्पगुण झाले नाही. मग इतरांना कसे काय अस्पगुण होतात. ..? हा एक प्रश्न आहे. पण, काहीही असो माझ्या विधवा भगिणींना मी वाचण्याचा प्रयत्न करून बघितली त्यामुळे मला त्या कळल्या माझ्या ह्या छोट्याशा प्रयत्नाला यश आले कारण त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचे मला भाग्य लाभले त्या आनंदाच्या क्षणी म्हणजेच मकरसंक्रांतीच्या निमित्ताने कुरखेडा येतील पोलिस उपनिरीक्षक शितल ताई माने होत्या व हरितालिका तृतीया निमित्त माजी नगरसेविका आशाताई तुलावी, नगरसेविका कुंदाताई होत्या त्याच बरोबर बरेच विधवा भगिणी होत्या त्या सर्व मान्यवर ताईंनी सुद्धा विधवा भगिणींशी संवाद साधताना आपले योग्य मत नोंदविले कारण विधवा भगिणी ही अस्पगुणी नाही तर हिंमतवान आहे,ती सर्व काही करू शकते कारण ती कशातच कमी नाही. त्यांचे बोलणे ऐकताच सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद तर होतेच पण त्या गहिवरून सुद्धा गेल्या होत्या स्वतःत्या आपुलकीने व्यक्त झाल्या मला फार आनंद झाला कारण मी पहिल्यांदाच माझ्या विधवा भगिणींना मनमोकळे पणाने गप्पा मारताना व संवाद साधताना,आपल्या व्यथा, वेदना, चांगली, वाईट परिस्थिती,दुःखाच्या विषयी सांगताना मी जवळून बघितली आहे असेच त्यांचे जीवन हसते, खेळते रहाण्यासाठी समाजाने त्यांच्याविषयी आपुलकीच्या भावनेने विचार करायला पाहिजे. त्यांना इतरांप्रमाणे जगता यावे यासाठी प्रयत्न करावे पण, त्यांच्या वाटेत काटे पेरण्याचा विचार सुद्धा आपल्या मनात आणू नये. पुन्हा मला अभिमानाने सांगावेसे वाटते की, माझ्या विधवा भगिणींचे पुण्य पाऊले माझ्या दारात पडले व माझा घर अजून पवित्र झाला.

# मुलांची मनं फुलवणारी आनंदाची फुलबाग

आधुनिक केसरी

**वीरभद मिरेवाड हे नाव बालकवितेत चांगलेच स्थिरावले आहे. 'पाखरगाणी' या त्यांच्या पहिल्या बालकवितासंग्रहानंतर त्यांच्याकडून अधिक अपेक्षा वाढल्या होत्या. या अपेक्षांना पुरेपूर उतरणारा, मुलांना आपलासा वाटणारा 'आनंदाची फुलबाग' हा त्यांचा ग्रंथालीने प्रकाशित केलेला नवा, ताजा, टवटवीत बालकवितासंग्रह मुलांचं लक्ष वेधून घेणारा आणि बालकवितेची गोडी वाढवणारासुद्धा आहे. यातील कविता मुलांना वाचनानंद देतात.त्यांच्या गालावर हसू फुलवतात.**

गंमत' या कवितेत वर्गात गणूला व्याकरणावर आधारित सरांनी प्रश्न विचारला. एकूण काळ किती ? कोणते ? गणूने यावर काय गंमतशीर उत्तर दिले ते पाहाः 'भविष्यकाळ ,वर्तमानकाळ, तिसरा आहे भूतकाळ नवीन शोध लागलाय, सुकाळ आणि दुष्काळ एकच हशा, वर्गात पिकला, गुरूजींनी तासातच, गणूला झापला' तसेच 'जादूगार' ही कविताही फार मजेशीर आहे. शाळेत जादूगार येतो आणि कशी धमाल उडवून देतो, हे वाचताना मजा तर येतेच. शिवाय आपली भरपूर करमणूकही होते.

'सरांच्या छडीचा, केला त्यानं साप
गुरुजी पळत म्हणाले, बाप रे बाप'

'फुजूलवाडी' हे गाव कसे सतरंगी आहे आणि या गावातील लोक कसे अतरंगी आहेत हे आपल्याला 'फुजूलवाडी' ही मजेशीर कविता वाचताना वाचनाची गोडी वाढत जाते.

खरंतर, मुलं त्यांच्या भोवताली घडणाऱ्या घटनांचे त्यांच्यापरीने अर्थ लावत असतात. नाहीच झालं त्यांचं समाधान तर ते मोठ्यांना सतत प्रश्न विचारून भंडावून सोडतात. कारण त्यांच्या मनाला सतत नवीन्याची ओढ आणि कल्पनेची जोड असते. आता 'इवलेसे मन' या कवितेतच पाहा. एक मुलाच्या चिमुकल्या मनात केवढे मोठे मोठे प्रश्न उभे राहतात. ज्यांची उत्तरे कधीकधी मोठ्यांनाही देता येणार नाहीत. या कवितेतला मुलगा आईला म्हणतो,

'पावसाच्या धारा मोज, पाखरांचा आवाज सांग
मला पाहून पाखरांची, का होते पांगापांग ?'

यावर आईने काय उत्तर द्यावे ? मुलं हा विचार करताना त्यांच्या कल्पनाशक्तीला इथे अधिक वाव मिळतो.

स्वतःजवळचे दुसऱ्यांना देण्यात मोठे समाधान दडलेले असते. ही शिकवण नकळत देणारी 'दे दे दे' ही कविता मला विशेष उल्लेखनीय वाटते. या कवितेत कवी म्हणतो,

**'जमीन गं जमीन, मुबलक रोटी दे
शाळा गं शाळा, हाती पाटी दे'**


तसेच, पोळा या कवितेत बैलपोळ्याचं वर्णन वाचताना शहरातल्या मुलांना पोळा कसा असतो ? पोळा म्हणजे काय ? तो का साजरा केला जातो ? यांसारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे सहज सापडतील.

मुलांचे मन किती निरागस असते.

**घरातली म्हैस देवाघरी गेल्यावर मुलगा देवाकडे, 'मला एक म्हैस दे...' असे वरदान मागतो. तो म्हणतो कसा,**

**'म्हैस गेली, माय रडली, घर दुधाचे आटले
टच्च भरून दह्यादुधानी, गाडगे मडके कुठले ?'**

**हे वाचताना जीव कासावीस होतो.**





या कवितांमधून आपल्याला आई, आजी-आजोबा ,मामा- मामी, बाळ, शाळेतले सर, जादूगार, मदारी आणि चक्क बाप्पा, विठोबा येऊन भेटतात. आपल्या जिवाभावाचे होऊन जातात. 'आजीमाय' कवितेत आजीचा प्रेमळपणा सांगताना कवी किती सहज सांगून जातो. आजीमाय माझी, बोलत नसे खोटं गालावर हात ठेवून, मोडत राहते बोटं तसेच आंबराई, शेताशिवारात माझ्या, धरती, माझ्या गावात , निसर्ग सोबती यांसारख्या कवितांतून आपल्याला निसर्ग डोकवताना दिसतो. मनाला तो फुलवतो; आनंदाच्या लाटेवर झुलवतो. 'ये रे ये रे पावसा' या कवितेत कवीने पावसाला परिसाची उपमा दिलीय. निसर्गाचं रूप पालटवणारा पाऊस.कवी पावसाला आर्जवाने म्हणतो,

**साग, वेळू ताटवे फुलांचे गीत फुलव लहान
मुलांचे मातीचे सोने कर परिसा घेऊन ये ना जरा
दिलासा**

मुलांना परिचित असणाऱ्या शब्दांचा कवितेत कवीने पुरेपूर वापर केला आहे .तरीही एखाद दुसरा नवीन शब्द कवितेत सहज येऊन मुलांचा शब्दसाठा वाढण्यास मदतच झाली आहे. 'बागबगीचा' या कवितेत

**'झाडाझुडपासवे डोलतो, गुलमोहर हा
लाल
जणू वाटते अनंताने, फेकला का
गुलाल'**

यात कवीने 'अनंताने' हा योजलेला शब्द समर्पक आणि मुलांच्या शब्दसाठ्यात भर घालणारा आहे.

सुप्रसिद्ध चित्रकार संतोष घोंगडे यांचे मुखपृष्ठ आणि आतील सर्व चित्र कवितेतला आनंद आणखी वाढवणारीच आहेत. या पुस्तकाची निर्मिती ग्रंथालीने मुलं डोळ्यांसमोर ठेऊन अतिशय सुंदर केली आहे.

मुलांचे इवलेसे मन कधी क्षणात पंख पसरून नभात झेपावते तर कधी दुसऱ्याच क्षणी सरसर जमिनीवर येऊन फुलपाखरांशी स्पर्धाही करते. अशाच अवखळ, निरागस मनाला तालावर ताल धरायला लावणारा, कवितेच्या ओळी सहज गुणगुणायला लावणारा आणि कवितांच्या सरींमध्ये मुलांना मनसोक्त न्हाऊ घालणारा 'आनंदाची फुलबाग' हा वीरभद्र मिरेवाड यांचा हा संग्रह मुलांना आनंदात न्हाऊ घालणारा आहे. त्यांच्या या बालकवितासंग्रहात विनोदप्रियता, अनुकरणप्रियता, कल्पनाप्रियता, कृतीप्रियता या सर्व मुलांसाठी प्रिय असणाऱ्या गोष्टी ठासून भरलेल्या आहेत. शिवाय मिरेवाड यांची कविता मुलांचं रंजन करता करता नकळत ज्ञानाचे दारसुद्धा उघडणारी आहे, हे विशेष.

**पुस्तकाचे नाव : आनंदाची फुलबाग
(बालकवितासंग्रह )
कवी : वीरभद्र मिरेवाड
मुखपृष्ठ व चित्रे : संतोष घोंगडे
प्रकाशक : ग्रंथाली प्रकाशन
पृष्ठे : ५६ , किंमत : १२५/- रूपये**

**एकनाथ आव्हाड, भ्रमणध्वनी ९८२१७७९६८**

# व्हेअर इज भिडेवाडा ?



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**दर वर्षी जयंती आणि स्मृतीदिनाच्या निमित्ताने महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करणारे कार्यक्रम आयोजित केले जात असतात.परंतु ज्या फुले दांपत्यांनी पहिली शाळा सुरू केली.ती शाळा आहे तरी कुठे?त्या शाळेचे अस्तित्व आहे तरी कुठे?त्या शाळेचे काय झाले ? असे सवाल आजही उपस्थित राहत असतात.१ जानेवारी १८४८ साली महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुलेंनी देशातील मुलींची पहिली शाळा पुण्याच्या भिडेवाड्यात सुरू केली.परंतु हा भिडेवाडा आजही दुर्लक्षित असून व्हेअर इज भिडेवाडा? असे म्हणण्याची वेळ आलेली आहे.असा सवाल हृदयमानव अशोक लिखित / दिग्दर्शित व्हेअर इज भिडेवाडा? या लघुपटातून विचारण्यात आलेला आहे.**

आजही भिडे वाड्याच्या बाबतीत असलेला गुंता ना इथल्या राजकारणी लोकांना ना सरकारला सोडविता आला.भिडेवाड्यात स्मारक उभारण्याच्या नुसत्या घोषणा होत आहेत.पण जो शैक्षणिक क्रांतीचा भिडे वाडा आहे.तो भिडे वाडा आहे तरी कुठे असेच म्हणावे लागत आहे. भिडेवाडा हा शैक्षणिक क्रांति घडवून आणणारा महत्वाचं ठिकाण आहे.भिडेवाडा पुनर्जीवीत होणे हा महत्वाचा आणि अस्मितेचा मुद्दा आहे. हा मुद्दा हृदयमानव अशोक नावाचे असलेले युवा कवी लेखक आणि दिग्दर्शकाने पुढे आणला आहे.पुणे येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन मध्ये विद्रोही साहित्य स्नेहसंमेलनाचं आयोजन करण्यात आले होते.याच दरम्यान" व्हेअर इज भिडेवाडा. ?" हा देशातल्या पहिल्या मुलींच्या शाळेची व्यथा मांडणाऱ्या लघुपटाचा प्रीमियर पार पडला.यु ट्यूबच्या माध्यमातून हा लघुपट सर्वांसाठी खुला करण्यात आलेला असून आज पर्यंत हा लघुपट आणि भिडे वाड्याची वास्तविकता अनेकांच्या मोबाईल मध्ये गेलेली आहे.

गेल्या अनेक वर्षात या शाळेकडे कुणाचं लक्ष नाही. शैक्षणिक क्रांतीचं.. मुक्तीचं हे उगमस्थान नामशेष होऊ नये,येणाऱ्या उद्याच्या सावित्रीला तिच्या डोळ्यात असणारा भव्य भिडेवाडा अस्तित्वात असावा आणि याचं राष्ट्रीय स्मारक व्हावं इत्यादी बाबी या लघुपटातून वास्तविक पद्धतीनं मांडल्या आहेत.सर्वांचेच ह्या वास्तू कडे लक्ष यावे.म्हणून हा लघुपट विशेष प्रयत्न करत आहे.ज्या भिडेवाड्यात शैक्षणिक समतेचे वारे वाहू लागले.भिडेवाडा,शैक्षणिक क्रांतीची मशाल पेटविणारा भिडेवाडा कुठे आहे ? स्त्री मुक्तीची पहाट दाखविणारा हा भिडेवाडा आपल्याला का दिसत नाही ?ज्या सावित्रीजोतीने आपल्या आयुष्यातील अंधार दूर केला तो आपला भिडेवाडा फक्त आणि फक्त सरकारी कामातच अडकून पडलेला असून तो राजकारण्यांसाठी राजकीय अजेंडाच बनलेला आहे.घोषणा तर प्रत्येक वर्षीच होत असते.परंतु प्रत्यक्षात भिडेवाड्याच्या बाबतीत कोणतीही कार्यवाही होत नाही.हा आपला भिडेवाडा विकसित होऊन राष्ट्रीय दर्जा प्राप्त होणारे शैक्षणिक केंद्राचे स्मारक व्हावे आणि फुले दांपत्यास भारतरत्न सुद्धा मिळावा.ही अपेक्षा अनेकांचा आहे.परंतु भिडेवाड्याच्या बाबतीत आजही उदासीनताच पाहायला मिळत आहे.

भिडेवाड्याचे वास्तव मांडण्याचा प्रयत्न हृदयमानव अशोक यांनी केलेला आहे.एक मोठी लोकचळवळ उभी राहण्याची गरज निर्माण झालेली आहे.आजही भिडे वाडा बहुतांश लोकांना माहीत नाही,ही शोकांतिका आहे.व्हिडिओ व्हज्युअलच्या माध्यमातून वास्तू





शेवटच्या घटकापर्यंत पोहचवावी या विचाराने कलाकृती करण्याच ठरवलं.आज राज्यातील अनेक शाळा, संघटना बचतगट आदी ठिकाणी हा लघुपट हजाराच्या समुदायाला दाखवला आहे.हा लढा मोठ स्वरूप घेईल यात शंका नाही.कार्य शेवटच्या घटकापर्यंत या जबाबदारी आहे.ते आता जपलं नाही तर येणा देशातल्या मुलींच्या पहिल्या शाळेपासून अनभिज्ञ राहील. अशी भावना लेखक दिग्दर्शक हृदयमानव अशोक यांनी व्यक्त केलेली आहे. हा लघुपट हृदयमानव अशोक,स्वाती कडू, संजली गायकवाड यांनी मुख्य; तर आकाश पवार, अमोल घाटविसावे, महेश होनमाने, शितल भंडारे, अर्चना मोहिते, मयूरी मोरे, रोहित जगताप, ओम कदम, तन्वी जगताप यांनी मध्यवर्ती भूमिका साकारल्या आहेत.लोकशाहीर संभाजी भगत, ऐश्वर्या पवार,बाबासाहेब आटखिळे यांनी गायलेलं, आकाश पवार यांनी संगीत दिलेलं, हृदयमानव अशोक याने लिहलेलं 'साऊ तुला गं सलामी' हे फुले दाम्पत्याचं स्मरण करणारं आणि भिडे वाड्याची खरी वास्तवदर्शी भीषणता दाखविणारे गाणं सुध्दा दाखविण्यात आलेला आहे.व्हेअर इज भिडेवाडा ? हा प्रश्न जसा हृदयमानव अशोक यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना पडलेला आहे.तसाच तो प्रश्न समस्त जनतेला पडणे अपेक्षित असून ह्या प्रश्नांची दखल घेणारे परिवर्तन लोकांच्या लोकचळवळीने आणि आवाजाने भिडेवाडा हा नव्याने पुनर्जीवीत व्हायला हवा.

# सहल...एक शिक्षणसंधी



संजय बोरसे
संपर्क क्र. 9404031721

आधुनिक केसरी

**सहलीचे नुसते नाव जरी काढले तरी वर्गातील वातावरण पूर्णपणे बदलून जाते.विद्यार्थी स्वतःहून बोलायला लागतात. रोजच्या रटाळ जीवनातून बाहेरच्या मोकळ्या विश्वात मुक्तपणे भटकायला मिळणार ही कल्पनाच त्यांना सुखदायी, चैतन्यदायी असते. सहलीच्या विषयाच्या वेळी हुशार, मठ्ठ, लहान, मोठा हे सारे भेदाभेद आपसूकच पुसले जातात. प्रत्येक जण आपापल्या कल्पना मांडतो.**



विद्यार्थ्यांमध्ये सहलीची जेवढी उत्सुकता असते त्याच्या एक चतुर्थांशही उत्सुकता शिक्षक वर्गात आढळून येत नाही याची खंत वाटते. कारण बहुतांश लोक सहल ही धोक्याची घंटा मानतात.केवळ नकारात्मक विचारांपायी ते विद्यार्थ्यांना तर त्या अगणित आनंदापासून वंचित ठेवतातच पण स्वतःही त्या सुखक्षणांना मुकतात.

आपण सहली संदर्भात सकारात्मक विचार केला तर असे लक्षात येईल की सहली केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर शिक्षकांनाही शिकण्याची संधी प्रदान करते.त्या संदर्भात मी अनुभवाने माझे मत मांडणार आहे.आमच्या शाळेची बनेश्वर,केतकवळे,नारायणपूर व पुण्यातील दोन-तीन ठिकाणे पाहण्यासाठी सहन निश्चित झाली. सहली संदर्भात मुख्याध्यापकांनी छान नियोजन केले होते. सहलीला जाताना जेवणाचे डबे,पिण्याचे पाणी, प्रथमोपचार पेटी,संपर्कासाठी भ्रमणध्वनी सोबत घेतले होते. सहलीसाठी विद्यार्थ्यांनी शाळेच्या गणवेश द्यावे असे मत मी मांडले होते मात्र मुख्याध्यापक म्हणाले,"सर,मुले दररोजच शाळेचा गणवेश घालतात. त्यांना एक दिवस तरी रंगीत ड्रेस घालून एन्जॉय करू द्या." मलाही त्यावेळी ते पटले व मनात म्हणालो जर मुलांना एन्जॉय करता येत असेल तर आपण त्यांच्या आनंदाच्या आड का यावे ? आम्ही सहलीला निघालो. सहलीला निघताना विद्यार्थ्यांना नाष्टा केला का ? असे विचारल्यावर त्यांनी होकार दिला.आम्ही सुरुवातीला नारायणपूरला श्री दत्ताचे दर्शन घेतले व नंतर केतकावळे येथे बालाजीचे मंदिर पाहण्यासाठी मंदिरात प्रवेश केला.तेव्हा सकाळची 11 वाजले असावे तेवढ्यात एक विद्यार्थिनी चक्कर येऊन पडली.तिला ताबडतोब उचलून तेथील आरोग्य केंद्रात नेले. औषधोपचार केला.तिला बरे वाटले. डॉक्टरांनी तिला नंतर विचारले,"काही खाल्ले होते का ?" तिने नाही म्हटले. मी तर डोक्यालाच हात लावला.थोडा वेळ विचार केल्यावर असे लक्षात आले की तिच्या आईनेही तिला खाण्याचा आग्रह केला असेलच परंतु सहलीला जायचे म्हटले की मुलांना खाणे पिणे काही सुचत नाही.त्यामुळे मुलांना स्वतःसमक्ष खाऊ घालावे हा पहिला पाठ हा आम्हाला मिळाला.

दुपारनंतर आम्ही राजीव गांधी प्राणीसंग्रहालय कात्रज येथे आलो. तेथे नेहमीच बऱ्यापैकी गर्दी असते मात्र त्या दिवशी खूपच गर्दी उसळली होती. पाच-सहा शाळांच्या सहलीही आल्या होत्या. आमचे विद्यार्थी रंगीबेरंगी ड्रेसमध्ये असल्याने एका पॉईंटवरून दुसऱ्या पॉईंटकडे नेताना आमची मात्र दमछाक होत असे कारण आपला विद्यार्थी कोणता हे चटकन ओळखता येत नसे. दोन-तीनदा जर आमच्या शाळेतील विद्यार्थी नसलेल्या मुलांनाच मी चला पुढे असे म्हटले. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर मात्र अवाक व्हायचो. सॉरी म्हणायचे आणि पुढे चालायचे. शेवटी बाहेर पडताना विद्यार्थी मोजले तर दोन कमी! परत माघारी फिरलो. इकडे शोध तिकडे शोध करतअखेर बहाद्दर सापडले.हे पांढरा भाग मोठ्या आतुरतेने पाहत होते त्यांचा हात धरून नेले.सहलीला नेताना विद्यार्थी गणवेशातच असावे हा दुसरा महत्त्वाचा धडा आम्ही सर्वजण शिकलो ते कायमचा.

दिवसअखेरी आम्ही केळकर संग्रहालयाला भेट दिली. आजवर शिकवताना चिलखत, जिरेटोप, दांडपट्टा, वाघनखे ह्या गोष्टी केवळ शाब्दिक खेळ करून वेळ निभावून नेली होती. आता मुलांना ते प्रत्यक्षात पाहून जे ज्ञान मिळाले ते काही औरच होते व चिरकाल टिकणारे होते. प्राचीन काळातील मुर्त्या, दरवाजे, हस्तिदंत,कलाकुसरीच्या वस्तू पाहताना मुले स्वतःला विसरून गेली होती. आनंदाची चमक त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होती. सहल सुखरूप झाल्याचे समाधानही आम्हाला जाणवत होते. सर्व शिक्षक मित्रांनी वर्षातून किमान एकदा तरी सहन न्यावी याकरताच हा लेखनप्रपंच! सहल नेण्यात धोका नाही तर ते धाडस आहे.ते धाडस सर्वांनी मिळून नियोजनपूर्वक करायला काय हरकत आहे ? नाही ना ? चला तर मुलांना सहलीचा हा अनमोल ठेवा देऊया.

# अर्थशास्त्र, अदानी समूह व हिंडेनबर्ग समूहाचा नेमका अहवाल..!

आधुनिक केसरी

**अदानी समूहासारख्या बलाढ्य कंपन्यांना त्यांचा चालणारा कारभार, आर्थिक उलाढाल यांचा सखोल अभ्यास करून तो जगासमोर आणून अडचणीत आणणारी "हिंडेनबर्ग" सारखी गुंतवणूक संशोधन संस्था नेमकं करते तरी काय ? जाणून घेऊया हिंडेनबर्ग रिसर्च एल.एल.सी बद्दल. हिंडेनबर्ग रिसर्च एलएलसी ही एक न्यूयॉर्क शहरातील गुंतवणूक संशोधन संस्था आहे.**

हिंडेनबर्गची स्थापना २०१७ साली अमेरिकन नागरिक व हिंडेनबर्गचे संस्थापक "नाथन अँडरसन" यांनी केली आहे. ही संस्था विविध कंपन्यांच्या शॉर्ट-सेलिंगवर,शेअर मार्केट मधील इतर उलाढाली तसेच कंपनीच्या माध्यमातून होणारे अनेक मोठमोठाले आर्थिक व्यवहार यांवर लक्ष केंद्रित करते.

हिंडेनबर्ग रिसर्च कंपनी वरील सर्व बाबींचा अभ्यास करून तिच्या वेबसाइटद्वारे असा सार्वजनिक अहवाल तयार करत असते. ज्यात कॉर्पोरेट घोटाळा आणि गैरप्रकार केल्याचा आरोप समोरच्या कंपन्यांवर होऊ शकतो.

हिंडेनबर्ग रिसर्च ही आपल्या लक्ष्यित कंपनीचा सदर तपास अहवाल सहा किंवा अधिक महिन्यांत तयार करत असते. यासाठी ही कंपनी सदरील कंपन्यांच्या सार्वजनिक नोंदी, अंतर्गत कॉर्पोरेट दस्तऐवज तसेच त्यांच्या कर्मचाऱ्यांशी बोलून त्याचे विश्लेषण करत असते.

त्यानंतर हा अहवाल हिंडेनबर्गच्या मर्यादित भागीदारांना प्रसारित केला जातो, जे हिंडेनबर्गसह एकत्रितपणे ठरवलेल्या कंपनीमध्ये गुंतवणूक करते. ठरवलेल्या कंपनीच्या शेअरची किंमत कमी झाल्यानंतर हिंडेनबर्ग आपला नफा कमवायला सुरुवात करते. अदानी समूह ही पहिली कंपनी नाही जिच्याबाबत हिंडेनबर्गने अहवाल दिला आहे. याआधीही त्यांनी अनेक बड्या कंपन्यांविरोधात असे अहवाल दिले आहेत. ही कंपनी कोणत्याही कंपनीला लक्ष्य करते आणि त्यातील त्रुटी दाखवते. या अहवालामुळे जेव्हा कंपनीचे शेअर्स घसरतात तेव्हा ती खरेदी करून हा नफा कमावते.

हिंडेनबर्गच्या अहवालामुळे अदानीचे शेअर्स २५ टक्क्यांनी घसरले आहेत. अदानी समूहाच्या या अहवालापूर्वीही हिंडेनबर्गने अनेक कंपन्यांविरुद्ध असे अहवाल जारी केले आहेत. २०२० मध्ये असे सुमारे १६ अहवाल प्रसिद्ध करण्यात आले होते. या अहवालांमुळे कंपन्यांचे शेअर्स सरासरी १५ टक्क्यांनी घसरले.

हिंडेनबर्गने Nikola, SCWORX, Genius Brand, Ideanomic, Vince Finance, Genius Brands, SC Wrox, HF Food, Bloom Energy, Aphria, Twitter Ink या कंपन्यांविरुद्ध यापूर्वी अहवाल दाखल केला आहे. या अहवालांमध्ये सदरील कंपन्यांच्या शॉर्ट-सेलिंगच्या पद्धतीचा बचाव आणि गुंतवणूकदारांचे संरक्षण यावर देखील अभ्यासपूर्ण विश्लेषण केले होते. हा अहवाल काही ठोस अभ्यासावर आधारित असतो, ज्यात शेअर मार्केटमध्ये काही आर्थिक गैरव्यवहार होत आहे का. ? तो कितपत योग्य,अयोग्य पद्धतीने होत आहे किंवा योग्य पद्धतीच्या अडून किती गैरमार्गाने तो होत आहे. ? या अश्या वरील नामांकित मोठ्या कंपन्या आपल्या स्वतःच्या फायद्याकरता कंपनीच्या खात्यात चुकीच्या नोंदी किंवा गफलत करत आहेत का. ?

एखादी कंपनी स्वतःच्या फायद्याकरता शेअर मार्केटमध्ये चुकीच्या दुसऱ्या कंपन्यांच्या शेअर्सची पूर्वनियोजित बोली लावून कोणाचे हेतुपुरस्सर नुकसान तर करत नाही ना. ?

अश्या अनेक बाबींचे अभ्यासपूर्ण संशोधन पूर्ण केल्यानंतर 'हिंडेनबर्ग रिसर्च' कंपनी एक सविस्तर अहवाल प्रसिद्ध करते. जो अनेकदा सामान्य जनतेसाठी,तसेच संबंधित कंपनीत आर्थिक गुंतवणूक करणाऱ्या छोट्या कंपन्यांसाठी धक्का देणारा असा असतो. अश्यावेळी सरळ मार्गे या कंपनीच्या अहवालाचा परिणाम जगभरातील शेअर बाजारावर दिसून येत असतो. जसा काही दिवसांपूर्वी आपण अदाणी समूहाच्या बाबतीत सादर केलेल्या अहवालानंतर अनुभवला.

**-भारत लक्ष्मण सोनवणे.**
**-९३०७९१८३९३.**
**एम.बी.ए (उत्पादन आणि विपणन व्यवस्थापन).**



# रमेशची व्यथा- गुरुजींची ममता

आधुनिक केसरी

**परीपाठ झाल्यावर सर्व मुले आपापल्या वर्गात गेली. वर्गशिक्षक हजेरी आणि पुस्तके घेऊन आपापल्या वर्गात गेले. आठवीचे वर्गशिक्षक श्री. पाटीलसर मुलांची हजेरी घेत होते. तेवढ्यात रमेश हा धापा टाकीत पाटीलसरांना विचारून वर्गात आला. पाटीलसरांनी त्याच्याकडे पाहिले व मुलांना सांगितले, " आपल्या वर्गातील मुलांना शाळेची वेळच माहिती नाही. कधीही यायचे आणि कधीही जायचे. आओ जाओ घर तुम्हारा. रमेश आज उशिरा आला आहे. त्याच्यासाठी सर्वांनी टाळ्या वाजवून त्याचे स्वागत करा." सर्व मुलांनी टाळ्या वाजविल्या. तसे पाहता पाटील गुरुजी रमेशच्या वर्गाला मराठी विषय उत्कृष्ठ शिकवायचे. पण अत्यंत कडकवृत्तीचे, शिस्तप्रिय असा त्यांचा नैतिक वचक आणि दरारा होता. शाळेतील प्रत्येक मुलांवर त्यांचे वैयक्तीक लक्ष होते. म्हणून त्यांच्या समोर कोणताच विद्यार्थी यायला घाबरत असे.**

रमेश हा त्याची जागी जाऊन बसला. त्याची मान शरमेने खाली होती. वर्गात शांतता होती. रमेश रडू लागला. पाटीलसरांनी सांगितले, " कोण रडतयं रे." सर्व मुलांनी रमेशकडे पाहिले, आणि रमेशचे नाव सरांना सांगितले. मग पाटीलसर उठले व रमेशला पुढे बोलावले. रमेश हा रडत-रडतच पुढे आला. सरांनी सांगितले, " तू का रडतो आहे ?" सुरुवातीस रमेश काहीच बोलेना तो पुन्हा ढसा-ढसा रडायला लागला. कारण भरल्या वर्गात त्याचा आपमान झालेला होता. आणि ते आपमान त्याला सहन झाले नाही. तो आठवीच्या वर्गातला एक हुषार- प्रामाणिक व आज्ञाधारक विद्यार्थी होता. नंतर पाटीलसरांनी त्याला पुन्हा दरडावून विचारले. मग रमेशने सांगायला सुरुवात केली.

" सर, माझी बहिण सरीता हीला रात्रीपासून खूप ताप आला आहे. म्हणून मला आज शाळेत येण्यासाठी उशिर झाला आहे. " आणि रडू लागला. पाटीलसर म्हणाले, " त्यात रडण्याचे काय कारण आहे. घरचे दाखवतील ना दवाखान्यात." यावर रडता-रडता रमेश म्हणाला," घरी कोणीच नाही सर, सहा महिन्यापूर्वीच माझे आईवडिलासह सारे कुटुंब एका आपघातात वारले. ठेकेदारांनी समृध्दी महामार्गाच्या कामासाठी त्यांना ट्रकमध्ये कामावर नेले होते. रस्त्यात ट्रकचा आणि बसचा भीषण आपघात होऊन माझे सर्व कुटुंब त्यात ठार झाले. सुदैवाने फक्त माझी मोठी बहीण सरीता एकटीच



वाचली, " आणि रमेश धायमोकलून रडू लागला. तसे वर्गातल्या सर्व मुलांच्याही डोळ्यातून अश्रु वाहू लागले. पाटीलसरांचेही डोळे पाणावले. पुढे रमेश म्हणाला, आता या जगामध्ये माझी मोठी बहीण सरीताशिवाय माझे कोणीही नाही. तीला ताप आल्याने तीची देखभाल करण्यात वेळ गेला. आणि मला शाळेत यायला उशीर झाला आहे. सरीता कामाला जाऊन सकाळी व संध्याकाळचे जेवन तयार करते. मी दुपारी शाळेत मिळणारी खिचडी खातो." रमेशची कहानी ऐकून पाटीलसरांचे मन कळवळले. त्यांना रमेशची दया आली. सरीताला दवाखाण्यात नेण्यासाठी पाटीलसरांनी खिशातून पाचशे रूपयांची नोट काढून रमेश देऊ लागले. व म्हणाले," तुझ्या बहिणीला दवाखान्यात दाखव. तिला बरे वाटेपर्यंत तू शाळेत येऊ नकोस. पैसे दयायला लागले." पण रमेश रडता-रडता म्हणाला, " नको सर, पैसे आहे. सरीताताईच्या कामाचे. रमेशने सरीताला दवाखान्यात नेले. दोन दिवसांनी सरीताला बरे वाटु लागले. शिस्तप्रिय व कडकवृतीचे शिक्षक पाटीलसर आता रमेशची घरच्या कुटुंबासारखी रोज चौकशी करू लागले. रोज त्यांच्या जेवण्याच्या डब्यामध्ये दोन-तीन पोळ्या व भाजी जास्त आणून रमेशला खिचडी वाटपाच्या वेळी त्या पोळ्या व भाजी देऊ लागले. पाटीलसरांच्या अशा जिव्हाळ्यामुळे रमेश उत्साहाने व जिद्दिने अभ्यास करू लागला. पुढे परीक्षा झाल्या. आठवीच्या वर्गातून रमेश हा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. पाटीलसराने भरल्या वर्गात रमेशला पुढे बोलावून एक हजार रुपयांचे बक्षिस देऊन, म्हणाले," रमेश यापुढे ही तुझ्या जीवनात असाच पहिला क्रमांक मिळवत जा. खूप मेहनत कर." असे आशिर्वाद दिले. आणि मुलांनी टाळ्या वाजवून रमेशचे अभिनंदन केले. तेव्हापासून रमेश हा शाळेच्या प्रत्येक उपक्रमातून प्रथम येऊ लागला. वर्गातल्याच नव्हे तर संपूर्ण शाळेतील मुले- मुली रमेशकडे सन्मानाने पाहत-वागत होते. पाटीलसरांच्या उपदेशामुळे आता रमेशला त्याच्या जीवनात जगण्याची एक नवीन संजीवनी मिळालेली होती.

**अय्युब पठण लोहगांवकर,**
**ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.**

# व्याख्याते, प्रवचनकारांसाठी उपयुक्त पुस्तक 'चंद्रामृत भाग'

आधुनिक केसरी

**सुप्रसिद्ध प्रवचनकार, कीर्तनकार ह.भ.प. डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांच्या सिद्धहस्त आणि चतुरस्त्र लेखणीतून साकारलेले एक निर्व्याज मनोरम पुस्तक म्हणजे चंद्रामृत भाग २. डॉ. शास्त्रींची अनेक व्याख्याने, प्रवचने सातत्याने होत असतात. तसेच अनेक वृत्तपत्रांमधून आणि समाज माध्यमात देखील ते सातत्याने लेखन करतात. या व्याख्याने, प्रवचने आणि लेख यांच्यावर आधारित पुस्तक म्हणजे चंद्रामृत भाग २ होय.**

या पुस्तकात विविध विषयांवरील शास्त्रीजींचे लेख आणि मुलाखत यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यांचा थोडक्यात सारांश असा की,

**श्रीगणेशवन्दनम् ।**

"**कलौ चण्डीविनायकौ** |" असे शास्त्रवचन आहे. अर्थात कलियुगात भगवान श्रीगणेश आणि भगवती चंडिकादेवी यांच्या उपासनेचे अत्यधिक महत्व आहे. अनेक प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक ग्रंथांमध्ये भगवान श्री गणपतीचे वंदन, स्तवन, स्तोत्र, अष्टक अनेक भाषांमध्ये आपल्याला आढळते. या पार्श्वभूमीवर आपण देखील गणरायाच्या चरणी आपली सेवा रुजू करावी, या हेतूने या वंदनात्मक स्तोत्राची रचना डॉ. शास्त्रींकडून भगवंतांनी करवून घेतली आहे. त्या रचनेचा समावेश या लेखात आहे. आनंद रामायणातील श्रीरामाष्टक

संस्कृत, हिंदी, मराठी या भाषेतील अनेक काव्ये ही रामायणावर आधारित आहेत. रामायणाची साहित्यिक उपजीव्यता अद्वितीय अशा प्रकारची आहे. समर्थ श्री रामदास स्वामी, श्रीधरस्वामी, ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज अशा अनेक साधू संतांनी मराठीभाषेतून रामायणाची, रामनामाची महती सांगितली आहे. श्रीराम कथेतील तत्त्व हे नित्य अशा प्रकारचे आहे. त्याची मांडणी कालानुरूप होणे आवश्यक असते. आणि तशी ती प्रभू रामरायांच्या कृपेने झाल्याचे दिसून येते. संत तुलसीदास यांचे नंतर देखील हिंदीतही ती मालिका सुरूच राहिली. राष्ट्रकवी मैथिलीशरण यांनीही आधुनिक काळात काव्याच्या माध्यमातून राम कथा गायिली आहे. रामायणाच्या या मालिकेत आनंद रामायण देखील प्रसिद्ध आहे. प्रस्तुत रामायणात भगवान श्रीरामाचे नितांत सुंदर असे अष्टक येते. या अष्टकाचे निरुपण या लेखात आहे.

शरण शरण जी हनुमंता । तुज आलो रामदूता ॥

जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून अगदी प्रासादिक शब्दांमध्ये मारुतीरायांच्या विषयीचा आपला आदरभाव व्यक्त केला आहे. या अभंगाचे निरुपण या लेखात आहे.

"सार्थ बोधवचने" प्रकाशन

प्रा. डॉ. दत्तात्रय तापकीर यांच्या सार्थ बोधवचने या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. शास्त्रींच्या हस्ते पार पडले. त्या प्रसंगीच्या व्याख्यानाचा सारांश या लेखात आहे. संस्कृत भाषा प्रचारिणी सभाः प्रज्ञाभारति पुरस्कारानिमित्त संबोधन नागपूर येथील प्रतिष्ठित अशा संस्कृत भाषा प्रचारिणी सभा यांचेकडून डॉ. शास्त्रींना प्रज्ञाभारति पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगीच्या व्याख्यानाचा सारांश या लेखात संस्कृत भाषेत आहे. चला, माणूस होऊ या. "केवळ स्वतः नाही, आपल्या समवेतची प्रत्येक व्यक्ती आनंदी असायला हवी." असं ज्याला वाटतं तो माणूस. पण माणसाच्या या माझ्या व्याख्येत जगातील किती टक्के मनुष्याकृती प्राणी येतील, प्रश्नच आहे. खरं तर भगवंताची सर्वात सुंदर कलाकृती म्हणजे माणूस.

सुखाचं गणित गणित

कितीही अवघड असो, सोपं असो किंवा लहान मोठं असो; ते फक्त ०१२३४५६७८९ या दहा अंकांभोवतीच भ्रमत असतं. माणसाचंही असंच असतं. या विषयीचे निरुपण या लेखात आहे.

परस्परावलंबित्व, माणूस आणि आनंदाचा मार्ग.

मानवच काय, अगदी पशु पक्षी वनस्पती सर्वांचेच जीवन हे तसे कॉम्प्लेक्स असते. आणि याचे एक प्रमुख कारण परस्परावलंबित्व असण्याची शक्यता आहे. गरजा कितीही कमी असो किंवा अधिक; त्यांची पूर्तता करण्यासाठी अन्य कोणावर तरी अवलंबून रहावे लागते. माणसाच्या या सुंदर स्थितीचा मागोवा या लेखात आहे.

हसायला लावणारी माणसं...!

एका सज्जन व्यक्तीच्या बाबतीत मी असे निरीक्षण केले की, हसायला लावणा-या प्रेमळ माणसांनी अशी काही साथ दिली की, वेळ फक्त हसण्यासाठीच राहीला. एखाद्या कुशल डॉक्टर सारखं हसत हसवत हृदय बाहेर काढलं. कॉर्बोरेटर ऑईलनं साफ करावं, तसं आशीर्वाद आणि शुभेच्छांच्या स्निग्धतेने हृदय स्वच्छ केले. आणि निखळ हास्य तेवढं हृदयात ठेवलं. अशा सकारात्मक माणसांविषयीचे चिंतन या लेखात आहे.

आधुनिक तंत्रज्ञान संस्कृत भाषेला पोषक!

केवळ भारतीयच नव्हे, तर मॅक्समुलर, गटे, शोपेनहावर प्रभृती पाश्चात्य विचारवंतांना देखील संस्कृत साहित्याने प्रभावित केले होते. भारतातीलच नव्हे, तर जगातील एक प्राचीन भाषा म्हणून संस्कृत भाषेची ओळख आहे. श्रावण पौर्णिमेला सर्वत्र संस्कृतदिन साजरा केला जातो.




त्या निमित्त

संस्कृत भाषेचे अभ्यासक, कवी, आणि संस्कृत भाषेच्या प्रचारासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या भूमिकेचे पुरस्कर्ते प्रा. डॉ. चंद्रहास सोनपेठकर यांची विशेष मुलाखत या लेखात आहे. भाषा विचारसामान्यतः विचार अभिव्यक्त करण्याचे साधन अशी परिभाषा 'भाषा' या संज्ञेची केली जाते. " भाषा-विचार" या लेखात आपल्याला भाषा, मराठी भाषा आणि त्यातील विविध शब्द तसेच त्यांचे व्युत्पत्यर्थ, शुद्धलेखन इत्यादी विषयांचा विचार या लेखात मांडला आहे.. भाषा विचार महर्षी पतंजलींना आपण योगसूत्रकार म्हणून ओळखतो. ते व्याकरणकार देखील होते. त्यांचा व्याकरणमहाभाष्य नामक ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यात त्यांनी भाषेची व्याख्या दिली आहे, ती पुढीलप्रमाणे, "व्यक्ता वाचि वर्णा येषां त इमे व्यक्त वाच|" अर्थात भाषा हे एक साधन आहे, ज्यामुळे माणूस आपले विचार अन्य लोकांसमक्ष स्पष्टपणे प्रकट करू शकतो आणि अन्य लोकांचे विचार स्पष्टपणे समजू शकतो. या व्याख्येचे निरूपण या लेखात आहे.

**"विद्यार्थ्याला निर्भय वाटलं पाहीजे."**

संस्कृत कवी, सुप्रसिद्ध व्याख्याते, आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक अशी ओळख असलेले डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांच्या अध्यापन कार्यास यावर्षी १६ वर्षे पूर्ण झाल्या निमित्तची विशेष मुलाखत येथे देण्यात आली आहे.

राष्ट्रकवि श्रद्धेय अटलजी अटलजींना भारतरत्न मिळाले. खरं तर अटलजींच्या रूपाने भारतदेशाला रत्न मिळालेच होते. ते रत्न आहे, यास एक वैधानिक मान्यताच जणू भारतरत्न पुरस्काराने दिली आहे. श्रद्धेय अटलजींविषयीच्या डॉ. शास्त्रींचे भावविश्व या लेखात प्रकटले आहे.

ती शाबासकीची थाप...!नामवंत व्याख्याते, निरुपणकार असे आदरणीय विवेकजी घळसासी. शास्त्रींच्या हृदयात अक्षय अशा प्रकारचा आदर असणारं हे व्यक्तिमत्व. आदरणीय विवेकजी यांच्या विषयीचे डॉ. शास्त्रींचे भावविश्व या लेखात प्रकटले आहे. संत साहित्यातील गीता महात्म्य

वारकरी संप्रदाय हा जगाच्या पाठीवरील एक क्रांतिकारी असा संप्रदाय आहे. वेदांत संप्रदायाचे अधिष्ठान या संप्रदायाला आहे. ब्रह्मसूत्र, उपनिषद आणि गीता अशी वेदांत तत्त्वज्ञानाची प्रस्थानत्रयी मानली जाते. वारकरी संप्रदायात देखील श्रीमद्भगवद्गीतेचे आत्यंतिक अशा प्रकारचे महत्व आहे. कैवल्यसाम्राज्यचक्रवर्ती माऊली महावैष्णव ज्ञानोबारायांनी श्रीमद्भगवद्गीतेवर भावार्थदीपिका नावाची टीका लिहिली. तोच ग्रंथ पुढे ज्ञानेश्वरी म्हणून प्रसिद्ध झाला. अशा प्रकारे विविध संतांच्या अभंगांतून व्यक्त होणारे गीता महात्म्य या लेखात निरूपित करण्यात आले आहे. अध्यक्षीय प्रास्ताविक संस्कृत साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थान डॉ. शास्त्रींनी भूषविले. त्यावेळी केलेले प्रास्ताविकपर संस्कृत व्याख्यानाचा सारांश या लेखात आहे.

पहिले प्रवचनचंद्रहास शास्त्रींनी वयाच्या चौथ्या वर्षी संत श्री ज्ञानेश्वर माऊली जन्मस्थान, आपेगाव येथे पहिले प्रवचन केले. त्याची ही हृद्य आठवण आणि वै. गुरुवर्य श्री. विष्णूमहाराज गुरुजी कोल्हापूरकर यांच्या विषयीची कृतज्ञता या लेखात व्यक्त करण्यात आली आहे. आधुनिक केसरी परिवारः एक छान अनुभव डॉ. शास्त्री आधुनिक केसरी वृत्तपत्रातून सातत्याने लेखन करतात. या वृत्तपत्राच्या व्यवस्थापन आणि संपादन यांच्या बाबतीतील सकारात्मक अनुभवाचा आलेख या लेखात मांडण्यात आला आहे.

अर्थातच हे पुस्तक वाचताना देखील आपण शास्त्रीजींचे व्याख्यान ऐकत आहोत, असे वाटते, इतके हे लिखाण प्रभावी आणि सहजतापूर्ण आहे. संस्कृत अध्यापिका आणि अभिज्ञान, पुणे च्या संचालिका सौ. मानसी चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांनी या पुस्तकाचे संपादन केले आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी सुप्रसिद्ध साहित्यिक ऋचा पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. चंद्रहास शास्त्री यांच्या अमृततुल्य शब्दांनी ओथंबलेले हे चंद्रामृत रसिकांना नक्कीच आवडेल.

**सौ. रोहिणी पांडे, पुणे**
**चंद्रामृत भाग २**
**शॉपिजेन प्रकाशन, अहमदाबाद**
**पृष्ठे ६५**
**किंमत १५०**

# सर्वधर्म समभाव जपणारे राजे : छत्रपती शिवाजी महाराज



प्रा. प्रशांत खामकर
संपर्क क्र. 9970423204

आधुनिक केसरी

**भगवद्गीता वाचल्यावर हिंदू धर्म समजतो; कुराण वाचल्यावर मुस्लिम धर्म समजतो; बायबल वाचल्यावर ख्रिश्चन धर्म कळतो; त्रिपिटीका वाचल्यावर बौद्ध धर्म समजतो; अवेस्ता वाचल्यावर पारशी धर्म कळतो तर गुरुग्रंथसाहिब वाचल्यावर शीख धर्म समजतो परंतु छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र वाचल्यावर कोणता धर्म, पंथ, जात समजत नाही, समजते ती फक्त माणुसकी, मानवता,समता आणि बंधुता.**

छत्रपती शिवाजी महाराजांची लढाई मुस्लिम धर्माविरुद्ध नाही; ती लढाई होती सत्याची, असत्याच्या विरोधात; नीतीची, अनितीच्या विरोधात; गुलामगिरीच्या विरोधात स्वातंत्र्याची आणि हुकूमशाहीच्या विरोधात लोकशाहीची. राजांच्या संपूर्ण इतिहासात त्यांनी एकाही मस्जिदीस धक्का लावला नाही. सैन्याला सक्त ताकीद देण्यात आली होती की, कोणत्याही मस्जिदीस तोशिश लागता कामा नये. मोहिमेवर असताना जर कुराणाची प्रत सापडली तर मुस्लिम सैनिकांकडे ती पूज्य भावनेने सुपूर्त केली जाऊन त्या गावातील मुस्लिम बांधवांना सन्मानाने दिली जात असे. स्वराज्यात जशी मंदिरे होती, तशाच मस्जीदही होत्या, दर्गाही होते. शिवरायांनी मंदिराप्रमाणे

मस्जिदलाही देणग्या दिल्या आहेत. शिवरायांनी ज्यांना आपले गुरु मानले, ते सुफी संत याकूत बाबा यांच्या दर्ग्यासाठी स्वराज्यातील रत्नागिरी जिल्ह्यातील केळशी येथील शेकडो एकर जमीन राजांनी दान केली . याची नोंद सुवर्णदुर्ग तालुक्याच्या सरकारी दप्तर मध्ये आढळते.तसेच सुफी संत याकूत बाबा यांना आजन्म निवृत्ती वेतन दिले. स्वराज्यात मंदिरांमध्ये ज्याप्रमाणे पूजा-पाठ चालत असे; अगदी त्याच वेळी स्वराज्यातील मस्जिदीमध्येही व्रतवैकल्ये चालत. शिवराय मुस्लिम द्वेशी नव्हते तर सर्व धर्माच्या लोकांना एकत्रित आणणारा विचार राजांनी जपला. त्यांनी केलेल्या लढाया धर्मा-धर्मातील मुळीच नव्हत्या. हिंदूंप्रमाणे मुस्लिम बांधवांना समान न्याय देण्याचे काम त्यांनी केले. सैन्याची तसेच अधिकाऱ्यांची भरती करताना जात किंवा धर्माचा आधार राजांनी न घेता कर्तुत्वाच्या आधारे भरती केली. स्वराज्याच्या तोफखान्याचा प्रमुख इब्राहिम खान होता. स्वराज्याच्या आरमाराचा प्रमुख दर्यासारंग दौलत खान होता. अफजल खान ज्यावेळी स्वराज्यावर चालून आला; त्यावेळी अफजल खानाची माहिती देऊन त्याचा वध करण्यासाठी वाघनखे राजांना देणारा रुस्तुमे जमाल होता. राजे ज्यावेळी पन्हाळगडाच्या वेढ्यात अडकले; त्यावेळी स्वतःच्या जीवाची परवा न करता शत्रुवर तुटून पडणारा हिंदू सैनिकांसह प्राणपणाने लढणारा सिद्धी हिलाल व त्याचा मुलगा वाहवा हे होते. सिद्धी हिलाल खान हा स्वराज्यातील सर्वात ज्येष्ठ सरदार होता. शहाजी महाराजांपासून ते शिवाजी महाराजांपर्यंतच्या काळापर्यंत तो भोसले घराण्याची एकनिष्ठ राहिला. शिवाजी महाराजांचे बरेचसे अंगरक्षक मुस्लिम होते. शिवाजी महाराज १७ ऑगस्ट १६६६ मध्ये आग्रा येथे कैद असताना राजांची सुटका करण्यासाठी



मृत्यूशय्येवर थांबणारा, स्वतःच्या जीवाची बाजी लावणारा हिरोजी फर्जंदसह, मदारी मेहतर होता. राजांनी छत्रपतींच्या गादीवर चादर चढवण्याचा मान कायमचा मेहतर या मुस्लिम कुटुंबीयांना दिला. स्वराज्यातील मुस्लिम सैनिकांना नमाज पठण करण्यासाठी वेळ दिली जात असे. अफजल खान ठार झाल्यानंतर प्रतापगडाच्या पायथ्याशी त्याची कबर बांधण्यासाठी स्वराज्यातील जागा शिवाजी महाराजांनी दिली. अफजलखानाचा मुलगा फाजल खान याला बोलावून त्याचा विधी करून घेतला. तिथे दिवाबत्ती करण्यासाठी नेमलेला जो हाजीम आहे

त्याच्यासह दिवाबत्तीचा खर्च स्वराज्याच्या तिजोरीतून केला गेला. रायगड बांधत असताना जगदीश्वराच्या मंदिराजवळच मस्जिद बांधण्याचा आदेश दिला. अफजलखानाशी बोलणे करण्यासाठी शिवाजी महाराजांनी पाठवलेला वकील काझी हैदर होता. शिवरायांचे एकमेव चित्र ज्यांच्यामुळे आम्हाला समजले तो स्वराज्याचा पहिला सरनोबत नूरखान होता. गोवळकोंडा येथील मुस्लिम बादशहा कुतुबशहा यांनी शिवरायांकडून स्वातंत्र्याची प्रेरणा घेऊन आपले गेलेले राज्य पुन्हा मिळविले. आदिलशाहीच्या चाकरीमधून स्वराज्यात आलेले सातशे पठाण यांना शिवरायांनी आश्रय दिला. त्या पठाणांनी इ.सन १६५८ पासून स्वराज्याची निष्ठेने सेवा केली. छत्रपती शिवाजी महाराजांवर पहिला वार करणारा मुसलमान नव्हता. जब अपनोंनेही समशेर शिवाजी महाराज के खिलाफ उठाई; तब वह वार सीने पर झेलनेवाले वीर हिंदूओंके साथ मुसलमान भी थे.

ज्यावेळी शिवरायांनी सुरतेवर छापा मारला. तेव्हा येताना तेथील एका चर्चलाही त्यांनी देणगी दिलेली आहे. परस्त्री मग ती हिंदू असो, वा मुसलमान, तिला स्वराज्याच्या गाभाऱ्यातील देवता बनवण्याचे काम शिवरायांनी केले. मोघली फौजीतील शिवरायांच्या विरोधात उमर खिंडीत लढणारी सरदार रायबाघीन एक मुस्लिम स्त्री होती. त्यात तिचा पराभव झाला. ती पकडली गेली. असे असतानाही तिला तिच्या पदानुसार सन्मानाची वागणूक देऊन; मोगली छावणीत सुखरूप पाठविण्याचे काम शिवाजी महाराजांनी केले. कल्याणचा मोगल सुभेदार संपत्ती घेऊन पळून जात असताना मावळ्यांनी छापा मारला. त्याची सर्व संपत्ती जप्त केली. अशावेळी नजराना म्हणून आणलेल्या त्याच्या सुनेविषयी बोलताना राजे म्हणतात की, "अशीच असती आमुची माता सुंदर रूपमती; किती सुंदर झालो असतो आम्ही वदले शिवछत्रपती".

स्त्रीचा अनादर जिथे झाला तिथे महाविध्वंस घडविणारे रामायण, महाभारत घडले परंतु परस्त्रीला मातेचा दर्जा जिथे प्राप्त झाला; तिथे नवनिर्मिती घडविणारे स्वराज्य उभा राहिले.

छत्रपती शिवाजी महाराजांना आपला आदर्श शीख धर्माचे सरदार भगतसिंग यांनी मानला. रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन स्वातंत्र्यलढ्याची ठिणगी पेटली. "एक वेळ जन्म दिलेल्या बापाचे नाव बदलेल;परंतु महाविद्यालयाला दिलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव कदापी बदलणार नाही!" असे धनिकाला ठणकावून सांगणारे पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील हे जैन धर्माचे होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज कोणत्या जातीची किंवा धर्माची मक्तेदारी नाही. शिवाजी महाराज हे एक राष्ट्रपुरुष आहेत. त्यांनी कोणत्याही धर्माला राजाश्रय दिला नाही. बौद्ध धर्म स्वीकारलेले विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पत्रकारांशी बोलताना म्हणतात की; "मला संविधान लिहिताना जास्त अडचण आली नाही कारण मी छत्रपती शिवाजी महाराजांचे लोकशाही, धर्मनिरपेक्षता, मानवता व समता जपणारे चरित्र अभ्यासले होते."

धर्माच्या नावाखाली छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन दंगली भडकविल्या जातात. त्यात बळी मात्र सर्वसामान्यांचा व गोरगरिबांचा जातो. त्यासाठी आजच्या तरुणांनी शिवाजी महाराजांचा खरा इतिहास समजून घेणे गरजेचे आहे. शिवरायांच्या जातीत किंवा धर्मात जन्माला येणे हा निव्वळ अपघात आहे. आम्हाला शिवरायांच्या जातीचे नव्हे तर विचारांचे अनुयायी निर्माण करावे लागणार आहेत. पद, प्रतिष्ठा, सन्मान मिळाल्यावर एक वेळ जातीचा व धर्माचा अनुयायी गद्दारी करू शकतो परंतु विचारांचा अनुयायी शेवटपर्यंत निष्ठावंत राहतो. असे समतेचे विचार जपणारी निष्ठावंतांची फौज आज देशात निर्माण करणे गरजेचे आहे.शिवरायांना डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा त्यांचे विचार आज डोक्यात घालण्याची गरज आहे तेव्हाच छत्रपती शिवाजी महाराज यांना अपेक्षित असणारा स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, मानवता व धर्मनिरपेक्षता यावर आधारित समाज निर्माण होईल.

# सावित्रीबाई फुले पुण्यतिथीनिमित्त



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**काही व्यक्ती, काही प्रभृती ज्यांना आपण प्रत्यक्षात कधीही भेटलो नाही, बघितले नाही तरीही, त्यांच्या कार्य रुपी पुण्याईच्या बळावर आपण आज आपल्याला हवे असणारे, सन्माननीय आयुष्य जगत असतो. ज्या माय मराठी भूमीत आपला जन्म झाला त्या आपल्या महाराष्ट्रात अशा अनेक संत महंत, कर्तबगार - कर्तृत्ववान व्यक्तींचा जन्म झाला आहे, आणि ही भूमी पावन झाली आहे. इयत्ता सहावी मध्ये असताना, मराठी विषयात अशाच कर्तृत्ववान दाम्पत्याची, महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती सांगणारा एक धडा होता. त्याआधीही काही गोष्टींच्या पुस्तकातून त्यांच्या विषयी, त्यांना कराव्या लागणाऱ्या संघर्षाविषयी माहिती वाचली तेव्हा मनोमन त्यांच्याविषयी आदरभाव मनात दाटून आला होता जो आज अजूनही वृद्धिंगत होत आहे.**

आपले वैयक्तिक आयुष्य सुखासीन नसताना, आपण स्वतःच खडतर पायवाटेवरून चालत असताना, स्वतः पलीकडे जाऊन समाजाचा विचार करणारे हे महान दाम्पत्य वंदनीय आहे हे तेव्हाच कोणी न शिकवता, न सांगता तेव्हाच्या बालबुद्धीला उमजले. त्याच आदरणीय सावित्रीबाई फुले यांना आज ही लेखरुपी शब्दांजली!

समाजसुधारक, कवयित्री, अध्यापिका, समाजसेविका, विद्याग्रहण करणारी पहिली महिला आणि तत्कालीन समाजातील महिलांच्या मुक्तिदाता अशा सावित्रीबाई फुले ज्यांनी आपले संपुर्ण आयुष्य महिलांना शिक्षीत करण्याकरता आणि त्यांना त्यांचा हक्क मिळवुन देण्याकरता व्यतीत केले, ज्यांनी हार न मानता आणि धैर्य खचु न देता संपुर्ण आत्मविश्वासाने संघर्षाला जाऊन यश मिळवले त्यांचा आज जन्म दिवस! 3 जानेवारी 1831 रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे त्यांचा जन्म झाला. सावित्रीबाईंनी 1848 साली पुण्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली. त्यांचे पती महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रेरणादायी साथीने त्या सतत समाजासाठी कार्यशील राहिल्या. लग्नानंतर ज्योतिबांनी त्यांना लिहायला वाचायला शिकविले. तो काळ सामाजिक, शैक्षणिक दृष्टीकोनातुन स्त्री शिक्षणासाठी पोषक काळ नव्हता. म्हणूनच सावित्रीबाईंच्या शिक्षणाकरता ज्योतिबांच्या परिवाराकडून देखील विरोध केला गेला. जुन्या चालीरीतींचा पगडा असल्याने आणि समाजाच्या भितीने त्या दोघांना कुटुंबापासून विभक्त व्हावे लागले. पण तरी त्या नंतरही ज्योतिबांनी सावित्रीबाईंचे शिक्षण सुरूच ठेवले.इतक्या विरोधानंतर न खचता देखील सावित्रीबाईंनी आपले शिक्षण पुर्ण केले. शिक्षण पुर्ण केल्यानंतर या अध्यायाला तिथेच त्यांनी पूर्ण विराम दिला नाही. तर, या शिक्षणाचा उपयोग समाजातील इतर महिलांना शिक्षीत करण्याकरता करावा असा पवित्र विचार सावित्रीबाईंनी केला.

हे अमलात आणणे त्यांच्यासाठी आव्हानात्मक होते. कारण त्या काळात महिलांना शिक्षणाची अनुमती नव्हती. आणि नेमक्या याच रूढी, गैरसमज, परंपरा, अंधश्रद्धेला मुळापासून उपटून काढण्यासाठी सावित्रीबाईंनी खुप संघर्ष केला आणि सावित्रीबाईंनी पती ज्योतिबांच्या सहाय्याने 1848 साली मुलींची पहिली शाळा उघडली. ही शाळा म्हणजे भारतातील मुलींकरता सुरू होणारे पहिले महाविद्यालय ठरले. येथे एकुण 9 मुलींनी प्रवेश घेतला, सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिका देखील बनल्या.

कालांतराने या शाळेत मुलींची संख्या वाढत गेली. अस्पृश्य समाजातील मुलींची संख्या यात लक्षणीय होती हे विशेष नमुद करण्याजोगे! हा सामाजिक बांधिलकीचा त्यांचा प्रवास सोपा नक्कीच नव्हता. सावित्रीबाई शिकविण्याकरता ज्यावेळेस घरून निघत असत त्या दरम्यान शाळा ते विद्यालय हे अंतर पार करतांना त्यांना अनेक वाईट प्रसंगाचा सामना करावा लागला. रस्त्याने जाताना सावित्रीबाईंवर शेण, दगड, कचरा फेकण्यात येते असे, त्यांना शिवीगाळ केली जात असे. पण तरी देखील त्या त्यांच्या निश्चयापासुन डगमगल्या नाहीत, ध्येयापासुन परावृत्त झाल्या नाहीत. आत्मविश्वासाने आलेल्या प्रत्येक प्रसंगाचा त्यांनी सामना केला आणि स्त्री शिक्षणाची जाज्वल्य ज्योत आपल्या मनात तेवत ठेवली. या शैक्षणिक कार्यात त्यांनी स्वतःला वाहून घेतले होते. सावित्रीबाईंचे आणि ज्योतिबांचे शिक्षणक्षेत्रातील योगदान पाहुन 16 नोव्हेंबर 1852 ला ब्रिटीश शासनाने त्यांचा यथोचित गौरव केला. यानंतर फक्त शैक्षणिकच नाही तर, सामाजिक सुधारणा उपक्रमात देखील त्या हिरीरीने कार्यरत राहिल्या. विधवांची सामाजिक परिस्थीती सुधारावी, त्यांना मानाने जगता यावे म्हणुन, बालकांच्या हत्या थांबाव्यात म्हणुन त्यांनी आश्रमाची उभारणी केली.



सावित्रीबाई अतिशय संवेदनशील मनाच्या होत्या. त्यांचे हे संवेदनशील, हळवे मन त्यांच्या कवितेतून त्या व्यक्त करत गेल्या. "काव्यफुले" आणि "बावनकशी सुबोधरत्नाकर" यात त्यांच्या काव्यरचना आज देखील अजरामर आहेत. ज्योतिबा फुलेंच्या निधनानंतर सुध्दा खचून न जाता, समाजासाठी त्या सतत कार्यमग्न राहिल्या आणि समाजाचे ऋण फेडत राहिल्यात. 1897 ला पुण्यात "प्लेगची" साथ सुरू झाली. सावित्रीबाईंनी स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता रूग्णांची सेवासुश्रृषा त्या करीत राहिल्या. त्यातच त्यांना देखील या आजाराने ग्रासले आणि 10 मार्च 1897 रोजी त्यांनी या जगाचा निरोप घेतला. आज सर्वच क्षेत्रात महिला, पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून नव्हे तर त्यांच्या ही चार पावले पुढे जाऊन आपली शक्ती - बुद्धी या सर्वांचा कस लावून आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. आणि आजच्या या प्रत्येक स्त्रीकर्तृत्वाचे श्रेय फक्त सावित्रीबाई यांनाच जाते.

आताच्या काळातली आपण सर्वच माणसे, अगदी स्वाभाविकपणे स्व मग्न आयुष्य जगत आहोत. मी, माझे, मला, आम्ही, आमचे, आम्हाला या व्यतिरिक्त फार क्वचितच इतर कोणत्या शब्दाने आपल्या दैनंदिन आयुष्यात संवाद घडत असतो. मग या पार्श्वभूमीवर जेव्हा आपण काळाच्या चार पाच दशके मागे जाऊन तेव्हाच्या मनुष्य स्वभावाच्या या पैलूंचा अभ्यास करतो तेव्हा आ वासून थक्क होऊन विचार करत राहण्या पलीकडे फारसे काही हातात उरत नाही.

सावित्रीबाई म्हणायच्या, वेळ विनाकारण व्यर्थ घालवु नका जा आणि शिक्षण प्राप्त करा! हे त्या काळी जेव्हा कोणतीही अद्ययावत तंत्रज्ञान, साधने, दळणवळण यंत्रणा उपलब्ध नव्हती तेव्हा त्यांनी केलेले हे सुज्ञ विधान! आज मोबाईलच्या, कॉम्प्युटरच्या माध्यमातून शिक्षणाची कितीतरी कवाडे आपल्यासाठी घरबसल्या खुली आहेत. घरगुती कामात वेळ वाचावा म्हणून कितीतरी यंत्र आपल्या घरात सज्ज आहेत. तरी देखील, वेळ नाही या नावाखाली कित्येक महिलावर्ग आपली बुद्धी, आपल्यातली उपजत कला, शिक्षणाची संधी हिमती अभावी दवडत आहेत. ही हिम्मत कोणत्या गोळ्या, औषधांनी खचितच येणार नाही. एकदा तरी कृतज्ञ होऊन आपल्याला शिक्षण घेता यावे यासाठी पदरावर शेण, चिखल झेलत, अनंत अडचणी सहन केलेल्या सावित्रीबाईंचे स्मरण केले तरी दहा हत्तीचे बळ मिळेल एवढे आशीर्वाद बाईंचे आपल्यावर आहे.

समाजाप्रती त्यांचे हे अतुल्य संस्मरणीय आहे आणि कायम राहील.

आज 10 मार्च रोजी त्यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

# 'काव्यप्रदेशातील स्त्री' मधील 'स्त्री कवयित्री च्या लेखनाचा आढावा

आधुनिक केसरी

**'काव्यप्रदेशातील स्त्री' लिहितांना , स्त्री-विषय काव्यरूपातून मांडताना, त्या स्त्रीयांच्या काळी असणाऱ्या, त्यांच्या भाव विश्वात रंगणाऱ्या व एकंदरच परिस्थितीची जाणीव करून, साहित्यिकांच्या काव्यातील स्त्री लेखकाने फार शिताफीने शोधून वाचकांसमोर मांडलीच नाही ;तर तिचे अस्तित्वही वाचकांना वाचनीयतेच्या उत्कंठीत अवस्थेत कसे असावे हे दर्शवून दिले आहे. "काव्यप्रदेशातील स्त्री" या पुस्तकाला हातात घेतल्याबरोबर त्याच्या नावासंबंधीची उत्कंठा शिगेला लागते की , "काव्यप्रदेशातील स्त्री" यात काय असावे? पण हे उमजण्यासाठी प्रस्तावनाकडे जाण्यापूर्वीच हातात आलेल्या पुस्तकाचे मुखपृष्ठच मन वेधून घेते. स्त्री मुखवट्याचे स्पष्ट रूप, पुस्तकांवरील प्रकाश देणारा कंदील ; त्या स्त्रीच्या मुखवट्यावरील भाव जणू हे प्रदर्शित करणारे की आज पर्यंत या पुस्तकातून म्हणजे साहित्यातून मला जे स्थान मिळाले आहे ते अजूनही फार लोकांसमोर आलेले नाही अजूनही ते उपेक्षितच आहे आणि या उपेक्षित स्त्रीला समाजासमोर आणण्याचे महत्प्रयासाचे कार्य केले आहे, 'किरण शिवहर डोंगरदिवे' यांनी "काव्य प्रदेशातील स्त्री" च्या रूपाने. 'अथर्व पब्लिकेशन्स्' ने पुस्तकातील अक्षर जुळवणी उत्तमरितीने केल्याने शब्दांमधून उमटणाऱ्या आशय वाचकांपर्यंत योग्य रीतीने पोहोचतोय.**

५०६ पानांचा हा "काव्यप्रदेशातील स्त्री" संग्रह साहित्य क्षेत्रातील ७५ कवी - कवयित्रींच्या एकंदर साहित्य निर्मितीतील "स्त्री" हा विषय घेऊन लिहिलेला पहिलाच संग्रह, खरंतरं साहित्यविश्वात खळबळ निर्माण करणारा आहे. कारण याआधी याप्रकारचे लिखाण साहित्यविश्वात शक्यतोवर निर्माण झालेलेच नाही. 'किरणजी' यांचा हा लेखन प्रपंच खरंतरं त्यांच्या विचारांची, अभ्यासपूर्ण लेखनाची उंची दर्शविणारा आहे. त्याचसोबत या पुस्तकाद्वारे वाचकांना एक अनुभव देणारा आहे, की खरचं मराठी साहित्य क्षेत्र किती विस्तृत व व्यापक आहे.


पुस्तक वाचायला सुरुवात करण्यापूर्वी हातात आलेल्या पहिल्या पानावरची 'स्त्री', स्त्रीच्या आयुष्याचे विविध रंग दर्शवत, स्त्री च्या विविध भूमिका दर्शविणारे आहे व खूपच कमी शब्दात 'स्त्री' चे संपूर्ण रूप नजरेसमोर उभे करणारे आहे. खरंच लेखकांची भाषाशैली, शब्दमांडणी, शब्दांची चपखल रचना व ती करताना उमटणारा आशय, मनात इतकी नाजूक, तरल, मोरपिसी भावना निर्माण करतो की, वाचून मनुष्याने स्तब्धच व्हावे. मनातल्या अंतरंगात उमटणाऱ्या भावनांना या ओळींच्या माध्यमातून शब्दरूप देताना, लेखकांच्या एकंदरीत साहित्य निर्मितीची कल्पना येते. लेखकांचे एकंदर व्यक्तिमत्व ही प्रकट होते शिवाय स्त्रीच्या बाबतीतील सर्वच अंग समोर येतात व आता आतील पुस्तकातील स्त्री कोणती ? हा प्रश्न पडतो.

या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी जसेचं पुढचे पान उलटले, तसेच अनुक्रमणिका पाहून मन विचार करायला लागते, की खरेच लेखकांनी साहित्य विश्वात एवढे मोठे पाऊल टाकून, आपले पाय घट्ट रोवले आहेत. 'काव्यप्रदेशातील स्त्रीच्या शोधात फिरताना' या लेखातून लेखकांनी कथिलेले अनुभव लेखकांच्या जिद्दीची, चिकाटीची आणि संयमाची प्रचिती देणारे आहेत. शिवाय एखाद्याच्या दृष्टिकोनातून प्रतिक्रिया देणे फार गरजेचे नसले तरी लेखकाच्या दृष्टिकोनातून त्याची अहमियत् स्पष्ट करणारे आहेत. तसेच मिळालेल्या साथ - संगतीची जाणीवपूर्वक आठवण लेखकांचे मोठेपण दर्शवून जाते. साहित्य क्षेत्रातील बड्या - बड्या व्यक्तींच्या साहित्य विश्वातील स्त्री शोधून तिच्यावर लिखाण करण्याचा लेखकांचा मनोदय पूर्ण करताना येणाऱ्या अडचणी, त्यावर मात करून केलेले लिखाण, लिखाणाला मिळणारा वाचकांच्या प्रतिसाद, त्यातून 'विठ्ठल वाघ' यांसारख्या साहित्यिकांनी दिलेली ' ' 'सखोल व्यासंगातून झालेली स्त्रीची देखणी अभिव्यक्ती' ही प्रतिक्रिया अगदी टी. व्ही. कलाकारांपासून तर मित्र परिवारांपर्यंत सर्वांची मिळालेली साथ व त्यासाठीची लेखकांनी लिखाणातून ठेवलेली जाण, सगळचं अगदी खूप आपसूक घडल्यासारखं वाटत असलं, तरी त्यामागे लेखकांची फार मेहनत जिद्द, चिकाटी व संयम असल्याचे जाणवते. या पुस्तकातील एकूण लेखांचा विचार केल्यावर जाणवते की एकूण ७६ लेखांपैकी पहिला लेख लेखकांच्या "काव्य प्रदेशातील स्त्री च्या शोधातील आहे व ७५ लेखांपैकी १२ लेख हे 'स्त्री' च्या लेखणीतून काव्यरूपात उमटणारी स्त्री यावर आहेत.

एकंदर लेखातील स्त्री- पुरूष प्रमाणाचा विचार केल्यास लेखकांनी स्त्री घटकाचा केलेला विचार फक्त १६ एवढाच आहे. हे १६ प्रमाण अतिशय अल्प असं आहे. परंतु यात लेखकांचाही दोष आहे असं वाटत नाही, कारण एकंदर साहित्य विश्वातच स्त्री लिखाण फार कमी प्रमाणात आहे व त्यातल्या त्यात स्त्रीयांनी स्त्रीयांवर लिहिलेलं तर अतिशय अल्पच.

त्यापैकी 'संत जनाबाईंच्या अभंग आणि ओवीकाव्यातील 'स्त्री' हा लेखकांच्या साहित्य विश्वातील स्त्रीवर उमटणारा पहिलाच व पुस्तकातीलही पहिलाच लेख आहे. संत जनाबाई संत साहित्यातील 'एक नामयाची दासी '.'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस 'या संत वाङ्मयातील 'संत जनाबाई' एक संत कवयित्री. जनाबाईंच्या अभंगातून, त्यांना जाणवलेल्या जनाबाई म्हणजे विठ्ठलमय जीवन असणाऱ्या नामयाची दासी. 'विठ्ठल' व 'आई' यात फरक नाही असे मानणाऱ्या 'लेकुरवाळा' या संबोधनाने मातृरूप देत ,मातृरूपाला देवपण व देवालाच मातृरुप देऊन स्त्रीत्वाचा गौरव करणाऱ्या, ज्ञानदेवांविषयीच्या मातृ स्थानाचा भक्तीभाव असणाऱ्या, स्त्रीच्या मोठेपणाचे उदाहरण देताना कृष्णामाय म्हणणाऱ्या, द्रौपदीच्या मनातील भाव समजून, अभंगातून त्या मांडणाऱ्या क्रांतिकारी व परिवर्तनवादी धाडसी विचार करणाऱ्या, देवाशी प्रसंगी भांडणाऱ्या, त्यांच्या काळातील स्त्री बंडखोर, बिनधास्त अगदी रोखठोकपणे व्यक्त होतांना, त्याही स्वतः क्रांतिकारी आणि परिवर्तनवादी आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. असे लेखकांचे विचार लेखकांच्या लिखाणाची उंची दर्शविणारे आहे.

यापुढचा स्त्री लेख आहे, 'लक्ष्मीबाई टिळक ह्यांच्या काव्यातील स्त्री' हा. या काळात लेखकांनी




मांडलेल्या विचारातून, त्या काळातील स्त्रीचे समाज व्यवस्थेतील जगणे व्यक्त तर होतेच , त्याचबरोबर त्यांनी स्वतः जे भोगले, जे सोसले ते त्यांच्या कवितेत उतरलेले जाणवते. समाजाची व देशाची प्रगती करावयाची असेल तर व्यसनांपासून समाजाला दूर करावे लागेल व दारूबंदी ही काळाची गरज आहे असे परखड मत त्या काळात व्यक्त करून, त्याची 'आजच्या काळातील नितांत गरज' हे लेखकांनी या लिखाणातून स्पष्टपणे वाचकांसमोर ठेवले आहे. स्त्री जीवनातील, तिच्या दृष्टिकोनातून अती महत्त्वाचे नाते- तिच्या पतीचे. पण पती-वियोगाचे दुःख, पतीने धर्मांतराचा विचार केला ? हे समजताच तिच्या मनाची होणारी अस्वस्थता, आईचं काय ? तर मावशीवर लिहिलेलं काव्य व एकंदरच लक्ष्मीबाईंच्या कविता जणू त्यांच्याच जीवनपटाचे आणि स्मृती चित्रांचे काव्यरूप आहेत असे लेखकाला वाटते व हे अगदीच यथायोग्य आहे. त्यांच्या काव्यातून उमटलेल्या स्त्रीच्या, सर्वसामान्य गृहिणीच्या कथा - व्यथा, सुख - दुःख यांचे अलवार पदराने त्यांच्या कविता प्रभावी तर ठरतातच पण त्यातील स्त्री जीवन अधिक प्रभावी आहे व ते लेखकांसारख्या एका पुरुषाच्या नजरेत यावे, ध्यानात बसावे व त्यावर आजच्या परिस्थितीशी झगडण्यासाठी, परिस्थितीवर मात करण्यासाठी लेखकांनी ते 'काव्यप्रदेशातील स्त्री' यातून वाचकांसमोर वाचनीयतेच्या उत्कृष्ट पातळीवर सादर करावे. यातून लेखकाच्या लिखाणाचा उच्चस्तर ध्यानात येतो. यानंतरचा या लेखमालेतील स्त्री ने स्त्रीवर लिहिलेल्या काव्याचा लेखकांनी घेतलेल्या परामर्शाचा लेख आहे, 'बहिणाबाई चौधरी ह्यांच्या काव्यातील स्त्री' हा. निरक्षरता असूनही साक्षरतेवर मात करणाऱ्या बहिणाबाईंच्या काव्यातून उमटणारी स्त्री लेखकांना कशी जाणवली ? हे त्यांच्या या लेखाच्या वाचनानंतरच कळू शकणारी बाब आहे. निसर्ग कन्या, युगकवी, काव्यसृष्टीमधील अद्भुत चमत्कार असे बहिणाबाईंबद्दल लिहिणारे लेखक 'किरण डोंगरदिवे' खरचं एक आगळे - वेगळे , अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणावे लागेल. बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्वामधून उमटणारा , काव्य माध्यमातून प्रकट होणारा खंबीरपणा, समाजातील विधवा- परितक्त्या- घटस्फोटीता हयांनी आज अंगी बाळगणे गरजेचे आहे असे जाणीवपूर्वक नमूद केलेले लेखकांचे उद्गार आजच्या पिढीतील त्या, त्या महिलांसाठी फार मोलाचे ठरणारे आहेत.

बहिणाबाईंच्या सर्वच कविता समाजासाठी एखाद्या दीपस्तंभासारख्या आहेत यावरून बहिणाबाईंच्या काव्यप्रतिभेची जाणीव वाचकाला होते व लेखकांचा साहित्यिक दृष्टिकोनही लक्षात येतो. बहिणाबाईंच्या काव्याचा अभ्यास करता-करता लेखकांना त्यांनी लिहिलेल्या म्हणी ही नजरेत आल्या व त्यांनी त्याही वाचकांसमोर मांडलेल्या आहेत.

'लक्ष्मण रेषा' या एका कवितेतून रामायणाच्या संदर्भात बोलताना, आजच्या वर्तमान परिस्थितीमध्ये स्त्रियांची नेमकी काय अवस्था ? याचा त्यांच्या काव्यातून उलगडलेला अर्थ लेखकांनी वाचकांसमोर ठेवून, वाचकांना त्या दृष्टीने सजग करण्याचा प्रयत्न वाखाणण्याजोगा आहे. 'दोन बहिणींच्या अलवार प्रेमाच्या जाणीवेची अशी कविता पद्मा यांच्या कवितेविषयी मला इतरत्र वाचायला मिळाली नाही. 'या लेखकांच्या वक्तव्यावरुन लेखकांचा साहित्याचा गाढा अभ्यास व आत्मिश्वास दोन्हीही बाबी फार गडदपणे स्पष्ट होतात. मध्यमवर्गीय स्त्रीच्या मनातील भावना काव्यरूपातून 'इंदिरा संत' या प्रकट करतात व त्यातील मर्म समजून घेऊन लेखक ते अतिशय समर्पकपणे वाचकांसमोर मांडतात ह्यातून लेखकांच्या अतिशय खोलवर अभ्यासाचे, दृष्टिकोनाचे वाचकांना ज्ञान होते व सर्वसामान्य स्त्रीची होणारी घुसमट,तिच्या वाट्याला आलेले दुःख यांचे वर्णन कवितेत असले तरी सामाजिक चौकट न मोडता ; स्वैराचार, स्वातंत्र्याचा सारासार विचार करीत स्वच्छंदी होऊन कवितेतील स्त्री कुठेही बेजबाबदार होताना दिसत नाही. लेखकांच्या या लिखाणातून त्यांच्या व्यापक विचार शैलीचा परिचय झाल्याशिवाय राहत नाहीत.

या लेखातून शांताबाईंच्या लिखाणाचा लेखकांनी मांडलेला ऊहापोहा वाचकांना स्त्री जीवनातील विविध छटा दर्शवत, त्यांच्या मनातील भाव व्यक्त करत, स्त्रीरूप अजरामर करून ठेवले आहे असे सांगणारा आहे. स्त्रीच्या जीवनात असणारी हतबलता आणि असहाय्यता, 'बाई' म्हणून जगताना स्त्रियांच्या वेदनेशी आणि भावनेशी जुळलेली नाळ आणि स्त्रीकडे पुरुष नजरेने पहात, नेमके पुरुषाचे मानसशास्त्र हेरून त्याच्या मनातील स्त्रीच्या केलेल्या चित्रणाचे कसब 'अनुराधा पाटील' यांच्या काव्यातून अधोरेखित झाले आहे. नेमका तोच धागा लेखकांना सापडल्याने हा लेख लिखाणाच्या उच्चतम उंचीवर पोहोचला आहे, असे म्हणणेच योग्य ठरेल.

**प्रा. सौ. विजयश्री शैलेश सावजी.**
**मो. 91 98505 39785**

## दबाव



जो ऐकतो सर्वांचे
त्याला दाबून मारावे
अशी रीत हयाँ जगाची
पर्वा नाही कोणा मनाची

स्वतःचा विचार केला तर
म्हणलास तू स्वार्थी बर
कोणासाठी तो जगलास
ते नाही तू बघितलस

कधी स्वतासाठी बोललास
तर मात्र तू वाईट दिसलास
दगड़ समजून का ठेवलास
तो माणूस तुझ्या सारखाच

तुझ ते स्वप्न तुझ ते आयुष्य
पणाला लावतो त्याच भविष्य
अती काळजी त्याची करून
ठेवलस तू आहे त्यास धरुन

पिंजऱ्यात जसा असे पक्षी
त्याला मालकाची वाटे भिती
उघड दरवाज्याची तू कडी
घेईल तो मोठीच अशी उडी

कु, कविता चव्हाण,
म्हसावद जि जळगाव

## नसावा एकच दिवस...

नसावा एकच दिवस
कौतुक तुझे करण्याचा...
नसावा एकच दिवस
थोरपण तुझे स्मरण्याचा...
घराघरात रोज तुझा
सन्मान केला जावा...
महत्त्वाच्या निर्णयात
विचार तुझाही घ्यावा...
तुझ्या छंद आवडींनाही
तुला जपता यावं...
क्षितिजाच्या पल्याडही
थोडं बघता यावं...
तुलाही मिळावी कधी
थाप कौतुकाची...
तुलाही असतेच की गं
ओढ जिव्हाळ्याची...
आजारपणात तुझ्याही कुणी
उशाशी बसाव...
काय खावंसं वाटतयं ?
म्हणून मायेने पुसावं...
आपुलकीचे चार शब्द
यावेत तुझ्याही कानी...
आसुसलेली असतेस तू
सदैव मनोमनी...
तुझ्याही भावनांना कुणी
हळुवार जपावं...
करू नये पूजा तुझी
पण माणूस म्हणून बघावं...
रेटू नयेत दिवस तू
भरभरून गं जगावं...
तुझ्याच जीवनाचं प्रतिबिंब
तुझ्याच डोळ्यात बघावं...
तुझ्याच डोळ्यात बघावं...
-सौ.शारदा श्रीकृष्ण
वानखेडे-चोपडे, परभणी.
९८२३०६६६०६

## बाळाचा स्वयंपाक....

मम्मी आज्जी आराम करणार
आज स्वयंपाक बाळोबा करणार
मामानं आणला भाजीपाला
बाळाचा स्वयंपाक चालु झाला
टिन टिन वाजवुन चमचा थाळी
छोट्याशा ताटलीत छोटीशी पोळी
काकडी टमाट्याची कोशिंबीर
कद्दू खिसून करनार खीर
बाळाला ऑर्डर देणार कोण
एकाच वेळी मावश्या दोन
कुकर ची शिट्टी ची नाचु लागली
पाहून बाळाला भूक लागली
कोण म्हणलं जेवायला चला
आधी बाळाला खाऊ घाला
खेळ भांड्यात वाढून घ्या
बाळाला खेळवत जेवून घ्या
स्वीट डिश शेवटी फारच गोड
बाळाची पप्पी गोड गोड
बलराज संघई
9420015108



## पाखरं उडून जातील..!



निरोपाचा नाही तर
शुभेच्छांचा क्षण आहे
तुमच्या अनंत आठवणींनी
आज गहिवरले मन आहे

हसत, खेळत, रडत पडत
शाळेत आली चिमुकल्या पावलांनी
पाखर आता मोठी झाली
निरोप घेताय जड अंतःकरणानी

शाळेमूळ पंखांना मिळालं बळ
आव्हानांना पेलण्यासाठी
क्षितिजा पल्याड घेतील झेप
आता स्वप्न साकार करण्यासाठी

कधीकाळी नको वाटणारी शाळा
आता सोडतांना अती दुःख होतय
शाळा म्हणजे दुसर घर त्यासाठी
मन खूप गहिवरून जातय
आधी एक दिवस तरी शाळेला

सुट्टी मिळावी असं वाटत होत
आता शाळेत एक दिवस तरी
वाढून मिळावा या साठी मन तुटत
होत

एकदा सुरू झालेला प्रवास
कधी तरी नक्कीच संपणार असतो
पण त्या दरम्यान अनमोल
आठवणींचा ठेवा मिळणार असतो

आयुष्याच्या एका पायरीवरून आता
दुसऱ्या पायरीला गाठायचं असत
सर करावं तुम्ही यशाचं उंच शिखर
हेच तर पालकांना शिक्षकांना हव
असत

अनंत आठवणी मागे ठेऊन
आता पुढे निघून जातील
यशाच्या आकाशात उंच भरारी
घेण्यासाठी पाखर उडून जातील
₹ प्रविण दाभाडे, कन्नड


## पळस

झाडावरची कोकिळा
आळविते माळराणी
लाल-केशरी पळस
गाई वसंताची गाणी
रखरखत्या उन्हातही
पळसाचे सौंदर्य मनोहारी
केशरी मोहक फुलांची
उधळण करतो न्यारी
पळस छान बहरतो
लागता होळीची चाहूल
पाहून सुंदर रूप

फुलपाखरांना पडे भूल
सायंकाळचा खट्याळ वारा
झुलविते नाजूक फुलांना
केशरी फुले वेचतांना
मौज वाटे मुलांना
वृक्षांची होता पानझड
ऐटीत पळस फुलतो
दुःखातही आनंदी रहा
जणू आपणास सांगतो
-रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव

काल उशीला हात
लावला
ओली जरा ती भासली.
सतत हसणाऱ्या बाबांची
आसवं कोणाला
दिसली?

चालायला शिकवते आई
बाबा घट्ट धरलेलं बोट.
तहानलेल्या घशाला
बाबा अमृताचा घोट.



कुशीत आईच्या
शिरल्यावर
ती अंगाई रोज गाते.
बाबांना मिठी मारायलाच
आयुष्य निघुन जाते.

## अस्तित्व

माझ्या अस्तित्वाची काय सांगू
कहाणी नजर कायम झुकलेली
नयनी दाटून पाणी
बालपणापासून सुरू
भावनांचा खेळ
कधी फुलून येईल
समानतेचा मेळ

स्त्री-पुरुष समानतेची
नुसतीच गर्जना
त्रासात जीवन जगतात
हजारो ललना

कधी होते अहिल्या
कधी सती सावित्री
तिच्या स्वातंत्र्याला
कायम बंधनाची कात्री

खूप काही सोसले
पण आता नाही जमणार
स्वप्नाची पूर्तता झाल्याशिवाय
विचारांचे वादळ नाही थांबणार



आकाशात भरारी घेई
मी होऊन कल्पना
सदैव जागृत ठेवील
माझ्याच संवेदना !

सौ. शुभांगी हेमंत पांगरकर
छत्रपती संभाजीनगर

## अस्तित्वाची लढाई

चल मित्रा विषमतेचा अंधार
मिटवाय एकीन पेटूया. गुलामीच्या
अंधारात आता उजेड नव्यान पेरुया.
आपल अस्तित्व दडवणाऱ्या
अंधारात आता क्रांतीचा दिवा
पेटवूया..!! चल मित्रा माजलेल्या
मनुला पुन्हा एकदा जाळूया.
अन् संविधानाला हाती घेऊन.
हुकूमशाहीला मातीत गाडून
लोकशाहीला जपुया..!! विचारांची
होळी करून सत्तेसाठी लाचार
झालेल्यांना आता आव्हान देऊया.
बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर, अण्णा
भाऊंच्या विचारांचा भारत घडवूया..!!
चल मित्रा आता मैदानात उतरूया
आपल्या अस्तित्वाची अन्दे शाच्या
भविष्याची लढाई आता लढूया.
जात-धर्म वादी राजकारणाला संपवून
टाकूया. अन् समतेची मशाल हाती
धरून धर्मनिरपेक्ष भारताला एकजुटीन
जपूया..!!
कवी-सुरज साठे, 9370626619

## मामा तुन्ही पोरं



मामा तुन्ही पोरं पोरं
काय दिसाले देखणी
शे रुपनी अप्सरा
अनं चंद्रणी चांदणी
कशी लाजरी बुजरी
दुधना सारखी गोरी गोरी
फिदा व्हयनु रं तिन्हावं
तिले पाहस चोरी चोरी
तिन्हा रुपले दखी दखी
मी इसरी जासं भानं
सारखी येस सपनं मां
खेची घेस मन्ह ध्यानं
मन्हा दिलनी ती राणी
तिन्ही भारीच जवानी
डोळा मारस लपी लपी
व्हयनी मन्हा प्रेमनी
दिवाणी गोरा गोरा तो
मुखडा काय नजर
डोळानी व्हयनु पागल
तिन्हामां
तिन्हा रुपले दखीसनी
शे रे, शे रे ती मॉडेल
पण दराशी दीडशहाणी
दखी दखीसन तिले
व्हस मन्हा काळीजनं
पाणी तिन्हा पैंजणनी
धुन माले बार बार
खुनावसं मामा तुन्ही
पोरं रे, पोरं रे माले
भलतीच आवडसं
ऐक ऐक मामा मन्ह
पोरं दीटाक माले तुन्ही
व्हसु मी तिन्हा साजणं
अनं ती मन्ही साजणी
कवीराज : मनिष
आहिरे
सटाणा नाशिक
7588069679

## स्त्री काय आहेस तू

जिवाश्माची वसुंधरा तू
यौवनाची कामिनी तू
हिमतीची वाघिन तू
कुळाची स्वामिनी तू
आकाशी धगधगती सौदामिनी तू
ओलावून बरसणारी श्रावणी तू।1।।
उन्हात गारव्याची सौमिनी तू
थंडीत उबेची दुलई तू
पतिची अर्धांगिनी तू
लेकरांची माऊली तू
भावाची पाठराखीण तू
मैत्री जपणारी.बहीण तू।2।।
ज्ञान प्रसारक विद्या तू
स्वरांची सुरेल मैफील तू
शब्दांची जिवंत कविता तू
चंद्राला लाजवणारी पौर्णीमा तू
चांदण्याला लपवणारी अमावस्या तू
आकाशी रमलेली नक्षत्र अस्मिती तू
।।3।।
स्वप्नात नेणारे निद्राणी तू
आजच्या युगाची प्रगती तू
प्रयत्नाने लाभलेली उन्नती तू
कलासक्त नटराजाची मूर्ती तू
अनेकांच्या यशाची कीर्ती तू
तुज वाचून न कुठला जीव
तुजवाचून ना कुठली किव।।4।।
वंदितो तुला हे स्त्री शक्ती



ना कुठला इंद्र ना कुठला शिव
न संपणारे तुझे अस्तित्व
न संपणारे तुझे कर्तुत्व
हे स्त्री शक्ती तुझी अस्मिता मी जपणार
तुझं वाचून हे विश्व किती काळ गं
टिकणार
सौ. शशिकला गुंजाळ,
वांगी बु.ता भुम
मो.नं.९१३०२७२२१६

## गारपीट ...!

उन्हाळ्यामध्ये झाली आहे
गारपीट ही अवकाळी,
नेहमी अस्मानी संकटे
येती शेतकऱ्यांच्या भाळी.
तोंडाशी आलेला घास हा
गाराने हिरावून नेला,
सदा अस्मानी संकटाने
शेतकरी लाचार झाला.
गारपीटाच्या संकटाने
पीके ही येत नाही हाती,
शेतकऱ्यांच्या नशीबात
नेहमी येती साडेसाती.
चारा- पाण्याच्या काळजीने
कुणबी बसतो मुकाट,
डोळ्यामध्ये गंगा-यमुना
ही भरलेली काठोकाठ.



हे ईश्वरा ! असा कोणता
शेतकऱ्याने केला गुन्हा,
अस्मानी संकटे पाठवु
नको कुणब्यावर पुन्हा.
- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.मो. ९७६४३५०३७४.

# 'शिमगोत्सव' माहितीपटाचा होळीनिमित्त कोकणात प्रीमियर

आधुनिक केसरी

**कोकणच्या होळी सणाची सांस्कृतिक  माहिती सांगणारा 'शिमगोत्सव' या माहितीपटाचा प्रीमियर कोकणच्या पवित्र अशा होळीच्या दिवशी ज्या गावात चित्रीकरण झाले, त्या ठिकाणी गावातील मान्यवर, ग्रामस्थ व गावकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी होळीच्या नमन हा कार्यक्रमाच्या आधी 'शिमगोत्सव'चे स्पेशल स्क्रिनिंग झाले व उपस्थितांनी मोठ्या प्रमाणावर दाद दिली.**

कोकणातला शिमगोत्सव म्हणजे विविध वैशिष्ट्यपूर्ण पद्धती, परंपरा, लोककला यांचा आविष्कार असतो.शिमगा सणाचे महत्व काय ? गावागावातल्या वेगवेगळ्या प्रथा-परंपरा कशा असतात ? अशा प्रश्नांची उत्तरे देणारा माहितीपट म्हणजे 'शिमगोत्सव-प्रथा आणि परंपरा'. "शिमगोत्सव" माहितीपटाला आत्तापर्यंत विविध फेस्टीवलमध्ये गौरवण्यात आले आहे.आता या माहितीपटाने परदेशात देखील अटकेपार झेंडे लावले आहेत.  सध्या जमाना डिजिटलचा आहे. अगदी कमी कालावधीत उत्तम कंटेन्ट, फुल टू मनोरंजन प्रेक्षकांना अनुभवायला मिळतं. लघुपट व माहितीपट अगदी कमी वेळात प्रेक्षकांना खूप काही सांगून जातात. हे लघुपट व माहितीपट मनोरंजन तर करतातच त्याचबरोबर सामाजिक संदेशही देऊन जातात. यापूर्वी 'पोर्ट ब्लेयर','सिंगापूर' व 'इंडोनेशिया' येथील फेस्टिवलमध्ये आशिष निनगुरकर लिखित- दिग्दर्शित "शिमगोत्सव" या माहितीपटाची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली असून अनेक पुरस्कार या माहितीपटाला प्राप्त झाले आहेत. कोकणातील शिमगा सगळ्या चाकरमानी लोकांच्या हृदयातला हळवा कोपरा ! समाजातील वाईट गोष्टी अग्निदेवतेच्या स्वाधीन करून त्या जाळून त्यांचे निर्दालन करणे हा होळी सणामागचा मूळ हेतू आहे. सर्वसाधारणपणे आठ ते दहा दिवस हा शिमगोत्सव सर्वत्र केला जातो. गावातील सर्व गावकरी एकत्र येऊन प्रचंड उत्साहात व भक्तिभावाने पालखी सोहळा साजरा करतात. काव्या ड्रीम मुव्हीज यांची निर्मिती असलेल्या  'शिमगोत्सव- प्रथा आणि परंपरा'



या माहितीपटाचे संपूर्ण चित्रीकरण हे मागील वर्षी कोकणातील वांद्री, उक्षी व आंबेड गावात करण्यात आले आणि बरोबर  एक वर्षानंतर या माहितीपटाचा प्रीमियर सोहळा रंगला. या माहितीपटाचे लेखन व दिग्दर्शन आशिष निनगुरकर यांचे  असून सिद्धेश दळवी व प्रतिश सोनवणे यांनी छायाचित्रणाची जबाबदारी सांभाळली आहे.अभिनेते प्रदीप कडू व सुनील चौपाल इतर तंत्रज्ञांनी साथीने झालेल्या या माहितीपटाचे संकलन स्वप्नील जाधव यांनी केले असून संदीप डांगे यांनी पार्श्वसंगीत दिले आहे.या माहितीपटाचे कल्पक असे पोस्टर सुमेध गायकवाड यांनी केले आहे. एकूण २७ मिनिटांचा हा माहितीपट लक्षवेधी झाला आहे. या स्क्रिनिंगसाठी गावातील बाबू गांधी यांनी विशेष सहकार्य केले. या माहितीपटासाठी अर्चना नेवरेकर,सामाजिक कार्यकर्ते दिपक मेंदर्गे यांचे सहकार्य लाभले आहे.सामाजिक आशय मांडणाऱ्या व आपल्या कोकणातील संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या या माहितीपटाला गावात गावकऱ्यांच्या उपस्थितीत प्रीमियर झाल्याने  संपूर्ण टीमचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

# महिलांमध्ये आर्थिक साक्षरतेची आवश्यकता



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**आजच्या युगात महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने पाऊल टाकून चालत आहेत, पण तरीही ती अनेक बाबतीत मागेच आहेत. त्यापैकी एक प्रमुख क्षेत्र म्हणजे महिलांची आर्थिक साक्षरता. या बाबतीत फक्त गरीब, ग्रामीण आणि अशिक्षित महिलाच मागे  नाहीत, तर शहरी मध्यमवर्गीय आणि उच्चवर्गीय सुशिक्षित महिलांमध्येही आर्थिक साक्षरता आणि माहितीचा अभाव दिसून येतो. 2020-21 मध्ये ग्लोबल फायनान्शिअल लिटरसी एक्सलन्स सेंटर (GFLE) ने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, भारतीय प्रौढ लोकसंख्येपैकी केवळ 24 टक्के लोक आर्थिक बाबतीत साक्षर आहेत. इतर प्रमुख उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या तुलनेत भारताचा आर्थिक साक्षरता दर सर्वात कमी आहे. महिलांच्या बाबतीत तर परिस्थिती अधिक चिंताजनक आहे.  ते राज्यानुसार 4 टक्के ते 50 टक्क्यांपर्यंत आहे.**

महाराष्ट्र, दिल्ली आणि पश्चिम बंगाल या महानगर क्षेत्रांमध्ये अनुक्रमे 17 टक्के, 32 आणि 21 टक्के आर्थिक साक्षरता दर आहे. बिहार, राजस्थान, झारखंड आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये, जिथे दारिद्र्य जास्त आहे, तिथे साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. हे आकडे आंतरराज्य असमानता देखील दर्शवतात. गोव्यात सर्वाधिक पन्नास टक्के महिला आर्थिक साक्षरता आहे, तर छत्तीसगडमध्ये आर्थिक साक्षरतेचा तीव्र अभाव आहे. तिथे आर्थिक साक्षरतेचा सर्वात कमी दर आहे, फक्त चार टक्के. आजकाल बँकांमधून होणारे व्यवहार वाढत असताना, क्रेडिट कार्ड आणि डेबिट कार्डे सामान्य झाली आहेत आणि आता 'कॅशलेस' व्यवहारांवर भर दिला जात आहे, तेव्हा महिलांचा एक मोठा वर्ग बँकेची सामान्य कामेही करू शकत नाही. बँकेत पैसे जमा करणे किंवा काढणे असो किंवा एटीएम कार्ड वापरणे असो, बहुतांश महिला या सर्व कामांसाठी पती, मुलगा, भाऊ किंवा इतर कोणत्या तरी नातेवाईकावर अवलंबून असतात. याचा फटका महिलांनाही अनेकदा सहन करावा लागतो.  त्यांच्या खात्यातूनही मोठी रक्कम काढली जाते. कमी पैसे काढतो असे सांगून त्यांच्या खात्यातून जास्त रक्कम काढली जाते. एटीएमचा गैरवापर केला जातो. त्या महिलेच्या नकळत, तिला न सांगता तिच्या खात्यावर नामांकन  केले जाते. कोऱ्या धनादेशांवर स्वाक्षरी घेतली जाते, मग नंतर मनमानी रक्कम भरली जाते आणि काढली जाते. थोडेफार ऑनलाईन समजणाऱ्या व त्यावरून व्यवहार करणाऱ्या महिलांना रिवॉर्ड पॉइंट्स'च्या आधारे किंवा रोख मिळवण्याच्या नावावर 'ओटीपी' मागवून किंवा लिंक पाठवून त्यावर क्लिक करायला लावून त्यांच्या बँक खात्यातील जमा केलेली रक्कम काढली जाते.अशा अनेक घटनांच्या बातम्या वर्तमानपत्रातून किंवा चॅनेलमधून प्रसिद्ध होत असतात. बहुतांश घटनांमध्ये कारवाई होत नाही आणि पीडितेचे पैसे बुडतात. अनेक वेळा महिलेचे पुरुष नातेवाईक तिला बँकेच्या कामकाजाबाबत जाणूनबुजून ओळख करून देत नाहीत.

महिलांमध्ये आर्थिक साक्षरतेच्या कमतरतेचे दोन प्रकारचे परिणाम होतात.  एक म्हणजे पैशाच्या व्यवहारात महिला पुरूष नातेवाइकांवर पूर्णपणे अवलंबून असतात. त्यांना असे कोणतेही काम करण्याचा आत्मविश्वास नसतो आणि काही कारणाने त्यांचे नातेवाईक जवळ नसतील तर त्यांचे संपूर्ण आर्थिक व्यवहार ठप्प होऊन जातात. दुसरे म्हणजे, आर्थिक साक्षरतेच्या अभावाला कारणीभूत बहुतेकदा स्त्रिया स्वतःच असतात. हे काम शिकण्या आणि करण्याबाबत त्या आळस करतात. काही तांत्रिक गोष्टी शिकून, समजून घेण्याचा प्रयत्नही करत नाहीत. या उदासीनतेचा फटका त्यांनाच सहन करावा लागत आहे. बँकांच्या सर्वसाधारण कामाच्याबाबतीत महिलांची ही अवस्था असेल तर पैशांची गुंतवणूक कुठे करायची, कधी गुंतवणूक करायची, किती गुंतवणूक करायची आणि ती कशी मिळवायची, किती मिळवायची अशा गोष्टींची माहिती त्यांना असेल अशी अपेक्षा करणे निरर्थक आहे. विमा काढण्याबाबत तर बोलायची सोयच नाही. या कारणास्तव, महिला  त्यांचे पैसे एकतर चुकीच्या ठिकाणी किंवा चुकीच्या व्यक्तीद्वारे गुंतवतात आणि फसतात.

आजकाल विधवा आणि परित्यक्ता  अशा महिलांची एकाकी जीवन जगण्याची प्रवृत्तीही वाढत चालली आहे. अशा परिस्थितीत त्यांना मुलांचे शिक्षण, लग्न, घरबांधणी आदींसाठी मोठ्या प्रमाणावर पैशांची गरज असते. बचत केली नसल्याने त्यांना बाहेरून किंवा सावकारांकडून कर्ज घ्यावे लागते. आर्थिक साक्षरतेअभावी त्या सेठ-सावकारांच्या किंवा खासगी संस्थांच्या तावडीत अडकतात. तेथे त्यांना उच्च व्याजदराने कर्ज घ्यावे लागू शकते, ज्याची परतफेड करणे त्यांच्यासाठी कठीण होऊन बसते. त्यांची मालमत्ता जप्त केली जाते किंवा हडप केली जाते. एक मजबूत आर्थिक शिक्षण प्रणाली महिलांना त्यांच्या बचत आणि गुंतवणुकीचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यास मदत करू शकते. याद्वारे, त्या त्यांची बचत अशा प्रकारे गुंतवू शकतात की त्यांना त्यातून जास्तीत जास्त लाभ मिळू शकेल आणि ठेवीची रक्कम देखील सुरक्षित असेल. त्याचप्रमाणे सामाजिक सुरक्षेच्या दृष्टिकोनातून महिलांना योग्य विमा संरक्षण मिळणेही आवश्यक आहे. आजारपणाच्या बाबतीत आरोग्य विमा संरक्षण देखील आवश्यक आहे. यामुळे उपचारासाठी खर्च केलेल्या मोठ्या रकमेची व्यवस्था करण्यास मदत होते. जेणेकरुन त्यांना आणि त्यांच्या कुटुंबास आजारपणाच्या वेळी उपचार घेण्यास आर्थिक त्रास होऊ नये .हेदेखील केवळ महिलांच्या आर्थिक साक्षरतेमुळेच शक्य आहे.

यंदाच्या सर्वसाधारण अर्थसंकल्पात केंद्र सरकारने लोकांमध्ये आर्थिक साक्षरता वाढवण्यासाठी अशासकीय स्वायत्त संस्थांच्या माध्यमातून या दिशेने प्रयत्न करण्याची तरतूद केली आहे. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला, ग्रामीण आणि शहरी गरीब, संरक्षण कर्मचारी आणि ज्येष्ठ नागरिकांसह विविध लक्ष्य गटांपर्यंत केंद्रीय बँक आणि सामान्य बँकिंग संकल्पनांचे ज्ञान पोहोचवण्याच्या उद्देशाने भारतीय रिझर्व्ह बँकेने 'वित्तीय साक्षरता योजना' नावाचा प्रकल्प सुरू केला आहे.आर्थिक शिक्षण 2020-2025 साठी राष्ट्रीय धोरण तयार करण्यात आले आहे. त्याअंतर्गत डिजिटल व्यवहारांच्या सोयी, डिजिटल व्यवहारांची सुरक्षा, व्यवहारात खबरदारी, ग्राहकांच्या हिताचे रक्षण याबाबत आवश्यक ती व्यवस्था करण्याची तरतूद करण्यात आली आहे. 'सेबी', रिझर्व्ह बँक आणि इतर संस्था देखील वेळोवेळी जाहिरातींद्वारे बँक व्यवहार आणि ऑनलाइन फसवणूक रोखण्यासाठी माहिती देतात, जेणेकरून आर्थिक साक्षरता वाढू शकेल. या सर्वांमध्ये महिलांच्या जास्तीत जास्त सहभागाची गरज असल्याचे सांगण्यात आले आहे.

आज देशातील जवळपास 1.4 अब्ज लोकसंख्येमध्ये , ज्यात निम्म्याहून अधिक महिला आहेत, त्यांच्यामध्ये आर्थिक जागरूकतेचा दीर्घकाळापर्यंत चालणारा प्रभाव पडेल.देशातील शाळा, महाविद्यालये, महिला बचत गट, अंगणवाडी केंद्रे इत्यादींमध्ये आर्थिक शिक्षणाला महत्त्व देऊन, त्यामध्ये काम करणाऱ्या महिलांना आर्थिक साक्षरतेबाबत विशेष प्रशिक्षण देण्याची गरज आहे, जेणेकरून त्या त्यांच्या संपर्कात येणाऱ्या महिलांना आवश्यक माहिती देऊ शकतील. गटाशी संबंधित महिला त्यांच्या स्तरावर माहिती, प्रशिक्षण देऊ शकतात. शहरी आणि ग्रामीण भागात काम करणाऱ्या बँकांनीही महिलांना आर्थिक व्यवहारांची माहिती देण्यासाठी वेळोवेळी कार्यक्रम राबवावेत, जेणेकरून त्यांना बँकिंगशी संबंधित माहिती मिळू शकेल. बँक आणि आर्थिक कामाचे ज्ञान नसलेल्या महिलांनी स्वतः पुढे येऊन शिकण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. किमान, बँक खाते उघडणे, चेक भरणे, पैसे जमा करणे, पैसे काढणे, जमा करणे, एटीएम वापरणे, ऑनलाइन पेमेंट करणे इत्यादीसारख्या सामान्य कामाच्या गोष्टींचे ज्ञान असणे आजच्या युगात खूप महत्वाचे झाले आहे.



१८१ दिवस
मुदत ठेवीवर मिळवा
11% व्याजदर
*नियम व अटी लागू
राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
चंदुलाल बियाणी
चेअरमन
कार्यरत शाखा :
मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
पंचशिल नगर शाखा : विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
मुख्य शाखा विस्तारित कक्ष : ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ : दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२ उड्डान पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
सिरसाळा शाखा : बड़े निवास, जुने बस स्टँड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
अंबाजोगाई शाखा: प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ : मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२ घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
बीड शाखा : जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
सोनपेठ शाखा : स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
गंगाखेड शाखा : डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा : अपना बजार २०४ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
राजा बजार शाखा : बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
माळीवाडा विस्तारीत कक्ष : नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803
अंबड शाखा: जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
जालना शाखा : मेन बस स्टँड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
जालना विस्तारीत कक्ष-१ : जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
नांदेड विस्तारीत कक्ष : पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
उदगीर विस्तारीत कक्ष : पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
टोकवाडी विस्तारीत कक्ष: परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
दिंद्रुड विस्तारीत कक्ष : शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
लातूर विस्तारीत कक्ष : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
औराद विस्तारीत कक्ष : मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
बीड विस्तारीत कक्ष : मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
उमरगा शाखा : शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
परभणी शाखा: कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
अहमदनगर शाखा: शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
केज शाखा : वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
माजलगाव शाखा : गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.
नियोजित शाखा : धर्माबाद, उमरखेड, नाशिक, पंढरपूर, रेणापूर, पुणे, अकोला
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177

# देवीचे सोंग पाहण्यासाठी भाविकांची गर्दी

आधुनिक केसरी न्यूज



**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथे हे दरवर्षीप्रमाणे तुकाराम बीजनिमित्त रात्री देव-देवतांचे सोंग पहाण्यासाठी गावकऱ्यांची मोठी गर्दी जमली होती मागील वर्षी कोरोनाच्या निरबंधामुळे यात्रा रद्द झाली होती . तुकाराम बीज दिवशी गुरुवारी रात्री 10 वाजेच्या दरम्यान गणपतीच्या सोग पासून यात्रेस सुरुवात करण्यात आली. या यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी गावातील प्रतिष्ठित मान्यवर व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात्रेच्या सुरुवातीस गणपती देवाच्या सोंगा पासून सुरुवात झाली रात्रभर देवदेवतांची सोंग वाघ्या मुरळीचा कार्यक्रम गणपती मंदिरासमोरील मैदानावर सकाळी दहा वाजता या देव-देवतांच्या सर्वांचे या यात्रेचा समारोप करण्यात आला. वडोद बाजार येथील गणपती मंदिरा समोरील मैदानावर तुकाराम बीज निमित्त गुरुवारी रात्री यात्रा सुरू झाली होती या यात्रेत येणाऱ्या भाविकांच्या मनोरंजनासाठी वाघ्या-मुरळीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सोंगाच्या सभा दाण्याचा म्हणण्यासाठी गावातील कलावंतांचे पथक यावेळी उपस्थित होते. यात्रेच्या कार्यक्रमासाठी गावातील यात्रेतील सदस्यांनी या यात्रेची व्यवस्था केली होती रात्रभर विविध देवदेवतांच्या सोंग पाहण्यासाठी महिला पुरुष मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शुक्र वारी पहाटे सात वाजता गावातील आंबा देवीच्या मंदिरातून देवीच्या सोंग सुरुवात झाली या देवीचे सोंग पाहण्यासाठी, देवीच्या दर्शनासाठी दरवर्षी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती असते भाविक भक्त या देवीच्या पूजा विधी व दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते या देवीची पूजा करण्यासाठी महिला महिलांनी पाठ ठेवून हळद-कुंकू वाहून देवीची पूजा केले जाते व देवीकडून सुवासिनींची ओटी भरून घेतले जाते.

## हरबरा खरेदी नोंदणी पीक पेरा बाबतची अट शिथिल करा : अनिल पाटील श्रीखंडे

आधुनिक केसरी न्यूज



**सुलतानपूर :** हरबरा खरेदी नोंदणी पीक पेरा बाबतची अट शिथिल करा अशी मागणी खुलताबाद तालुका अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने अनिल पाटील श्रीखंडे यांनी केली आहे.शासनाने हमी भाव योजने अंतर्गत हरबरा खरेदी करण्याकरिता ऑन लाईन नोंदणी सुरू केली आहे मात्र ऑन लाईन पीक पेरा या जाचक अटीमुळे शेतकरी खरेदी पासून वंचित राहणार आहे.सर्व्हर मध्ये त्रुटी येत असल्या मुळे मोबाईल वर ई पीक पेरा लोड करून सुधा सात बारा वर रब्बी पिकांची नोंद झालेली नाही त्यामुळे हरबरा विक्री साठी नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांना अडचणी येत आहे.

शेतकऱ्याला हमी भाव योजनेपासून वंचित ठेवायची नसेल तर सात बारा वर तलाठी यांचे शेतकऱ्यांच्या सहिने पीक पेरा घ्यावा म्हणजे शेतकरी खरेदी पासून वंचित राहणार नाही ऑन लाईन पीक पेरा मिळत नसल्याने याचा फायदा व्यापारी घेत असून कवडी मोल भावाने खरेदी करीत आहे यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान होत आहे.

# शेतकऱ्यांना बळ देणारा अर्थसंकल्प : कृषिमंत्री सत्तार

आधुनिक केसरी न्यूज

**संदीप मानकर**

**सिल्लोड :** शासनाने जाहीर केलेला अर्थसंकल्प राज्यातील शेतकऱ्यांना बळ देणारा आणि आर्थिकदृष्ट्या त्यांना सक्षम करणारा असा हा अर्थसंकल्प आहे. राज्य शासन हे सर्वसामान्य लोकांचे आणि शेतकऱ्यांचे आहे हे यातून दिसून आले आहे. कृषी क्षेत्रासाठी भरीव तरतूद करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बळीराजाप्रती असणारी राज्य शासनाची बांधिलकीच दाखवून दिली आहे, अशा शब्दात कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे.

अमृत काळातील पहिला अर्थसंकल्प हा पंचामृत तत्वावर आधारित आहे. त्यातील पहिले अमृत हे 'शाश्वत शेती समृद्ध शेतकरी' हे आहे. कृषी विभागासाठी विविध योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी प्रमाणेच त्या निधीत राज्य शासन प्रतिवर्ष प्रती शेतकरी 06 हजार रुपयांची भर घालून नमो शेतकरी महासन्मान निधी योजना जाहीर करण्यात आली आहे. त्या अंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना आता 12 हजार रुपयांचा सन्मान निधी मिळणार आहे. राज्यातील 01 कोटी 15 लाख शेतकरी कुटुंबांना त्याचा लाभ होणार असून त्यासाठी 6900 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे. ही अतिशय महत्वाची गोष्ट आहे. याशिवाय प्रधानमंत्री शेतकरी पीक विमा योजनेतील शेतकरी हिस्सा यापुढे राज्य शासन भरणार आहे. आधीच्या योजनेत विमाहप्त्याच्या 02 टक्के रक्कम शेतकऱ्यांना भरावी लागत होती. आता केवळ एक रुपया भरून शेतकऱ्यांना नोंदणी करता येणार आहे. त्यासाठी 3312 कोटी रुपयांचा आर्थिक भार राज्य शासन उचलणार आहे. यासोबतच राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी महा कृषिविकास अभियान राबविण्याचा निर्णय जाहीर केला आहे. पीक, फळपीक घटकाच्या उत्पादनापासून ते मूल्यवर्धनापर्यंत तालुका, जिल्हानिहाय शेतकरी गट, समूहांसाठी योजनांच्या अंमल बजावणीसाठी एकात्मिक पीक आधारित प्रकल्प आराखडा तयार करण्यात येणार आहे. यासाठी 05 वर्षांत 3000 कोटी रुपयांची तरतूद करण्याचा शासनाचा निर्णय हा स्वागतार्ह असून कृषि विकासासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी सांगितले.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# महिलेच्या खुनाचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेकडून सहा तासांत उघड

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश धनके**

**फुलंब्री :** तालुक्यातील निधोना येथे एका 45 वर्षीय महिलेचा खून झाल्याची घटना उघडकीस आली या घटनेचा वडोद बाजार पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती मात्र गुन्हे शाखेच्या पथकाने या घटनेचा बारकाईने तपास केला असता हा खून झाल्याचे उघड झाले आहे सात सहा तासाच्या आत गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपीला गजाआड केले.

वडोद बाजार पोलीस ठाणे हद्दीतील निधोना येथील पोलीस पाटील नामे सांडू भाऊराव राऊत राय यांनी खबर दिली की त्यांचे गावातील महिला मंदाबाई बाबासाहेब राऊत राय वय 45 वर्ष राहणार नाही दोन तालुका फुलंब्री ही तिच्या राहते घराचे बाथरूम मध्ये मृता अवस्थेत पडलेली आहे त्यावरून पोलीस ठाणे वडोद बाजार येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती माननीय पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया यांचे आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक प्रस्तुत प्रकरणाचा तपास करीत असताना घटनास्थळाच्या परिस्थितीचे बारकाईने अवलोकन करता मयत महिला मंदाबाई बाबासाहेब राऊत राय यांचा मृत्यू हा आकस्मित नसून त्यांची हत्या झाली असावी असा संशय आला व त्या दृष्टीने तपास करीत असताना त्यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत व तांत्रिक विश्लेषणावरून खात्रीलायक माहिती मिळाली की आरोपी बाळू कारभारी दाबके राहणार बहिरगाव तालुका कन्नड याने काही तरी अज्ञात कारणावरून मताचा खून केला आहे त्यावरून संस्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बाळू कारभारी दाबके



वय 38 वर्ष राहणार बहिरगाव तालुका कन्नड याचा शोध घेऊन त्याचा त्या ताब्यात घेऊन त्या विश्वासात घेऊन विचारपूस केले असता तो मयत मंदाबाई राऊतराव हिला ओळखत असून नेहमी मयत महिलेच्या राहते घरी मौजे निधोना येथे भेटण्यासाठी जात होता त्याने त्यांचे ओळखीचे इसमांकडून 50 हजार रुपये व्याजाने घेतले होते. तसेच इतर लोकांचे त्यावर कर्ज होते हे सर्व कर्ज घेण्यासाठी मंदाबाई राऊत राय यांचा खून करून त्यांच्या जवळील दागिने विक्री करून पैसे परत देता येईल या उद्देशाने तो काल दिनांक नऊ रोजी नेहमीप्रमाणे हा मयत मंदाबाई यांना भेटण्यासाठी गेला आणि रात्रभर त्यांच्याकडे मुक्कामी राहिला आणि पहाटे साडेचार वाजेच्या सुमारास त्याने मंदाबाई राऊत राय यांचा गळा दाबून यांचा खून केल्याची खबुली दिली यावरून नमूद आरोपीस सादर होण्यामध्ये पुढील तपासकामी वडोद बाजार पोलीस ठाणे यांच्या ताब्यात दिले असून गुन्ह्याचा तपास बाजार पोलीस हे करीत आहे सदर खुणातील आरोपीला गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने सहा तासात अटक केली आहे सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामेश्वर रेंगे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधव प्रदीप दुबे सहाय्यक फौजदार गजानन लहासे बाळू पात्रीकर पोलीस हेडकॉन्स्टेबल नामदेव शिरसाट पोलीस नाईक नरेंद्र खंदारे पोलीस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर मेटे संजय तांदळे संतोष मालल योगेश तरमळे जीवन घोलप यांनी ही कारवाई केली.



# पाडळी येथील पंचमी महोत्सवास सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** पाडळी, ता.खुलताबाद येथील श्री नरसोबा मंदिर संस्थांच्या वतीने यावर्षीचा पंचमी महोत्सव बुधवार (ता:८) पासून सुरू झाला असून रविवार (ता:१२) सायंकाळी शेरण्यांचा कार्यक्रम होईल. सोमवार तारीख :१३ सकाळीः बोहडानिमित्त गावातून श्रीराम मंदिरापर्यंत सूर्योदयानंतर भाविकांची भव्य मिरवणूक निघून श्री नरसोबा दर्शनाचा लाभ भावी घेतात. पाच दिवस दररोज रात्रीचा लोकनाट्य तमाशा चा कार्यक्रम होतो त्याद्वारे भाविकांचे मनोरंजन व प्रबोधन होत असते कार्यक्रमांची रेलचेल असते. यावेळी दशावतारी मुखवटा नृत्य नाट्य गायन वादन तमाशा वगनाट्य गणगवळण व सामुहिक गीते यासह देवाधिकांची सोंग घेतली जातात. यात श्री गणपती राधाकृष्ण दर्शन श्री विष्णु दर्शन मार्तंड दर्शन कामाक्षी देवी दर्शन गिरीजा भवानी दर्शनासह नृसिंह अवतारांचे उपक्रम साजरे केले जातात.

सांस्कृतिक कार्यक्रम व यात्रा महोत्सव साजरा करण्यासाठी श्री नरसोबा पंचमी महोत्सव समिती यांचे सह पाडळीचे ग्रामस्थ यासाठी पुढाकार घेतात. मागील दोन वर्षे वगळता दरवर्षी होळीच्या रंगपंचमीपासून हा उत्सव साजरा होत असतो नरसोबा मंदिर या भागातील अनेक गावांच्या व तालुक्यातील भाविकांचे आराध्य दैवत म्हणून प्रसिद्धी आहे.

# भाविकांनी घेतले राजुरेश्वराचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** संकष्टीचतुर्थीनिमित्त मराठवाड्यातील प्रसिद्ध गणपती संस्थान ,जालना जिल्ह्याचे ग्रामदैवत श्री राजुरेश्वराचे भाविकांनी प्रार्थना करून मनोभावे दर्शन घेतले. श्रीचरणी अर्पण करण्यासाठी भाविकांकडून नारळ, फुले, अर्पण केली जात होती. भक्तांकडून मोठ्या प्रमाणात फुलांच्या हारांची मागणी होत होती.उन्हाचे दिवस लेखात घेता दर्शनासाठी आलेल्या भक्तांना गणपती संस्थांच्या वतीने पायदानी, मंडप आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून भक्तांनी सकाळी आणि सायंकाळी दर्शन घेणे अधिक पसंद केले. मंदिर परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी महिला सेवेकरींनी सेवेच्या माध्यमातून आपले योगदान दिले. श्रीचे सेवेकरींही मंदिर परिसरात सेवाकार्यातून स्वच्छता व शांतता प्रस्थापित करून दर्शनासाठीआलेल्या भाविकांना सहकार्य करत असल्याचे दिसून आले. आपली मनोकामना पूर्ण व्हावी म्हणून भाविक श्रीचरणी नतमस्तक होऊन दर्शन घेत होते.






# छत्रपती शिवाजी महाराजांनी खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष, रयतेचे राज्य निर्माण केले

आधुनिक केसरी न्यूज

**नसरापूर :** येथील शंकरराव भेलके महाविद्यालयात रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जंयती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला प्रसिद्ध शिवव्याख्याते तसेच बाल किर्तनकार कु. माउली महाराज खोपडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. तुषार शितोळे होते. सर्व प्रथम मान्यवरांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. आपल्या शिवव्याख्यानात माउली महाराज खोपडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांनी खऱ्या अर्थाने धर्म निरपेक्ष आणि सर्व सामान्य रयतेचे राज्य निर्माण केल्याचे सांगून त्यांनी निर्माण केलेली राज्य व्यवस्था आजही जगातील सर्व राष्ट्रांना प्रेरणा देणारी असल्याचे सांगितले. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मानसी पडवळ या विद्यार्थिनीने तर आभार प्रदर्शन कु. आकाश खुटवड या विद्यार्थ्यांने केले. कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी पत्रकार विशाल शिंदे तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# महिला सशक्तीकरण आपल्या रोजच्या आचरणाचा भाग बनावा

## उपजिल्हाधिकारी शमा पवार : स्वेरीमध्ये 'जागतिक महिला दिन' साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** 'लोकांच्या कल्याणासाठी पेटवलेली ज्योत म्हणजे 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' या आहेत आणि त्यांचा वारसा आज आपल्या समाजातील महिला पुढे नेत आहेत. आजच्या महिला हया 'चूल आणि मुल' या चाकोरीबाहेर जाऊन पुरुषांच्या कार्याला हातभार लावत आहेत. एकूणच महिलांना नोकऱ्यांच्या बाबतीत समान संधी मिळते. तरीही महिलांना आपण कुठेतरी कमी पडतो असे वाटत असते. कालांतराने आपल्याकडे पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांचे विश्व चाकोरीबद्ध झाले आहे. पूर्वीच्या वेळी मर्यादा होत्या परंतु त्या आता कमी झालेल्या आहेत. पूर्वी सर्व महत्वाचे निर्णय पुरुष घेत होते. आता वेळ बदलली, काळ बदलला, पिढी बदलली, त्यामुळे महिलांना समान संधी मिळत आहे. 'महिला दिन' साजरा करण्यासाठी समाजातील सर्वांनी एकत्र येवून साजरा करण्याची गरज आहे. महिला सशक्तीकरण हा आपल्या रोजच्या आचरणाचा भाग बनावा' असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती शमा पवार यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये 'जागतिक महिला दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून सोलापूरच्या निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती शमा पवार या बहुमोल मार्गदर्शन करत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे हे होते.



प्रारंभी महिलांच्या शिक्षणासाठी ऐतिहासिक कामगिरी केलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविकात स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे म्हणाले की, 'महिलांना समाजात मानाचे स्थान असून तसेच त्यांनी उचललेली जबाबदारी मोठी असून प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे महिलांचा भक्कम आधार असतो.' असे सांगून प्राचार्य डॉ. रोंगे यांनी कर्तबगार महिलांच्या कार्यावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे म्हणाले की, 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांची शिकवण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला उत्तमरित्या दिलेली आहे. संत नामदेव, संत जनाबाई यांनी देखील समाजमनावर उत्तम संस्कार केले. आज मुला-मुलींना समान अधिकार देण्याबाबतचे कायदे आहेत. प्रत्येक वारकऱ्यांना आपण 'माऊली' म्हणतो आणि ही शिकवण १३ व्या शतकातच मिळाली. एकूणच आज चांगल्या ठिकाणी महिला कार्यरत आहेत आणि चांगल्या गोष्टींचा विसर पडू नये यासाठी 'कृतज्ञतेचे सोहळे' व्हायला हवेत.

# राजर्षी शाहू महाराज सोशल फाऊंडेशनच्या वतीने रक्तदान शिबिर

## ४६ युवकांनी केले रक्तदान : १८८५ पिशव्या रक्त संकलित

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** राजर्षी शाहू महाराज सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप शेळके यांच्या वाढदिवसानिमित्त राजूर येथे आयोजित रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून या शिबिरात एकूण ४६ युवकांनी रक्तदान केले. त्याच बरोबर जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून स्वातीताई जैस्वाल यांनी रक्तदान करून महिलांसमोर एक नवा आदर्श निर्माण केला. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलनकरून वीजबिल भरणा केंद्राचे अनावरण करण्यात आले.यावेळी माजी सरपंच भाऊसाहेब भुजंग, जिल्हा व्यापारी संघाचे जगन्नाथ थोटे, झगरे गुरुजी, राजूर व्यापारी संघाचे अध्यक्ष राम पारवे, मेस्टा जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे, प्रा. बाळासाहेब बोराडे, विभागीय व्यवस्थापक किरण बोर्डे,लेखा विभाग प्रमुख मंगेश भोंडे, ग्रामपंचायत सदस्य अप्पासाहेब पुंगळे, राहुल दरख ,परमेश्वर पुंगळे , प्रसिद्ध व्यावसायिक रामेश्वर कढवणे, डॉ.काबरा, विठ्ठलराव पुंगळे, चेतन अग्रवाल, शाखा व्यवस्थापक गजानन लहाने, अंकुश काळे, विश्वंभर ढाकणे, संतोष साबळे सिद्धेश्वर थोटे, प्राचार्य सुनील दानवे, अमोल दानवे,राजेंद्र जैस्वाल, चंद्रकांत चौतमल, सतीश ढाकणे,गणेश तायडे नंदकिशोर साखरे, अमोल पवार, भागवत खंडागळे, सचिन ठाकूर यासह अनेक जण उपस्थित होते. राजर्षी शाहू महाराज सोशल फाऊंडेशन आणि स्वामी समर्थ रक्तपेढी जालना यांच्या संयुक्त विद्यमाने हे रक्तदान शिबीर घेण्यात आले. दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी राजर्षी शाहू मल्टिस्टेटच्या वतीने रक्तदान शिबिर पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे.राजर्षी शाहू महाराज सोशल फाऊंडेशनच्या वतीने जवळपास ७५ ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. यामाध्यमातून दोन हजार बॅग रक्त संकलनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. आतापर्यंत ४९ शिबिरे संपन्न झाली असून याद्वारे जवळपास १८८५ पिशव्या रक्त संकलित करण्यात आले आहे. तसेच आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल झगरे गुरुजी यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.



या शिबिरात अंकुश काळे, सिद्धेश्वर थोटे, समाधान ठोंबरे, कृष्णा मराठे, राजीव जैस्वाल, उमेश नागरे, स्वाती जैस्वाल यासह ३६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रघुनाथ कड, किशोर शेजुळ,यांच्यासह राजर्षी शाहू मल्टिस्टेटच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



# पुर्णेकरांचे 'स्वच्छ शहराचे' स्वप्न दुभंगले ?

## न.प.चा गलथान कारभार देत आहे रोगराईला निमंत्रण

आधुनिक केसरी न्यूज

**पुर्णा :** घनकचरा व्यवस्थापणावर न. प. प्रशासनाकडून कागदोपत्री कोट्यावधींचा खर्च दाखवला जात असला तरी प्रत्यक्षात मात्र कचरा व्यवस्थापणाच्या नावावर निव्वळ भुलभुलैया कारभार होत असल्यामुळे पुर्णेकरांचे स्वच्छ शहर सुंदर शहराचे स्वप्न दुभंगल्याचे निदर्शनास येत असून शहरात सर्वत्र स्वच्छते अभावी नाल्या तुंबलेल्या दिसत असून जागोजाग कचऱ्याचे अक्षरशः ढिगार साचल्यामुळे नगर परिषद प्रशासन शहरात जाणीवपूर्वक रोगराईला निमंत्रण देऊन शहरवासीयांच्या आरोग्य व्यवस्थेशी जिवघेणा खेळ करीत आहे की काय ? असा गंभीर प्रश्न एखाद्या शेषनागा प्रमाणे फना काढून उभा टाकल्याचे पाहावयास मिळत आहे. पुर्णा शहरातील कचरा व्यवस्थापणाचे कोट्यावधीचे टेंडर जि.एम.कन्स्ट्रक्शन या संस्थेला देण्यात आले असून या संस्थेची लाखो रुपयांचे बिल देखील अदा करण्यात आलेली आहेत तरी देखील शहरातील स्वच्छता व्यवस्था जैसे थेच असल्याचे दिसत आहे पुर्णा शहरातील घनकचरा व्यवस्थापन व साफसफाईचे टेंन्डर घेतलेल्या जि.एम.कंन्स्ट्रक्शन या संस्थेकडे मनूष्यबळासह कचरा वाहतुकीसाठी मुबलक प्रमाणात वाहनांसह इतर साहीत्य देखील नसल्यामुळे शहरातील स्वच्छतेचे अक्षरशः तिनतेरा झाल्याने संबंधित संस्था घनकचरा व्यवस्थापणाची कामे न करताच बोगस बिले उचलत असल्यामुळे जि.एम. कन्स्ट्रक्शन या संस्थेचा काळ्या यादीत समावेश करून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी अधिराज्य प्रतिष्ठान या सामाजिक संघटनेकडून प्रभारी मुख्याधिकारी कदम यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# 52 टक्के ओबीसी संघटित झाला तर नेत्यांना ओबीसीच्या दारात यावे लागेल

## खासदार इम्तियाज जलील

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सर्वसामान्यांचा व ओबीसींचा आवाज उठवणारालाच संसदेत पाठवा. संसदेत अनेक खासदार बोलतच नाहीत. ज्या सुविधा आमदार आणि खासदारांना मिळतात त्या सर्व प्रकारच्या सुविधा मत देणाऱ्या प्रत्येक माणसाला मिळाल्या पाहिजेत .असे प्रतिपादन खासदार इम्तियाज जलील यांनी भारतीय पिछडा ( ओबीसी ) शोषित संघटन ने च्या राज्यस्तरीय अधिवेशनाप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलताना केले. ते पुढे म्हणाले की ओबीसी देशात 52 टक्के पेक्षा जास्त आहे .त्यांना या देशात मागणी करावी लागत आहे की आमची मोजणी करा. दुसऱ्याच्या दार ठोठाव लागत आहे. कारण ते विखुरलेले आहे .जर ओबीसी बी .पी. एस. एस च्या माध्यमातून संघटित झाला तर नेत्यांना ओबीसी कडे यावे लागेल. मी या जिल्ह्याचा खासदार म्हणून आपण जे मला निवेदन दिले त्यानुसार ओबीसी जनगणनेचा मुद्दा संसदेत मांडणारच आहे. या देशातील शोषित पिढीत सर्वसामान्य लोकांना चांगल्या दर्जाचे



शिक्षण आरोग्यविषयक सुविधा मिळाल्या पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला संविधान निर्मात्याच नाव दिले आहे. पण हे विद्यापीठ जगातल्या शंभर टॉप विद्यापीठात यायला हवे. पण सध्या तसे दिसत नाही.

याप्रसंगी कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष डॉ. उज्वलाताई दहिफळे यांनी स्वातंत्र्य च्या अमृत महोत्सवानंतरही या देशातील भटके विमुक्त आणि ओबीसींना मूलभूत सुविधा मिळत नाही आधार कार्ड मिळत नाही आरोग्याच्या सुविधा मिळत नाहीत हे अत्यंत खेदाची बाब आहे बीपीएसएसचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ज्ञानेश्वर गोरे प्रा. सुदाम चिंचाणे बी. पी. एस. एस चे कार्याध्यक्ष गणपती मंडळ , महासचिव आर. के .पाल आदींची भाषणे झाली. या प्रसंगी, संयोजक डॉ. कालिदास भांगे, डॉ. देवराज दराडे, अशोक तारो, डॉ. हनुमान वांकर, बालाजी मुडे, जनार्दन कापुरे, विश्वनाथ कोक्कर, शरद बोरसे, डॉ. कृष्ण मालकर, सविता हजारे, सुनीता काळे, मायताई गोरे, वैशाली पेरके, बळी चव्हाण, अंकुश राठोड,रामकीशन मुंडे, गौरव पाटील यासह अनेक राज्यभरातून अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# जिंतूर शहरासह तालुक्यात बाल कामगारात वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** बाल कामगारांच्या संख्येत वाढ दिसून येत असून बालमजुरांची संख्या वाढत असल्याचे चित्र पाहावयास मिळत असून जिंतूर शहरा बरोबरच औद्योगिक वसाहत परिसरात अल्पवयीन लहान मुले व मुली प्लास्टिक व कचरा जमा करत असल्याचे चित्र पहावयास मिळत असून ज्या वयात हातात वही पेन्सिल घ्यावयाची त्याच हाताने कचरा जमा करावा लागत असल्याचे चित्र सर्रास पाहावयास मिळते.

याच बरोबर असा प्रश्न अनुत्तीर्ण राहतो की शाळाबाह्य शिक्षण कधी मिळणार ? संबंधित अधिकारी याकडे लक्ष देतील का ? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात तर सदर शिक्षण खात्यातील अधिकारी याकडे लक्ष देतील का परंतु सध्या तरी हा प्रश्न अनुत्तरीतच दिसतो. एकीकडे शाळाबाह्य मुलांसाठी शासन लाखो रुपये खर्च करत असून कित्येक शाळाबाह्य मुले शिक्षणापासून वंचित असल्याचे चित्र दिसून येते. संबंधित अधिकाऱ्यांनी या बाबीकडे गांभीर्याने वेळेची लक्ष देण्याची गरज असून अशा शाळाबाह्य मुलांकडे लक्ष देण्याची मागणी जनतेतून होत आहे.

# फुलंब्रीत काँग्रेसचा तहसील कार्यालयावर मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** औरंगाबाद जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने काल दिनांक १० मार्च रोजी फुलंब्री च्या टी पॉईंट पासून तर फुलंब्रीच्या तहसील कार्यापर्यंत शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले होते.

या आंदोलनाच्या प्रसंगी औरंगाबाद जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार डॉक्टर कल्याण काळे, काँग्रेस सेवा दलाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, काँग्रेस कमिटीची औरंगाबाद शहराध्यक्ष युनूस शेख ,मुजाहीन खान , माजी आमदार नामदेव पवार माजी आमदार सुभाष झांबड भाऊसाहेब पाटील जगताप किरण पाटील डोणगावकर यांची प्रमुख उपस्थिती.

तसेच या प्रकरणी आपल्या मागण्यांचे निवेदन फुलंब्री च्या तहसीलदार डॉ. शितल राजपुत यांच्या कडे देण्यात आले. तसेच दिलेल्या निवेदनावर असे म्हटले आहे की , शेतकऱ्यांचे मोठे कष्ट करून पिकलेल्या मालाला योग्य भाव मिळत नाही अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झालेले आहेत पिक विमा देण्यास कंपन्याकडून अडचणी निर्माण केले जात आहेत शासनाने विविध मदतीच्या घोषणा केल्या परंतु त्याचा शेतकऱ्यांना आतापर्यंत त्याचा लाभ मिळाला नाही शेतकरी कष्टकरी तरी धरून उभारण्याचा प्रयत्न करतो आहे तर त्यामध्ये



शेतकऱ्यांना रात्र रात्री विद्युत वापरतात आणि विज बिल भरण्याची त्याची सध्याची परिस्थिती नसताना बंद केला जात आहेत रासायनिक खतांची भाव वाढलेले आहेत यांत्रिकी शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या साधनांची इंधन पेट्रोल डिझेल यांचे देखील भाव वाढले आहेत एकीकडे उत्पादन केलेल्या मनाला भाव मिळत नाही आणि मागणी त्रस्त असल्याने शेतकरी एक कुठला आहे.

कापसाला प्रति कुंडल पंधरा हजार रुपये भाव द्यावा तर कांद्याला प्रतिक्विंटल चार हजार रुपये भाव द्यावा शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असताना देखील पिक विमा देण्यात विलंब झाला असून तो तत्काळ द्यावा अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शासनाचे अनुदान घोषित केले होते परंतु आजपर्यंत शेतकऱ्यांना अनुदान नसून , विद्युत पुरवठा खंडित करण्यात येत आहे तो तत्काळ चालू करण्यात यावे, शेती उपयोगी शेतकऱ्यांच्या रसायनाची पेट्रोल डिझेल व इतरांचे किंमत कमी करावी अशा विविध मागण्यासाठी फुलंब्री शहरात काँग्रेस कमिटीच्या वतीने आंदोलन करण्यात आले याप्रसंगी तालुका काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष संदीप बोरसे युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर बोरसे , सुदाम मते , युवक काँग्रेसचे माजी नगरसेवक मुदस्सर पटेल, हाफीस मनसुरी, प्रशांत नागरे, ज्ञानेश्वर मते, राहुल मते, अंबादास गायके , इदरीस पटेल यांच्या सह तालुक्यातील काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पुर्णेतील तळीरामांच्या धुमाकूळाला लगाम लावणार कोण ?

## दारुबंदी प्रशासन कुंभकर्णी झोपेत; अश्लील शिवीगाळीने नागरिक त्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

**चौधरी दिनेश**

**पुर्णा :** 'पुर्णा गाव तस भलतच चांगल पण पडद्या मागील राजकीय दहशतवाद्यांच्या इशाऱ्यावर नग्न तांडव घालणाऱ्या नशेडी तळीरामांनी अक्षरशः अती संवेदनाशीलतेचा कलंक लावून वेशीला टांगल' अशी अवस्था एकंदर पुर्णा शहरासह संपूर्ण तालुक्यात झाल्याचे निदर्शनास येत असून शहरात साजरे होणारे सन उत्सवासह सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये यथेच्छ दारु ढोसून धुमाकूळ घालण्याचे गंभीरप्रकार सर्रास होत असल्यामुळे सातत्याने कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न उपस्थित होत असल्यामुळे पोलिस प्रशासनासह सर्वसामान्य जनता व्यापारी वर्गासाठी डोकेदुखी निर्माण होत असतांना या नशेडी तळीरामांपुढे प्रशासन देखील अक्षरशः हतबल झाल्याचे पाहावयास मिळत आहे. पुर्णा शहरातील मुख्य बाजारपेठेसह उच्चभ्रू वसाहत असलेल्या लोकमान्य टिळकरोड, महावीर नगर सह शहराला जोडणाऱ्या बसस्थानक रोड, शास्त्री नगर परिसरात देखील देशी/विदेशी दारुची दुकान असल्यामुळे या दारु दुकानांतून मनसोक्त दारु ढोसून अक्षरशः सैराट झालेले तळीराम परिसरासह प्रमुख मार्गांवर सातत्याने अत्यंत अर्वाच्य भाषेचा वापर करीत येणाऱ्या/जाणाऱ्यासह परिसरातील व्यापारी सर्वसामान्य नागरिकांना देखील शिवीगाळ करीत वर्षाच्या बाराही महिने शिमगा साजरा करीत असल्यामुळे परासरातील नागरीक/महालांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असून परिसरातील प्रत्येक व्यापाऱ्यांकडून दावसभर दहा/विस/पन्नास रुपयांची जबरी वसूली करुन हे नशेडी तळीराम व्यापाऱ्यांचीच माय-बहिन एक करीत असतांना शहरातील सिसीटिव्हीत कैद होत असतांना देखील त्यांच्याकडे पोलिस प्रशासन का दुर्लक्ष करीत आहे ? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेतून उपस्थित होत आहे. पुर्णा शहरासह संपूर्ण तालुक्यात यथेच्छ दारु ढोसणाऱ्या नशेडी तळीरामांचा अक्षरशः नग्न तांडव करीत मुक्त सच्चार होत असतांना एकीकडे सर्वसामान्य जनता नागरिक व्यापारी पादचारी महिलांसह प्रतिष्ठित नागरिक त्रस्त झाले असतांना मात्र परभणी जिल्हा दारुबंदी विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना आपल्या कर्तव्याचा विसर पडल्यामुळे या अकार्यक्षम अधिकारी/कर्मचाऱ्यांमुळे नशेडी तळीरामांना शहरासह तालुक्यात सर्वत्र अधिकृत देशी/विदेशी दारु विक्रेत्यांसह अवैध देशी/विदेशी दारु विक्रेत्यांकडून चोवीस तास मद्य सेवा पुरवली जात असल्यामूळे सर्वत्र 'झुम बराबर झुम शराबी' असा कारभार सर्वत्र झाल्याचे निदर्शनास येत आहे.
पुर्णा शहरातील शांतता व सुव्यस्थेला ज्या ज्या वेळी गालबोट लागले त्या प्रत्येक घटनांचा सखोल अभ्यास केल्यास एक गोषौट निश्चितच लक्षात येते की या घटनांना सर्वस्वी नशेडी तळीरामच कारणीभूत आहेत सार्वजनिक सन महोत्सव असो की धार्मिक कार्यक्रम या कार्यक्रमांना गालबोट लावण्यास नशेडी तळीराम जवाबदार असले तरी पडद्या मागून त्यांना मद्याची रसद पुरवून शांतता व सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्न चिन्ह निर्माण करणारे मात्र पडद्या मागील तत्वभ्रष्ट राजकीय दहशतवादीच असतात परंतु घटने नंतर मात्र साळसुदपणाचा आव आणून 'तो मी नव्हेच' या भुमिकेत वावरत आपण किती शांतताप्रिय आहोत याचा आभास ही सोईस्कररित्या निर्माण करतात त्यामुळे या नशेडी तळीरामांसह त्या पडद्या मागील तळीराम समर्थकांची देखील एकवेळ प्रशासनाला तळी उचलावीच लागणार आहे त्यानंतरच शहरासह तालुक्यात खऱ्या अर्थाने शांतता व सुव्यवस्था कायम राहण्यास सुरुवात होईल.



# संत चोखोबा मेळा यांच्या मंदिराचे काम त्वरित सुरू करा; अन्यथा तीव्र आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज



**पंढरपूर :** शहरातील तुळशी वृंदावन येथील संत चोखोबा मेळा यांचे मंदिर पडून गेले आठ दिवस झाले परंतु आत्तापर्यंत मंदिराचे काम चालू करण्यात आले नाही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. येत्या आठ दिवसांमध्ये जर मंदिराचे काम चालू नाही केले तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी दिला आहे. आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पंढरपूर येथील वनअधिकारी चैताली वाघ याना संत चोखोबा मेळा मंदिर उभारणीचे काम त्वरित सुरू करावे यासाठी निवेदन देण्यात आले.पंढरपूर शहरात राज्यातून नव्हे तर संपूर्ण देशातून भाविक येत असतात या भाविकांना दिलासा मिळण्यासाठी तसेच विविध संतांचे दर्शन मिळावे म्हणून पंढरपूर शहरांमध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून तुळशी वृंदावनाची निर्मिती करण्यात आली आहे .या तुळशी वृंदावन मध्ये विविध संतांची मंदिरे उभी करण्यात आली आहेत .गेल्या आठ दिवसांपूर्वी यातील संत चोखोबा मेळा यांचे मंदिर अचानक पडले असून नक्की ते मंदिर कशामुळे पडले याची सखोल चौकशी करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप धोत्रे यांनी केली आहे .वास्तविक फक्त तीन वर्षांपूर्वीच या तुळशी वृंदावनाची निर्मिती करण्यात आली असून या ठिकाणी विविध संतांचे मंदिरे बांधण्यात आले आहेत. तीन वर्षांपूर्वी बांधण्यात आलेले मंदिर पडले आहे याचा अर्थ या ठिकाणी केलेले बांधकाम निकृष्ट दर्जाचे आहे हे सिद्ध झाले आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी करून संबंधित ठेकेदारावर आणि अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी देखील धोत्रे यांनी केली आहे. सरकार वेगवेगळ्या मोठ्या घोषणा करत आहे परंतु आपल्या संत महात्म्यांचे मंदिर बांधायला जर सरकारकडे पैसे नसतील तर याच्यापेक्षा मोठे दुर्दैव नाही. हवेत गप्पा मारण्यापेक्षा या मंदिराची उभारणी त्वरित करावे अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वखर्चाने या मंदिराची उभारणी करेल असेही दिलीप धोत्रे यांनी सांगितले.

यावेळी मनसेचे तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील, शहराध्यक्ष संतोष कवडे, उपशहराध्यक्ष गणेश पिंपळनेरकर, विभागाध्यक्ष नागेश इंगोले, विद्यार्थी सेनेचे तालुकाध्यक्ष प्रताप भोसले, विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष अवधूत गडकरी इत्यादी उपस्थित होते.

# बारावीतील विद्यार्थ्यास भोसकले

## परतूर ठाण्यात सहा जणाविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** येथील एका महाविद्यालयात इयत्ता बारावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यास जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर बोलावून चाकूने भोसकून गंभीर जखमी केल्याची घटना दि ८ मार्च रोजी घडली. या प्रकरणी परतूर पोलिस ठाण्यात सहा जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेश परमेश्वर माकोडे रा. परतूर यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात म्हटले आहे की दि ८ मार्च रोजी संध्याकाळी पाच ते साडेपाच वाजेच्या सुमारास मित्रा सोबत जिल्हा परीषद शाळा परतुर येथे बसलेलो असताना संकेत वाघ याचा फोन आला की, तु जिल्हा परीषद शाळेच्या पाठीमागे ये तुझ्याशी बोलायचे आहे. जिल्हा परीषद शाळेच्या पाठीमागे गेलो असता तेथे संकेत वाघ, शंकर हिवाळे व त्याचे ईतर चार मित्र हे तेथे होते. संकेत वाघ यास कशासाठी बोलवले विचारले असता त्याने शिवीगाळ करून गाडी घेवुन आमच्या समोरुन फिरतोस असे म्हणून सर्वांनी लाथाबुक्यांनी मारहाण करण्यास सुरवात केली. काट्यामध्ये फेकले. उठुन उभा राहीलो असता संकेत वाघ व शंकर हिवाळे यांनी त्यांच्या कमरेचे चाकू काढले. संकेत वाघ याने जिवे मारण्याच्या उद्देशाने पाठीमागुन उजव्या पाठीत चाकुने भोसकले व शंकर हिवाळे याने जिवे मारण्याच्या उद्देशाने समोरुन चाकु मारत असताना चाकु धरून आरडाओरडा केल्याने संकेत वाघ, शंकर हिवाळे व त्याचे चार मित्र हे तेथुन पळुन जात असल्याचे सोबत असलेल्या मित्रांनी पाहील्याने व ओरडण्याचा आवाज आल्याने मित्र आले. त्यांनी चाकु मारल्याचे पाहुन व रक्त निघत असल्याने उचलुन परतुर येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये नेले व तेथे डॉक्टरांनी प्राथमिक उपचार करुन जालना येथे खाजगी दवाखान्यात हलविण्यात आले. सध्या जखमीवर जालना येथे अति दक्षता विभागात उपचार सुरू आहे. या प्रकरणी दि १० मार्च २०२३ रोजी संकेत वाघ, शंकर हिवाळे व त्याचे चार मित्र सर्व रा. परतुर यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक कमलाकर अंभोरे हे करीत आहेत.

# धान घोटाळा प्रकरणात अधिकारी निलंबित

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत झालेल्या धान खरेदी घोटाळ्यात संबंधित आठ संस्थांवर कारवाई करण्यास टाळाटाळ करणे जिल्हा पणन अधिकाऱ्याला चांगलेच महागात पडले आहे. कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत राज्य सहकारी पणन महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी जिल्हा पणन अधिकारी गणेश खर्चे यांना निलंबित केले.

# ओला, सुका कचरा एकत्रित करून पेटवून देण्यावरच भर

## शासनाचे करोडो रुपये जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेकडून कचऱ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** शासनाकडून कचरा प्रकल्पावर करोडो रुपये खर्चूनही धाराशिवकरांचे स्वास्थ बिघडायच्याच मार्गावर आहे. कचऱ्याचे ओला सुका व घातक कचरा असे वर्गीकरण करणे आवश्यक आहे. राज्य शासनाने याबाबत 29 एप्रिल 2017 रोजी शासन निर्णय झाला आहे. जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतीकडून हा शासन निर्णयाला केराची टोपी दाखवत गावातील सर्वच कचरा एकाच ठिकाणी गोळा केला जात आहे. गोळा केलेला कचरा वरदळीच्या रस्त्याच्या व राष्ट्रीय महामार्गाच्या रस्त्याच्या कडेला पेटवून दिला जात आहे.त्यामुळे कचऱ्याच्या धुराडीने व दुर्गंधीने जिल्ह्यातील अनेक गावात नागरिकांचा श्वास गुदमरत आहे. शासन एकीकडे कचरा कोंडी कमी करण्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करत आहे तर दुसरीकडे अनेक गावागावात व शहरात खुल्या आणि सार्वजनिक ठिकाणी दुर्गंधीयुक्त कचऱ्यांचे ढीग पडून आहेत.

घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातील कचरा संकलन केंद्रावर आणला जाणारा कचरा ओला आणि सुका असे वर्गीकरण करूनच आणावा असे नियम आता शासनाने घालून दिले आहेत. संकलन करताना तर नाहीच पण संकलन केंद्रावरही कचऱ्याचे वर्गीकरण केले नसून कचऱ्याचे मोठ्याचे मोठे ढीग सरार्स ठिकाणी पेटवून दिल्याचे वास्तविक चित्र "आधुनिक केसरी" केलेल्या पाहणीतून दिसून आले आहे.

कचऱ्याचे ओला सुका व घातक कचरा असे वर्गीकरण करणे आवश्यक आहे. याबाबत राज्य शासनाने 29 एप्रिल 2017 रोजी शासन निर्णय काढून स्थानिक स्वराज्य संस्थांना तशी व्यवस्था करण्याचे सत्य निर्देश दिले आहेत. मात्र धाराशिव जिल्ह्यात अनेक ठिकाणी हा शासन निर्णय कचऱ्याच्या ढिगऱ्यात पेटून दिला जात आहे. ज्या प्लास्टिक वर बंदी आहे अशा प्लास्टिक प्लेट पेले चमचे काटे चाकू प्लास्टिक कॅरीबॅग प्लास्टिक काडी फुग्यांसाठी वापरला जाणारी प्लास्टिक प्लास्टिक झेंडे यांनीच कचऱ्याचा ढीग माखला आहे. विशेष म्हणजे या कचऱ्यावर कोणतेही प्रक्रिया केली जात नाही.त्यामुळे कचऱ्यांच्या ढीगाचा आकार दिवसेंदिवस वाढत आहे. या उघड्यावर फेकल्या जाणाऱ्या कचऱ्यावर दुबत्या जनावरांनी चरणे ही बाबही जनावरांबरोबरच मानवी आरोग्यास धोक्यात घेऊ जात आहे. एकीकडे कचरा कोंडी कमी करण्यासाठी कोट्यावधी चुरडा होत आहे तर दुसरीकडे शहरात गावागावात सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याचे ढीग पडून आहेत. सार्वजनिक ठिकाणी कचरा न फेकणे,



न थुंकणे याबाबतीतही नागरिकांना विसर पडत जात आहे. घरातील कचऱ्याची योग्य त्या ठिकाणी ओला सुखा वर्गीकरण करून विल्हेवाट लावली गेली पाहिजे जमेल तसे व तेव्हा परिसर स्वच्छ करणे गरजेचे आहे. प्लास्टिक हे तयार करताना मानवी आरोग्यास खास करून लहान मुलास हानिकारक असणाऱ्या अतिशय वाईट घटकांचा रसायनांचा वापर होतो. प्लॅस्टिक तयार झाल्यानंतरहि ही हानिकारक रसायने त्यात कायम राहतात, ती अन्नपदार्थात मिसळून कॅन्सर सारखे रोग निर्माण करतात, अनेक घातक रसाने आपल्या शरीरातील हार्मोनची जागा घेतल्यामुळे त्यामुळे शरीरात कमतरता निर्माण होऊन अनेक आजार नवीन जन्म घेतात. हा प्रकार विशेषतः लहान मुलांच्या बाबतीत जास्त आहे. कारण रसायनाचा परिणाम वाढीच्या वयात जास्त व होतो.गर्भात असताना जर प्लास्टिकचा मारा शरीरावर जास्त झाला तर तिच्या गर्भाला देखील धोका निर्माण होऊ शकतो. प्लास्टिक बाबत एवढ्या गंभीरता असतानाही प्लास्टिकचा सरास वापर म्हणजे पुढच्या पिढीसाठी आपणच स्वतः कर्दनकाळ बनत आहोत.

समाजामध्ये सर्वांनी याची नैतिक जबाबदारी स्वीकारून पुढची पिढी वाचवायचे असेल तर, प्लास्टिक बाबत चिंतन होणे अतिशय गरजेचे आहे

1950 च्या दशकापासून जगभरात प्लास्टिकचा वापर कित्येक पटीने वाढला आहे. सध्या ज्याप्रमाणे प्लास्टिकची निर्मिती होत आहे, तो वेग असाच राहिला तर 2050 पर्यंत जगातला जीवाश्म इंधन वापरापैकी 20टक्के वापर हा प्लास्टिकच्या निर्मितीसाठी होईल असा इशाराच संयुक्त राष्ट्र ने अगोदरच दिलेला आहे.

केंद्र शासनाने आणलेली स्वच्छ भारत संकल्पना देशाला अधिक समृद्ध व सुंदर बनवणाऱ्या असून यासाठी आपल्या सर्वांचा सहभाग अत्यंत मोलाचा आहे. याकडे जिल्हा प्रशासनाने काळजीपूर्वक लक्ष देणे अतिशय गरजेचे आहे.